


१२६२
RLLBK-0010975

# आईची पूजा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम [illegible] वि: [illegible]
क्रमांक [illegible] नों. दि: [illegible]

: लेखक :

वि. स. गवाणकर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. 90८६५
[illegible]

एक रुपया पंचाहत्तर नये पैसे

REFBK-0010975

गणेश बुक डेपो, गिरगांव, मुंबई ४.

● प्रकाशक :

● चि. पां. केळकर,
गणेश बुक डेपो,
गिरगांव, मुंबई ४.

विजयादशमी

● १९६०

● मुद्रक :

श्रीमती सुधाबाई र. देसाई,
न्यू भारत प्रिंटिंग प्रेस,
६, केळेवाडी, गिरगांव, मुंबई ४.

# पूजेची तयारी

माझ्या 'क्रांतिकारकांच्या कथांचा' भारत सरकारनें पारितोषिक देऊन गौरव केला. माझ्या साहित्यिक मित्रांनीं माझें अभिनंदन केलें आणि अशाच विषयावर मी एखादें पुस्तक लिहावें, अशी त्यांनीं त्यावेळीं आपली इच्छाहि प्रकट केली.

— त्यामुळेंच माझ्या हातून आईची पूजा पुरी होत आहे. थोर देशभक्तांचीं चरित्रें अगर त्यांच्या जीवनांतील महत्त्वाचे प्रसंग ही राष्ट्राची खरी संपत्ति. ही संपत्ति आपण जतन केली. तिचें पूजन केलें. भजन केलें तर आपणांस नवें चैतन्य मिळतें. आपणांत नवा उत्साह निर्माण होतो. देशाच्या भरभराटीसाठीं आपण झटलें पाहिजे, असें वाटूं लागतें. आत्मविश्वास निर्माण होतो. देशप्रेम वाढीस लागतें आणि आपली शक्ति, बुद्धि, भक्ति आपल्या प्रिय देशाच्या उन्नतीसाठीं वापरावी, असें वाटूं लागतें.

आपल्या भारतांतील थोर देशभक्तांच्या आदर्शानें भारताचें स्वातंत्र्य टिकण्यासाठीं, भारताची भरभराट होण्यासाठीं, तो वैभवाच्या शिखरावर चढण्यासाठीं, त्याला मानाचें पान मिळण्यासाठीं आपण झटलें पाहिजे; असें प्रत्येक भारतमातेच्या पुत्रास वाटूं लागेल आणि त्यासाठीं तो आपली शक्ति, बुद्धि, भक्ति भारतमातेच्या चरणीं वाहील, हीच आईची पूजा !

आईच्या पूजेसाठीं अनेक थोर लेखकांच्या पुस्तकांतून मला जें जें योग्य वाटलें तें तें मी एकत्रित केलेलें आहे—माझें असें फारच थोडें आहे. एकत्रित मांडण्याचे श्रम तेवढेच माझे आहेत.—ह्या थोर लेखकांचा मी अत्यंत आभारी आहें.

'आईची पूजा' अत्यंत हौसेनें प्रकाशित करणारे माझे थोर प्रकाशक मित्र श्री. वि. पां. उर्फ तात्यासाहेब केळकर आणि माझ्यांत नेहमींच नवा उत्साह निर्माण करणारे माझे गुरुतुल्य मित्र श्री. पुं. य. पाटकर यांचे आभार मानून मी मोकळा होऊं इच्छित नाहीं.

आईच्या पूजेसाठीं अनेक ग्रंथ, मासिकें मिळवून देण्याची कामगिरी मुंबई म्यु० ग्रंथपाल श्री, स. द. बर्वे डिप्. लिब्. [ मुंबई ] यांनीं मोठ्या हौसेनें केली, याबद्दल मी त्यांचा आभारी आहें.

'**आईची पूजा**' सर्वांस आवडो ही इच्छा.

—लेखक.

चंद्रकांत गवाणकर
आणि
सुरेखा गवाणकर
यांस


- जयभारत
- हं चला, उतरा गड !
- गंगा मातोश्रीची साक्ष
- समशेरीला समशेर भिडली
- देशासाठीं दिव्य
- तुझे चरणीं माझे अश्रु !
- बेलभंडार
- सिंहगर्जना
- तेजस्वी प्रतिज्ञा
- कोण भितो मरणाला
- एक पाऊल पुढें
- सागर खवळला
- प्रकाशाचा नवा मार्ग
- चलो दिल्ली
- स्वातंत्र्यसूर्य उगवला

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे



# १ • जय भारत !

**पंधरा** आगस्ट एकोणीसशें सत्तेचाळीस या दिवशीं आमचें पारतंत्र्य संपलें. आम्हाला स्वातंत्र्य प्राप्त झालें. अंधार नाहींसा झाला. प्रकाश दिसला.

निराशेची जागा आशेनें घेतली. दुःखाचे दिवस संपले. आनंदाच्या दिवसांना प्रारंभ झाला. लाचारी कुठच्या कुठें पळाली. अभिमान धांवत आला. मान ताठ करून आम्ही चालूं लागलों. आनंदानें, अभिमानानें एकमेकांस म्हणूं लागलों, ‘जयभारत !’ “जयहिंद ! !’

पंधरा आगस्ट एकोणीसशें सत्तेचाळीस या दिवशीं भारतांतील प्रत्येक घरीं आनंद उतूं जाऊं लागला. प्रत्येक घरीं स्वातंत्र्यसण साजरा होऊं लागला. मुलें नाचूं लागलीं. गाऊं लागलीं. सभा होऊं लागल्या. आनंदानें जयघोष होऊं लागले.

याच दिवसापासून सभासभांतून, आनंददायक सार्वजनिक कार्यक्रमांतून आपलें प्रिय ‘वंदे मातरम्’ राष्ट्रगीत आपण मोठ्या अभिमानानें गाऊं लागलों,

वंदे मातरम् सुजलाम् सुफलाम्
मलयजशीतलाम् शस्यश्यामलाम् मातरम् वंदे० ॥

शुभ्रज्योत्स्ना पुलकित यामिनीम्
फुल्लकुसुमित द्रुमदल शोभिनीम्
सुहासिनीम् सुमधुरभाषिणीम्
सुखदाम् वरदाम् मातरम् वंदे० ॥

सप्तकोटिकंठ कलकलनिनाद कराले
द्विसप्तकोटि भुजैर्धृत खरकरवाले
अबला कॅनोमां ॲतो बॉले
बहुबल धारिणीम् नमामि तारिणीम्
रिपुदलवारिणीम् मातरम् वंदे० ॥

तुमि विद्या तुमि धर्म
तुमि हृदि, तुमि मर्म
त्वम्‌हि प्राणा शरीरे
बाहुते तुमि मा शक्ति

हृदये तुमि मा भक्ति
तोमारई प्रतिमा गडी
मंदिरे मंदिरे

त्वम्हि दुर्गा दशप्रहरणधारिणी
कमला कमलदलविहारिणी
वाणी विद्यादायिनि नमामि त्वां
नमापि कमलाम् अमलाम् अतुलाम्
सुजलाम् सुफलाम् मातरम् वंदे० ॥

शामलाम् सरलाम्
सुस्मिताम् भूषिताम्
धरणीम् भरणीम् मातरम् वंदे मातरम् ॥

आपल्या प्रिय भारताचें हें राष्ट्रगीत ! म्हणतांना आपणाला केवढा अभिमान वाटतो ! राष्ट्रगीतांत भारताची केवढी थोरवी सांगितलेली आहे ! काय सांगितलें आहे ? राष्ट्रगीताचा अर्थ काय आहे ?

राष्ट्रगीताचा—वंदेमातरम्‌चा अगदीं सोपा, सरळ अर्थ असा आहे कीं, माते, मी तुला वंदन करितों.

माझी माता कशी आहे ? सुंदर जलानें परिपूर्ण आहे. सुंदर फळांनीं युक्त आहे. चंदनाप्रमाणें शीतल आहे, धान्याच्या ताटव्यांनीं श्यामल ( काळसर ) दिसत आहे,

अशा माझ्या या मातेला मी वंदन करितों.

चंद्राचें शुभ्र चांदणें पडतें. त्या चांदण्यानें रात्री पुलकित होतात. तेजदार बनतात. वृक्ष फुलांनीं बहरतात व माझ्या मातेला शोभा येते. माझी माता सुंदर स्मित हास्य करिते. मधुर व सुंदर भाषण करिते. ती आपल्या लेकरांना सुख देते. ' तुमचें चांगलें होवो.' असा शुभ आशीर्वाद देते.

—अशा या माझ्या मातेला मी वंदन करितों.

माझ्या मातेला कोण अबला म्हणेल ! ज्यांच्यामधून भयंकर असा कलकलाट निघत आहे, असे जिला सात कोटी कंठ आहेत, जिला बळकट,

कणखर अशा चौदा कोटी भुजा आहेत. अशा या माझ्या मातेला अबला कोण म्हणेल! माझी माता बलवान आहे. शक्तिमान आहे. ती शत्रूच्या सैन्यांचा नाश करून आपल्या बालकांचें रक्षण करणारी आहे.

—अशा माझ्या या मातेला मी वंदन करितों.

माते, तूंच विद्या, तूंच धर्म, तूंच हृदय, शरीरांतील नाजूक भाग (वर्म) पंचप्राण तूंच आहेस. माते, माझ्या बाहूंत असणारी शक्ति दुसरी तिसरी कोणी नसून तूंच आहेस. माझ्या हृदयांतील भक्ति दुसरी तिसरी कोणी नसून तूंच आहेस. आणि म्हणूनच मंदिरामंदिरांतून तुझ्या प्रतिमेची स्थापना केली जात आहे. [ माझी भारतमाता ही भावना प्रत्येकाच्या हृदयमंदिरांत स्थान मांडून बसत आहे. ]

—अशा माझ्या या मातेला मी वंदन करितों.

माते, दहा हत्यारें धारण करणारी दुर्गा तूंच. कमल दलावर विहार करणारी जी कमला ती तूंच. विद्या देणारी वाणी तूंच.

जिची तुलना कोणाबरोबरहि करतां येणार नाहीं [ अतुला ] अशी तूं आहेस. माते, जलानें परिपूर्ण, फुलांनीं परिपूर्ण अशा तुला मी वंदन करितों.

माते, चांगल्या हसऱ्या, सरळ, श्यामल असलेल्या अशा सर्वांना एकत्र आणतेस. सर्वांना एकत्र सुखासमाधानानें ठेवतेस आणि सर्वांचें पोषण करतेस.

माते, मी तुला वंदन करितों.

वंदे मातरम्.

अहाहा! राष्ट्रगीताचा एकेक शब्द म्हणजे अमोल मोतीं! अमोल हिरा. भारतमातेची केवढी ही थोरवी!

—असें हें आमचें राष्ट्रगीत जन्माला आलें, त्याला आज ऐशीं वर्षे झालीं. इ. स. १८८२ च्या सुमारास त्याचा जन्म झाला. कै. बंकिम-बाबू हे या गीताचे जनक. राष्ट्रगीत जन्माला आलें पण त्यावेळीं भारतांत इंग्रजांची सत्ता असल्यामुळें, भारताच्या हातापायांत पारतंत्र्याच्या शृंखला असल्यामुळें, कोणाहि भारतपुत्राला हें गाण्यास सक्त मनाई होती. इंग्रजांना या गीताची इतकी भीति वाटत होती कीं, हें जर गाइलें गेलें तर भारतांतील

जनतेच्या हृदयांत देशभक्ति, देशप्रेम, जागृत होईल. तिचें रक्त सळसळूं लागेल. उसळूं लागेल आणि भारत स्वतंत्र करण्यासाठीं जनता हसत हसत प्राणाचें मोल देण्यास तयार होईल.

आणि झालेंहि तसेंच.

भारताच्या स्वातंत्र्यप्रेमापुढें कशाची भीति ! कशाची पर्वा !

भारताच्या स्वातंत्र्यप्रेमापुढें सारें-सारें-सारें कांहीं तुच्छ !

आणि म्हणूनच इंग्रजांच्या दरडावणीला भीक न घालतां वंदेमातरम् गीत सन १८८२ सालापासून...प्रत्येक सभेंत गाइलें गेलें.

सरकार किती चडफडलें. किती चिडलें. किती संतापलें !

त्यावेळीं वंदेमातरम् गाण्यास मनाई होती ना !

आणि ही मनाई मोडणारांस सरकार फटक्यांची शिक्षा देई. तुरुंगांत डांबी. दंड तर करीच करी.

आणि आतां ! आम्ही आमचें प्रिय 'वंदेमातरम्' दिमाखानें गातों. कारण आमचा भारत पंधरा आगस्ट १९४७ ला स्वतंत्र झाला. ह्या दिवशीं पारतंत्र्याच्या शृंखला तटातट तुटल्या. आम्हाला स्वातंत्र्य प्राप्त झालें.

पण हें स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं, पारतंत्र्याच्या शृंखला तोडण्यासाठीं, भारताला पारतंत्र्याच्या मगरमिठींतून सोडविण्यासाठीं कित्येक भारतीय वीरांनीं आपल्या सुखावर लाथ मारली. त्यांनीं दुःखाच्या खाईंत उडी घेतली. तुरुंगवास भोगला. छातीवर बंदुकीच्या गोळ्या झेलल्या. आपलें रक्त सांडलें. हसत हसत फासांत मान अडकविली. आपल्या आयुष्याची आनंदानें होळी केली !

म्हणूनच आपण पंधरा आगस्ट १९४७ पासून स्वतंत्र झालों. भारत स्वतंत्र झाला !

आतां भारताला आपलें गेलेलें वैभव पुन्हा प्राप्त करून घ्यावयाचें आहे. भारताचें पूर्वीचें वैभव केवढें मोठें ! पण सुमारें चारशें वर्षांपूर्वीपासून त्याची खरी लूटमार सुरू झाली. त्यापूर्वींहि लूटमार होत होती, नाहीं असें नाहीं, पण त्यावेळचे लूटमार करणारे भारतांतच रहात, त्यामुळें परदेशीं फारशी संपत्ति जात नसे. पण भारतांत पाश्चात्य लोकांपैकीं विशेषतः इंग्रजांनीं भारतांतील

संपत्तीचा ओघ इ. स. १६०० च्या सुमारास युरोपकडे वळविला. इंग्रज केवळ संपत्तीची लूटमार करून थांबले नाहींत तर त्यांनीं त्याचवेळीं आपली भाषा, आपले विचार, आपली संस्कृति भारतांत पसरविण्याचे आटोकाट प्रयत्न केले. ठिकठिकाणीं मिशनरी संस्था काढल्या. त्यांच्या मार्फत त्यांनीं हें काम केलें आणि त्यांत त्यांना चांगलें यशहि आलें. व्यापार तर त्यांनीं केलाच पण त्याबरोबर राज्यहि मिळविण्यास सुरवात केली. तागडीबरोबर हातांत तलवार घेतली. आणि या दोहोंच्या जोरावर भारतावर आपली पूर्ण सत्ता बसविली. भारताचें स्वातंत्र्य नष्ट झालें. पण ही गोष्ट पूर्ण होईपर्यंत तितकीशी कोणाच्या लक्षांत येऊं शकली नाहीं; याचें कारण इंग्रजांचे दाखवायचे दांत वेगळे होते. आणि खायचे दांत वेगळे होते. इंग्रजांची भाषा गोड, लिहिणें गोड; यामुळें त्यावेळीं सारे मोहून गेले होते. इ. स. सोळाशें सालीं इंग्लंडांत ईस्ट-इंडिया कंपनी स्थापन झाली आणि या कंपनीच्या वतीनें जेव्हां कांहीं व्यापारी भारतांत व्यापारासाठीं आले, तेव्हां त्यांनीं आपल्याबरोबर येथील राजेलोकांस दाखविण्यासाठीं एलिझाबेथ राणीचें एक पत्र आणलें होतें, त्या पत्रांत किती मिष्टास मजकूर होता पहा.

"महाराज, कोणीहि परराष्ट्राचे लोक व्यापाराचा उद्देश मनांत धरून स्नेहभाव व सौम्य वृत्तीनें आपल्या देशांत गेले असतां आपण त्यांचा उत्तम प्रकारें आदर करीत असतां, ह्यावरून आमच्या कित्येक व्यापाऱ्यांस आपल्या देशांत जाण्यास परवानगी देण्यास आम्हास उमेद आली आहे. आपल्या देशांत व्यापारीमालाचा सौदा फार उत्तम होतो; असें इकडे खात्री-लायक कळल्यावरून जलमार्गाचीं इतर अनेक दुर्धर संकटें सहन करूनहि हे व्यापारी तिकडे जात आहेत. एवढीं संकटें सोसून आपल्या देशांत प्रवेश करण्याची ज्याअर्थी त्यांस स्फूर्ति झाली आहे, त्याअर्थी आपणहि त्यांचा योग्य परामर्ष घेतला असतां बोलण्याचालण्यांत व व्यवहारांत ते चोख व सभ्य आहेत, असें आपणांस दिसून येईल. एकमेकांचे विचार व रीतिरिवाज एकमेकांस कळण्यानें स्नेह वृद्धिंगत होईल. दळणवळण वाढेल. आपण आमच्या ह्या लोकांवर जे कांहीं

उपकार अगर जी कांहीं मेहेरबानी कराल त्याची फेड आम्ही मोठ्या आनंदानें करूं."

एलिझाबेथ राणीचें असें पत्र घेऊन इंग्रज व्यापारी भारतांत आले आणि त्यांचा व्यापारहि येथें सुरळीत होऊं लागला. ह्या व्यापारी लोकांबरोबरच इंग्रजांचे दुसरे कांहीं लोक आले, ते म्हणजे मिशनरी लोक. मिशनरी लोक अति चिकाटीचे. अति प्रयत्नवादी. फादर स्टीफन्स नांवाचा एक मिशनरी इकडे पूर्वींच येऊन राहिला होता. त्यानें अनेक वर्षांच्या दीर्घ प्रयत्नानें मराठी भाषा आपलीशी केली आणि आपल्या धर्माच्या प्रसारार्थ त्यानें मराठी भाषेंत ज्ञानेश्वरीच्या धर्तीवर 'ख्रिस्तपुराण' नांवाचा एक ओवीबद्ध ग्रंथ लिहिला.

ख्रिस्ती मिशनरी लोकांची चिकाटी दांडगी. उद्योग प्रियता दांडगी. जाहिरात दांडगी आणि त्यांना सरकारी आश्रयहि दांडगा! असें सांगतात कीं, कोणी एक मिशनरी भारतांत आला. त्याला इकडील भाषा येत नव्हती पण त्याची तो मुळींच पर्वा करीत नव्हता. तो आपल्या धर्माच्या प्रसाराकरितां रस्त्यावर उभा राहून आपल्याच भाषेंत बोले. बोलतांना अभिनय करी. त्याच्याजवळ जी एक घंटा होती, ती घंटा तो वाजवी. त्यामुळें मुलें त्याच्या जवळ येत. मग तो आपल्याजवळ असलेल्या क्रुसाचा मुका घेई व जमलेल्या मुलांसहि ध्यावयास सांगे. मग जमलेल्या मुलांस तो एकेक माळ देई आणि मग आपल्याच भाषेंत म्हणे, तुम्ही आतां ख्रिस्ती धर्माचे झाकांत!

त्याच्या ह्या कृत्यानें ख्रिस्ती धर्माचा जरी विशेष प्रसार झाला नाहीं; लोकांनीं जरी त्याच्या अशा करण्यानें आपण 'बाटलों' असें मानलें नाहीं तरी पण त्यानें आपलें धर्म-प्रसाराचें हें कार्य थांबविलें नाहीं.

इंग्रजांनीं भारतांत आपला जसजसा प्रवेश केला तसतसा आपल्या इंग्रजी भाषेचा व त्याच्याबरोबर विचार, संस्कृति यांचाहि त्यांनीं प्रसार सुरू केला. यामुळें भारतांतील लोक एकप्रकारें मोहून गेले. कांहीं बुद्रुक मंडळी तर म्हणूं लागली. 'भारताच्या प्रगतीसाठींच ईश्वरानें इंग्रजांना पाठविलें आहे.' पण जी कांहीं त्यावेळीं दूरदृष्टीची भारतीय मंडळी होती, ती मात्र कोणत्याच

गोष्टीला फसली नाहीं, कीं मोहून गेली नाहीं. भारताच्या प्रगतीसाठींच ईश्वरानें इंग्रजांना पाठविलें आहे काय ? याविषयीं ही मंडळी मात्र साशंक झाली आणि इंग्रजांनींहि ओळखलें कीं, हीच मंडळी भारतांतील आपल्या सत्तेला धक्का देईल. हीच मंडळी चाणाक्ष आहे. आणि

याच मंडळीला कोणतें ना कोणतें आमिष दाखवून आपल्या विरुद्ध उभें न रहाण्याबद्दलचा त्यांनीं प्रयत्न केला.

पण कांहीं धीरगंभीर लोक असे असतात कीं, ते कोणत्याहि आमिषानें फसत नाहींत. कशाचीहि पर्वा करीत नाहींत. आणि आपल्या ध्येयासाठीं सतत प्रयत्न करून आपलें ध्येय गांठतात. ते आपली इच्छा पूर्ण करून घेतात ते आपला मार्ग अचूक ओळखतात.

इंग्रज तागडी, तलवार हातीं घेऊन जेव्हां तक्तावर बसले तेव्हां त्यांनीं भारतीय जनतेला प्रथम जर कशाची गोडी लाविली असेल तर ती नोकरीची. थोडेंफार इंग्रजी शिक्षण झालें कीं, मोठ्या पगाराची नोकरी द्यावयाची असें त्यांनीं धोरण ठेविलें; त्यामुळें ज्यांना संधि सांपडली त्यांनीं इंग्रजी शिक्षण घेतलें. कित्येक संस्कृत पंडितांनीं आपल्या वयाच्या चोविसाव्या वर्षीं इंग्रजी शिक्षणास सुरवात केली, ती केवळ नोकरी आणि प्रतिष्ठा यासाठींच. कृष्णशास्त्री चिपळूणकरांस त्यांचे गुरु मोरशास्त्री साठे यांनीं एकदां सांगितलें "खांद्यावर शालजोडी टाकून फिरण्याचे दिवस संपले. संस्कृत विद्या ही पोटाला पोटभर देऊं शकणार नाहीं, तेव्हां तूं इंग्रजी शीक." पुण्याच्या पाठशाळेंत अनेक शास्त्रें पढलेल्या, संस्कृतचा पंडित असलेल्या, आपले गुरु मोरशास्त्री साठे यांजकडून 'बृहस्पति' ही मानाची पदवी मिळविलेल्या कृष्णशास्त्री चिपळूणकरांना सन अठराशें अठ्ठेचाळीस सालीं आपल्या वयाच्या चोविसाव्या वर्षीं इंग्रजी शिक्षणास आरंभ करावा लागला ! तो केवळ पोटासाठीं आणि प्रतिष्ठेसाठींच !

इ. स. १८०० च्या सुमारास भारतांत राजेरजवाड्यांकडे मिळणाऱ्या नोकऱ्या संपल्या होत्या. सरकारदरबारीं विद्वानांची होणारी बूजहि नाहींशी झाली होती. महाराष्ट्रांत पेशवाई जवळ जवळ नाहींशीच झाली होती. त्यामुळें

तेथेंहि तीच स्थिति होती. तेव्हां आतां जनतेला काय किंवा विद्वानांना काय एकच मार्ग होता. इंग्रजी शिक्षण घ्यावें, नोकरी मिळवावी आणि आपला चरितार्थ चालवावा.

त्यावेळीं थोडेंफार शिक्षण घेतलेल्या बऱ्याच लोकांचा संबंध इंग्रज लोकांशीं वारंवार येई. अशा लोकांपैकीं कांहीं लोक आपल्या बांधवांतून आचार-विचारांच्या बाबतींत तांदुळांतील खड्यांप्रमाणें वेगळे होत. इंग्रजांच्या प्रत्येक कृतीनें चकीत होत, मोहीत होत. हेच लोक इंग्रजांचे 'भाट' बनत. त्यांचे गोडवे गाण्यांतच यांना धन्यता वाटे.

पण कांहीं लोक मात्र इंग्रजांच्या प्रत्येक कृतीकडे डोळ्यांत तेल घालून चिकित्सक बुद्धीनें पहात. विशेषतः धार्मिक आणि सामाजिक बाबींकडे अधिकच जागरूक असत. या दोन बाबींच्या संरक्षणासाठीं सतत प्रयत्न करीत असत आणि या दोन बाबींत सुधारणा झाल्या पाहिजेत, असेंहि त्या लोकांना वाटे.

आणि त्यामुळेंच इंग्रजांच्या भारतांतील सामाजिक, धार्मिक आणि राजकीय सत्तेला सौम्य-तीव्र धक्के बसण्यास सुरवात झाली.

इंग्रजांच्या राजकीय सत्तेला कोणी, केव्हां कसे कसे धक्के दिले, तें पाहूं लागलों तर आपल्या डोळ्यांसमोर प्रथम उमाजी नाइकाचें नांव चटकन येतें.

• • •



## २ . हं चला, उतरा गड !

हिंद धरणीला मुक्त करण्याला,
उमाजी नाइकानें विडा उचलिला.

उमाजी नाईक हा पुणें जिल्ह्यांतील पुरंदरच्या आसपास राहाणारा. त्याचे वाडवडीलहि तेथेंच राहात. त्याच्या वाडवडिलांनीं शाहू महाराजांकडून गडावर पहारेकऱ्यांचीं कामें मिळविलीं होतीं व त्या कामांबद्दल त्यांस इनामें, वतनेंहि मिळालीं होतीं.

पण हीं वतनें-इनामें दुसऱ्या बाजीरावानें इ. स. १८०३ च्या सुमारास रद्द केलीं, त्यामुळें रामोशी असंतुष्ट झाले. चिडले. रामोशी हे मुळचेच बंडखोर आणि आतां तर त्यांच्यावर ना बंधन कीं, त्यांना ना उपजीविकेचें साधन. मग ते कां असंतुष्ट होणार नाहींत ! कां चिडणार नाहींत ! कां बंडें करणार नाहींत ! ! त्यांच्यापुढें आतां दोनच मार्ग होते; गेलेलीं वतनें—इनामें खटपट करून अर्ज—विनंत्या करून परत मिळविणें आणि उपजीविकेसाठीं दरोडे घालणें, बंडें करणें.

ग्रंथ संग्रहालय. ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम क्रमांक

यासाठींच पुरंदरच्या आसपास राहणाऱ्या रामोशांनीं एकजूट केली. या रामोशांचा म्होरक्या उमाजी नाईक.

एक दिवस उमाजी आपल्या सहकारी रामोशांसह पुरंदरच्या देवीस गेला. त्यानें देवीपुढें गुडघे टेकले. बाजूला रामोशी मंडळी उभी राहिली. उमाजीनें मान फिरवून एकवार आपल्या सोबत्यांकडे पाहिलें. आणि नंतर दोनहि हातांनीं आपलें डोकीवरचें पागोटें काढलें. व देवीपुढें तें धरून त्यानें प्रतिज्ञा केली—"आई, आमचीं वतनें, इनामें परत मिळवीन तेव्हांच हें पागोटें डोईवर चढवीन!" मग इतर रामोशांनींहि आपापल्या पागोट्यांना हात लाविले व होकारार्थी माना हालविल्या.

नंतर उमाजी म्हणाला, "हं चला आतां. उतरा गड!—" उमाजी आपल्या सहकाऱ्यांसह पुरंदर गड उतरला.

सतत तीन वर्षं उमाजीनें आपल्या सहकाऱ्यांसह दरोडे घालण्याचा आणि त्याचबरोबर वतनें-इनामें परत मिळविण्याचा उद्योग केला.

शेवटची विनंति त्यानें इ. स. १८१८ सालीं पुण्याहून बाजीराव पळून जाऊं लागला तेव्हां केली आणि त्या विनंतीला यश आलें. बाजीरावानें रामोशांचीं वतनें-इनामें परत देण्याविषयीं अधिकाऱ्यांस हुकूम सोडले आणि मग रामोशांचीं वतनें-इनामें त्यांना परत मिळालीं.

पण इंग्रजांची सत्ता पूर्णपणें सुरू झाल्यावर या रामोशी लोकांवर सरकारची करडी नजर राहूं लागली. त्याचा परिणाम असा झाला कीं, रामोशी इंग्रजांचा द्वेष करूं लागले. इंग्रजांची सत्ता त्यांना असह्य वाटूं लागली. स्वतंत्र वृत्तीच्या या जमातीला इंग्रजांची काटेकोर कायद्याची चौकट अगदीं नकोशी झाली आणि म्हणूनच तिनें इंग्रजांविरुद्ध शस्त्र उचललें.

रामोशी इंग्रजांचा द्वेष करूं लागले. ते इंग्रजांवर दरोडे घालूं लागले. पुढें-पुढें केवळ पैशांकरितां हे दरोडे न घालतां देशाच्या स्वातंत्र्यासाठीं हें काम ते करूं लागले. पण इंग्रजांनीं उमाजीला अनेक युक्त्या करून पकडलें आणि सन १८२७ सालीं त्याला फांशीं देण्यांत आलें. इंग्रजांना उमाजीचा एवढा दरारा वाटला होता कीं, उमाजीला जर 'योग्य वेळीं आळा बसला नसता तर तो दुसरा शिवाजीच झाला असता;' असें बॉम्बे गॅझिटिअरकारानें लिहून ठेविलें आहे.

स्वातंत्र्यासाठीं उमाजी फाशीं गेला पण इंग्रजांविषयींचा द्वेष मात्र मागें कायम राहिला. रामोशांप्रमाणेंच डोंगरी कोळ्यांनीं स्वातंत्र्यासाठीं चळवळ चालविली. इ. स. १८४५ च्या सुमारास राघु भांगरे, बापू भांगरे यांनीं मोठी चळवळ केली. राघु भांगरे याला पकडण्यासाठीं तर सरकारनें पांच हजार रुपयांचें बक्षीसहि लाविलें होतें. शेवटीं तो साधूच्या वेषांत असतांना पंढरपूर येथें पकडला गेला.

अशा प्रकारें एकोणीसाव्या शतकाच्या पहिल्या अर्धशतकांत भारताच्या स्वातंत्र्यासाठीं महाराष्ट्रांत जशी सशस्त्र क्रांतीला सुरवात झाली तशी वैचारिक क्रांतीलाहि याच काळांत सुरवात झाली.

ही वैचारिक क्रांति वाघिणीचें दूध पिऊन म्हणजेच इंग्रजी शिक्षणामुळें झाली. इंग्रजी शिक्षणानें उजाळा मिळालेल्या बुद्धीचा उपयोग आपल्यांत असलेले सामाजिक दोष हुडकून काढण्यासाठीं आणि ते नाहींसे करण्यासाठीं होऊं लागला.

इंग्रजी शिक्षणानें आणि इंग्रजांच्या सहवासानें इंग्रजांचें सगळेंच कांहीं प्रतिष्ठीत व आदरणीय असें विद्वानांस वाटूं लागलें.

याच काळांत सगळ्या सुखसोईंना, यांत्रिक सुधारणांना सुरवात झाली होती; त्यामुळें विद्वान अगदीं दिपून गेले होते. लोकहितवादी उर्फ गोपाळ हरी देशमुख तर हें सारें पाहून म्हणत, ‘इंग्रजी राज्य ही एक ईश्वरी कृपा आहे.’ लोकहितवादींच्या समकालीन कृष्णशास्त्री चिपळूणकर, विष्णुबुवा ब्रह्मचारी, ज्योतिराव फुले, डॉ. भाऊ दाजी लाड, नाना शंकरशेट, दादोबा पांडुरंग, बाळशास्त्री जांभेकर, भाऊ महाजन वगैरे मंडळी प्रमुख होती.

बाळशास्त्री जांभेकर यांनीं ‘दर्पण’ नांवाचें वर्तमानपत्र काढलें, या पत्राचा पहिला अंक शुक्रवार तारीख ६ जानेवारी सन १८३२ रोजीं प्रसिद्ध झाला. दर्पणचा उद्देश असा सांगितला आहे कीं, ‘स्वदेशीय लोकांमध्यें विलायतेंतील विद्यांचा अभ्यास अधिक व्हावा आणि या देशाची समृद्धि व येथील लोकांचें कल्याण याविषयीं स्वतंत्रतेनें व उघड रीतीनें विचार करावयास स्थळ व्हावें म्हणून दर्पण पत्र सुरू करण्यांत येत आहे.’ असा त्याचा उद्देश प्रारंभींच सांगून पुढील शब्दांत

त्याचें संपादकीय धोरण व्यक्त केलें आहे. "मनोरंजन करणें, चालते काळचीं वर्तमानें कळवणें आणि योग्यतेस येण्याचे मार्ग दाखविणें, या गोष्टींची दर्पण छापणारांस मोठी उत्कंठा आहे. म्हणोन या गोष्टी साध्य होण्याविषयीं जितका प्रयत्न करवेल तितका ते करतील."

'दर्पणाचा' २६ जून १८४० रोजीं शेवटचा अंक निघाला व तें बंद पडलें. पुढें २४ आक्टोबर १८४१ पासून गोविंद विठ्ठल उर्फ भाऊ महाजन यांच्या संपादकत्वाखालीं 'प्रभाकर' साप्ताहिक सुरू झालें. हें दर रविवारीं निघे.

अशा प्रकारें विचारांच्या देवघेवीचें साधन जीं वर्तमानपत्रें त्यांचाहि उदय महाराष्ट्रांत झाला होता. तसेंच कांहीं सुशिक्षित मंडळी एकत्र येऊन विचारांची देवघेव करीत होती. अशाच पैकीं एक उदाहरण सांगावयाचें झाल्यास मुंबईस सन १९४० सालीं स्थापन झालेलें "परमहंस मंडळ" होय. परमहंस मंडळाच्या सभा गुप्तपणें होत. जातिभेद मानूं नये. मूर्तिपूजा करूं नये, असे या मंडळाचे उद्देश होते. या मंडळाच्या सभासदास जातिभेद मानणार नाहीं, अशी प्रतिज्ञा करावी लागे. जो कोणी अशी प्रतिज्ञा करी. त्यास ख्रिस्ती भटारखान्यांत तयार केलेल्या पावाचा तुकडा खावा लागे व त्यावर परजातीच्या माणसाच्या हातचें घोटभर पाणी प्यावें लागे. जातिभेद मानूं नये, विधवांच्या पुनर्विवाहाविषयीं संमति असावी, मूर्तिपूजा करूं नये इत्यादि अनेक बंधनें त्यावर असत.

पुढें डॉ. भाऊ दाजी लाड, जगन्नाथ शंकरशेट इत्यादि प्रमुख मंडळीनें मुंबईस स्टुडंटस् लिटररी सायंटिफिक सोसायटी स्थापन केली. या सोसायटीनें मुलींची पहिली शाळा काढली व समाज सुधारणेचा पाया घातला. सन १८९२ सालीं शिमग्याच्या सणांतील अश्लील व अनीतिजनक प्रकार कायद्यानें बंद करण्याबद्दल जगन्नाथ शंकरशेट यांनीं सरकारकडे अर्ज केला. 'बॉबे असोशिएशन' संस्था निघाली. तीहि सार्वजनिक हिताच्या प्रकरणांवर लोकमत दर्शविणारीं पत्रकें व सरकारकडे अर्ज पाठविण्याचें काम करूं लागली.

अशा प्रकारें शिक्षित मंडळी आपापल्यापरी देशकार्य करीत असतां इ. स. १८४२ सालीं एक असामान्य पुरुष महाराष्ट्रांत जन्मला. त्या पुरुषाचें नांव—महादेव गोविंद रानडे.

न्या. रानडे सन १८६४ सालीं एम्. ए. झाले. पुढील दोन वर्षांनीं वकिलीची परीक्षा पास झाले. आणि सरकारी नोकरी करूं लागले.

सरकारी नोकरीचा मुकूट डोकीवर घालून देशकार्य करीत रहाणें, ही गोष्ट फार कठीण आहे. पण न्यायमूर्ति रानड्यांनीं ह्या दोनहि गोष्टी नमुनेदार केल्या. त्यांनीं फार मोठी वैचारिक क्रांति घडवून आणली. सामाजिक प्रश्नांप्रमाणेंच राजकीय प्रश्नांचीहि चर्चा झाली पाहिजे, हें लोकांच्या लक्षांत तीव्रतेनें आणून कृतींत उतरविण्याची कामगिरी रानड्यांनींच केली. कोणत्याहि प्रश्नाकडे सर्वांगी कसें पहावें, हें रानड्यांनीं शिकविलें. नवे–नवे राजकीय व सामाजिक प्रश्न उत्पन्न करून त्यांना मूर्त स्वरूप आणण्यासाठीं नवीं मंडळें, नव्या संस्था स्थापन करणें, त्यांना प्रोत्साहन देणें, त्यांना मार्ग दाखविणें वगैरे गोष्टी रानड्यांनींच केल्या.

त्यांचें जनतेंत आणि सरकारदरबारीं जबरदस्त वजन होतें. भारतांतले मोठमोठे विद्वान सल्लामसलतीसाठीं न्या. रानड्यांकडे धांव घेत. रानडेहि त्यांना अत्यंत आपुलकीनें सल्लामसलत देत. गृहस्थ इंग्रजी शिकलेले. इंग्रजांत नेहमीं वावरणारे पण त्यांनीं डोक्यावरची पगडी कांहीं कधीं सोडली नाहीं. आपल्या देशांतील रीतिरिवाजांचा, पोषाखाचा, भाषेचा त्यांना फार मोठा अभिमान. आपला भारत इंग्रजांच्या मगरमिठींतून सुटावा, देशांतील तरुण स्वाभिमानी असावे, असें त्यांना नेहमींच वाटे. ते राष्ट्रहितासाठीं व्याख्यानें देत. नवीन जीवन देत. विचार करावयास लावीत.

सन १८७२ सालीं न्या. रानड्यांचें स्वदेशी व्यापारावर व्याख्यान झालें. स्वदेशी वस्तु कां वापराव्या आणि परदेशी वस्तु कां वापरूं नयेत, दरसाल सोळा कोट रुपयांची संपत्ति इंग्रज कसे शोषण करतात, हें त्यांनीं व्याख्यानानें जनतेला पटवून दिलें. त्यांच्या ह्या व्याख्यानाचा फार मोठा परिणाम झाला. सभेच्या ठिकाणींच कित्येकांनीं स्वदेशी वस्तु वापरण्याचें ठरविलें. स्वदेशी वस्तु वापरणें, हें मानाचें समजण्यांत येऊं लागलें. सार्वजनिक

काकांनीं पुण्यांत आणि आजुबाजूच्या शहरीं फार मोठी चळवळ केली. स्वदेशी व्यापाराला उत्तेजन देणारीं दुकानें निघालीं. समाजरूपी थंड गोळ्याला ऊब आली. समाज जागा झाला. सुमारें पंचवीस वर्षांपूर्वींहि याच प्रश्नावर बरीच चर्चा झाली होती. त्यावेळीं गोवर्धनदास गोपाळदास नांवाच्या मुंबईच्या एका गृहस्थानीं एका सभेंत मोठ्या कळकळीनें भाषण केलें होतें.

गोवर्धनदास म्हणाले होते,

"मी खरोखरच सांगतों, इंग्रजांच्या राज्यापासून प्रजा निर्धन होऊन गेली. व्यापार सर्व बुडाला. सगळ्याच भारतांत फारच वाईट दशा प्राप्त झाली आहे. जों जों इंग्रजी राज्य पांच पन्नास वर्षें राहील तों तों सगळी प्रजा दरिद्री होऊन जाईल."

—ह्या भाषणाची सत्यता पुढें सुमारें पंचवीस वर्षांनीं पूर्ण प्रत्ययाला आली.

न्या. रानड्यांनींहि अनेक प्रकारें ती सत्यता जनतेच्या नजरेस आणून दिली.

याच सुमारास कांहीं समाज सुधारक 'सामाजिक सुधारणांच्या' मागें हिरीरीनें लागले होते. कांहीं शास्त्री मंडळी जुन्या चालीरीतींस चिकटून होती. जुन्या-नव्या मतांचा झगडा चालला होता. विधवाविवाह, पुनर्विवाह करावे कीं करूं नये, ह्या विषयीं कडाक्याचे वादविवाद होत होते. इ. स. १८७० च्या मार्च महिन्यांत न्या. रानडे, लोकहितवादी, कृष्णशास्त्री चिपळूणकर इ. मंडळींचा पुणें येथें याविषयीं शंकराचार्यांसमोर कडाक्याचा वादविवाद झाला. या वादविवादांत पुनर्विवाह करूं नये, असें ठरलें! या वादांत भाग घेतल्याबद्दल लोकहितवादींच्या मुलीच्या सासूनें लोकहितवादींस निरोप पाठविला कीं, तुम्हीं 'पुर्नविवाहाच्या' वादांत भाग घेतला, हा भ्रष्टाकार झाला. आतां याबद्दल प्रायश्चित्त घ्या. पावन व्हा. नाहीं तर तुमच्या लेकीचा त्याग करून मी माझ्या मुलाचें दुसरें लग्न केल्याशिवाय राहाणार नाहीं.

विचारे देशमुख काय करतात ! त्यांनीं प्रायश्चितच घेतलें ! !

अशा प्रकारें एका बाजूस जुन्या आचार विचारांची मंडळी तर दुसऱ्या बाजूस नव्या मतांची मंडळी आपापल्या विचारांप्रमाणें कार्य करीत होती. कृष्णशास्त्री आणि विष्णुशास्त्री ह्या पितापुत्र जोडीनें विशेषत: विष्णुशास्त्र्यांच्या निबंध मालेनें सुशिक्षितांस एखाद्या प्रश्नाकडे कसें पहावें, कसा विचार करावा, हें शिकविलें. शि. म. परांजपे-काळकर्ते परांजपे यांनींहि आपल्या तेजस्वी वाणीनें आणि प्रखर लेखणीनें लोक जागृतीची फार मोठी कामगिरी केली.

न्या. रानड्यांनीं व्यावहारिक दृष्टीनें पण शास्त्रीय शुद्ध विचारानें सामाजिक आणि राजकीय जागृतीचें कार्य केलें. त्याचें हें कार्य आरंभीं पटकन डोळ्यांत भरत नसलें तरी पण सन १९०१ पर्यंत त्यांच्याच मार्ग-दर्शनानें व सल्लामसलतीनें महाराष्ट्रांतील–भारतांतीलहि सामाजिक, राजकीय क्रांति होत होती.

रानडे म्हणजे त्याकाळीं वटवृक्ष !

वैचारीक क्रांतिपुरुष !

अशा प्रकारें सन १८१८ पासून पुढील ऐशीं–नव्वद वर्षांत भारतांत विशेषत: महाराष्ट्रांत जें वैचारिक क्रांतीचें आंदोलन झालें, त्यामुळें जनता जागृत झाली. आपणाला जें सुख, जो मान, अधिकार मिळत आहे, हें सारें बेगडी आहे; ही आपली फसवणूक आहे, हा सारा आभास आहे, असें जनतेला वाटूं लागलें आणि असें हें 'वाटणें' हीच सशस्त्रक्रांतीची तयारी झाली. सन १८५७ चें जें क्रांतियुद्ध झालें त्यांत श्रीमंत नानासाहेब पेशवे, राणी लक्ष्मीबाई....यांना साऱ्या भारताचा पाठींबा होता तो या 'वाटण्या मुळेंच !'

आणि म्हणूनच १८५७ च्या क्रांतियुद्धांत श्रीमंत नानासाहेबांनीं प्रतिज्ञा केली कीं—

• • •



## ३ • गंगामातोश्रीची साक्ष

"मी स्वातंत्र्याकरितां—धर्माकरितां आत्म-बलिदान करण्यास तयार आहें. यास गंगा मातोश्रीची साक्ष आहे."

गंगा नदींतील होडींत एक तेहतीस-चौतीस वर्षांची व्यक्ति आणि दुसरी कांहीं मंडळी असून त्यांचीं कसलीं तरी खलबतें चाललीं असावींत, असें त्यांच्या एकंदर हालचालीवरून वाटतें. सर्वांच्यामध्यें असलेल्या त्या व्यक्तीचा चेहरा वाटोळा होता. डोळे भेदक होते. अंगकांती गव्हाल्याच्या रंगाची होती. चर्येवर उग्रता व कठोरता होती.

ती व्यक्ति बरोबरच्या त्या मंडळींत उठून दिसत होती आणि तीच व्यक्ति इतरांस कांहींतरी सांगत होती.

इतक्यांत कुणीतरी म्हणालें, "नानासाहेब, तुम्हाला इंग्रजांनीं बिठूरहून कानपूरला मुद्दाम बोलावून घेतलें, याचें कारण इंग्रजांचा कानपूरचा खजिना व

दारूगोळा याचें तुम्ही रक्षण करावें आणि हिंदी फौजेनें जें क्रांतियुद्ध आरंभिलें आहे, तें तुम्हीं मोडून टाकावें, हेंच ना ?"

"नाहीं. क्रांतियुद्धाला हातभार लावण्यासाठीं. खजिना व दारूगोळा क्रांतिकारकांच्या हातीं सहज कसा पडेल याची युक्ति सांगण्यासाठीं. क्रांतियुद्धाचीं सूत्रें हालविण्यासाठीं. समजलें ! अहो, माझ्यासारख्या ज्वलजहाल देशाभिमान्याबद्दल आपल्या मनांत किंतु असावा ! ! मी इंग्रजांच्या मदतीस आलों, असें तुम्हांला वाटावें ! काय टिकासिंग, या मंडळीला असा संशय कां बरं यावा ?"

"नानासाहेब, इंग्रज तुम्हाला आपले मित्र समजतात. ते ब्रह्मावर्तास तुमच्या राजवाड्यांत राहून यथेच्छ पाहुणचार झोडतात. कानपूरचा कलेक्टर हिलर्डसन हा तर तुमचा परम मित्र. शिवाय कानपूरला येतांना दोन तोफा, तीनशें शिपाई, घोडदळ, पायदळ तुम्ही आणलें आहे !"

"होय. हें खरेंच आहे. पण तें कशासाठीं आणलें आहे, हें तुम्ही यांना सांगा. बरं मंडळी, आपली सर्वांची खात्री होण्यासाठीं मी पुन्हां एकदां सांगतों कीं,

> "या गंगोदकाची शपथ घेऊन सांगतों कीं, मी शिपायांच्या म्हणण्याबाहेर नाहीं. जर इतके लोक स्वातंत्र्याकरितां–धर्माकरितां आत्मबलिदान करण्यास तयार आहेत तर मीहि त्यांच्यांत सामील आहेच ! यास गंगामातोश्रीची साक्ष आहे."

अशी शपथ घेणारे आपले नानासाहेब पेशवे सन १८५७ च्या क्रांतियुद्धाचे अव्वल दर्जाचे क्रांतिवीर ! सूत्रधार ! ! एकीकडे इंग्रजांच्या डोळ्यांत मैत्रीची धूळ फेकून दुसरीकडे त्यांच्यासाठीं शवपेटी तयार करणारे !

शेवटचा पेशवा रावबाजी याच्या कारकीर्दीत सन १८१८ सालीं पेशवेपद बुडालें आणि रावबाजीला दरसाल आठ लाखाचें पेन्शन देऊन इंग्रजांनीं त्याला कानपूर जवळील विठूर (ब्रह्मावर्त) येथें राजवाड्यांत ठेविलें.

रावबाजीचें एकहि पुत्ररत्न मोठें झालें नाहीं. म्हणून त्यानें आपल्याच आश्रितांपैकीं भट कुटुंबांतील धोंडू नांवाच्या एका मुलाला दत्तक घेतलें.

ता. ७ जून १८२७ रोजीं दत्तविधान झालें आणि भटांचा धोंडू नानासाहेब पेशवे झाले.

पुढें रावबाजी इ. स. १८५१ सालीं मरण पावले हीच–हीच इंग्रजांस सुवर्णसंधि आली. या संधीचा फायदा त्या वेळचा ग. जनरल डलहौसी यानें घेतला. यानें रावबाजीच्या मरणाबरोबरच त्याचें आठ लाखाचें पेन्शन बंद करण्याचें ठरविलें.

रावबाजीचा दत्तकपुत्र नानासाहेब. तेव्हां नानासाहेबास हें आठ लाखाचें पेन्शन चालू ठेवणें योग्य होतें; कारण रावबाजीबरोबर महाराष्ट्रांतून जीं गरीब कुटुंबें ब्रह्मावर्तास आलीं होतीं, त्यांचें पूर्वींसारखेंच पालन पोषण करणें नानासाहेबाचें कर्तव्य होतें; शिवाय पूर्वींच्या चालीरीतीनुसार योग्यतेला शोभेल अशा थाटांत वार्षिकें करणें; सरदार आणि हाताखालचे लोक यांचा मानमरातब ज्याच्या त्याच्या योग्यतेनुसार ठेवणें, हेंहि नानासाहेबाचें कर्तव्य होतें. पण दरसाल आठ लाखाचें हें वंशपरंपरा चालणारें पेन्शन बंद झालें. नानासाहेबानीं आतां काय करावें ? आपलें कर्तव्य कसें पार पाडावें ? आपल्या योग्यतेस–इतमामास शोभेल असें कसें रहावें ?

नानासाहेबानीं पुष्कळ खटपट केली. आपला वकील नजीउल्लाखान यास इंग्लंडपर्यंत पाठविला. पण तेथेंहि न्याय मिळाला नाहीं. उलट भारतांतील आमचा ग. ज. डलहौसी यानें जें केलें तें योग्यच आहे, असेंच सांगण्यांत आलें.

इंग्रजांविषयीं नानासाहेबास जो तिटकारा होता, जें वैर होतें, जो द्वेषाग्नी होता, त्यांत तेल पडण्यास जीं कारणें घडलीं होतीं, त्यांत आणखी ह्या एका कारणाची भर पडली आणि भारतांतून इंग्रजांस घालविलेंच पाहिजे, असें त्यांच्या मनानें घेतलें.

पण इंग्रजांस भारतांतून कसें घालवितां येईल ?

आपणाला नाहीं का हें करतां येणार, असा विचार जेव्हां त्यांच्या मनांत येई तेव्हां दिवाणखान्यांतील पहिल्या बाजीरावाच्या तसबिरीकडे त्यांचें लक्ष जाई. कोणती युक्ति योजावी असा विचार येतांच, नाना फडणीसाच्या तसबिरीकडे ते पहात. छत्रपति शिवाजी महाराज, श्रीमंत माधवराव,

राघोबादादा, सवाई माधवराव इत्यादि थोर पराक्रमी, कल्पक, धैर्यवान त्यांच्या डोळ्यांसमोर उभे रहात. आणि मग नानासाहेबास वाटे, मी 'दत्तक' असलों तरी त्यांचाच वंशज. त्यांच्या पराक्रमाचा, कल्पकतेचा, धैर्याचा वारसा मिळविलेला ! मी अन्याय सहन करूं? अपमानी आणि लाजिरवाणें जिणें जगूं ? नाहीं. असें कधींहि होणार नाहीं !

याच सुमारास डलहौसीनें कोणत्या ना कोणत्या निमित्तानें संस्थानें खालसा करण्याचा सपाटा चालविला होता आणि त्याच्या ह्या दुष्ट कृत्यांच्या बातम्या नानासाहेबाच्या कानीं दररोज येत होत्या. नागपूरकर रघूजी भोसले सन १८५३ सालीं मृत्यु पावले. त्यांनीं दत्तक घेतलेला असूनहि तो नामंजूर केला आणि उलट 'राज्यास वारस नाहीं' म्हणून त्यांचें राज्य खालसा केलें आणि त्यांच्या खासगी मालमत्तेचें लिलांवहि केलें. नागपूरच्या इभ्रतदार राजाची ही अब्रू सीताबर्डीच्या बाजारांत भर चव्हाट्या-वर लिलांवात मांडण्यांत आली ! हत्ती, उंट, घोडे, बैल कवडी मोलानें गेले. त्या वेळच्या शंभर रुपये किंमतीच्या मोठमोठ्या सुंदर बैलांच्या जोड्या अवघ्या पांच-पांच रुपयांस फुकापासरी विकल्या, नागपूरच्या महालांतील मौल्यवान लांकडी सामान विकलें ! किती दुष्ट कृत्य हें ! ! हें दुष्ट कृत्य पाहून जनतेच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले. आपल्या धन्याच्या अब्रूची ही परवड जनतेला कशी पहावेल !

पेशव्यांच्या एका काळच्या सरदाराच्या संस्थानची अशी धूळधाण झालेली पाहून नानासाहेब पेशव्याच्या अंतःकरणास घरें पडलीं.

आणि तें इंग्रजांचें दुष्ट कृत्य !

—आपल्या सातारच्या स्वामीची पवित्र गादी इंग्रजांनीं नष्ट केली. प्रतापसिंह महाराजांस साताऱ्यास कैद करून वाटेंत निंबगांवी एका गुरांच्या गोठ्यांत ठेविलें आणि त्या महाराष्ट्राच्या राजाला गुरांच्या गोठ्यांत रात्र काढावयास लाविली....अशी एक का दोन....इंग्रजांच्या दुष्ट कृत्यांची मालिकाच नानासाहेबांस दिसूं लागली.

म्हणूनच नानासाहेबास वाटे, इंग्रजांस भारतांतून घालवून दिलेंच

पाहिजे. त्यांची जुलमी सत्ता नाहींशी केलीच पाहिजे आणि भारत स्वतंत्र केलाच पाहिजे.

—आणि त्यासाठींच नानासाहेबांनीं दिल्लीचा बादशहा बहादूरशहा, कुंवरसिंह, तात्या टोपे यांच्याशीं गुप्तपणें विचारविनिमय केला. सहकार्यासाठीं संस्थानिकांस गुप्त पत्रें लिहिलीं. प्रचार सुरू केला. संन्याशी, फकीर, ज्योतिषी, भटजी, भुते वगैरे देशभर संचार करूं लागले. जनतेपुढें इंग्रजांच्या दुष्ट कृत्यांचा पाढा ते वाचूं लागले आणि लवकरच इंग्रजांचें राज्य लयाला जाणार ' असें भविष्य वर्तवूं लागले ! 'भाकरीचा संदेशहि' एका गांवांहून दुसऱ्या गावीं पोचूं लागला. एका गांवाहून भाकरी दुसऱ्या गांवीं व तेथून पुन्हा तिसऱ्या गांवीं जाऊं लागल्या. ठराविक भाकरी पाठवून संदेश पोचूं लागले. भाकरीच्या संख्येनें व आंत चिठ्ठया घालून गांवोगांवीं अतित्वरीत व अतिगुप्तपणें संदेश जाऊं येऊं लागले. सैन्यांतहि पाहिजे तसा प्रचार झाला. फितुरी झाली. ' भारताच्या स्वातंत्र्यासाठीं आम्ही प्राण पणास लावूं ' अशी सैनिकांनीं प्रतिज्ञा केली. इ. स. १८५५–५६ च्या सुमारास इंग्रजांचें सैन्य अवघें दोन लक्ष अडतीस हजार होतें. त्यांत दोन लक्ष भारतीय व बाकी अडतीस हजार गोरे सैन्य ! हे गोरे सैनिक आणि गोरे लोक भारतीय सैनिकांना ' काळे आदमी ' समजून त्यांच्याशीं तुच्छतेनें वागत. काळ्या–गोऱ्यांचें काम जरी एक होतें तरी त्यांचें वेतन मात्र एक नव्हतें. काळ्यांनीं लढावें आणि गोऱ्यांनीं लुटावें. काम काळ्यांना आणि मान गोऱ्यांना अशी स्थिति होती. या सगळ्या गोष्टींबद्दल भारतीय सैनिकांच्या मनांतहि रुखरुख लागून राहिली होती. ते नाराज झाले होते. इतकेंच नव्हे तर संधि आल्यास इंग्रजांशीं दोन हात करण्याचीहि त्यांची तयारी होती.

आणि अशी संधि आतां चालूनच आली.

सगळें कांहीं ठीक झालें. सगळी तयारी झाली. नानासाहेब पेशवे आणि क्रांतियुद्धाचे इतर पुढारी यांची गुप्त बैठक झाली. क्रांतियुद्धाची ठिणगी पेटवावयाचा दिवस ठरला.

३१ मे १८५७

पण या ठरलेल्या मुदतीच्या अगोदरच क्रांतिवीरांचा उत्साह उतू गेला.

ग्रंथसंग्रहालय ... दा. क्र.

आणि याला २९ मार्च १८५७ रोजीं एक कसलें तरी महत्वाचें कारणहि घडलें. मंगलपांडे नांवाचा शूर क्रांतिवीर या कारणामुळें चिडला. त्यानें गोऱ्यांचे बळी घेण्यास सुरवात केली, क्रांतीची ठिणगी पडली. या ठिणगीला फुंकर मारली गेली ती बंदुकांत वापरावयाच्या काडतुसांमुळें. सैनिकांना देण्यांत आलेलीं काडतुसें गाई डुकरांच्या चरबीचा उपयोग करून तयार केलेलीं आहेत, अशी बातमी सैनिकांत पसरली आणि क्रांतियुद्धाच्या ठिणगीनें अक्राळ विक्राळ रूप धारण केलें.

मीरतच्य सैनिकांनीं क्रांतियुद्धाचें निशाण हातीं धरलें !

इंग्रजांचें धाबें दणाणलें ! आतां आपणाला 'धोका' आहे; याची जाणीव त्यांना झाली. साऱ्या भारतभर युद्धाचा वणवा नक्कीच पेटेल, असेंहि त्यांस वाटलें. आपण सांठवून ठेविलेलीं शस्त्रें, दारूगोळा व खजिना क्रांतिकारकांच्या हातीं लागला तर काय ! याची चिंता त्यांना वाटूं लागली.

पण तसें होऊं नये म्हणूनच इंग्रजांनीं आपल्या दोस्तास—नानासाहेब पेशव्यास ब्रह्मावर्ताहून कानपुरास त्वरीत बोलाविलें आणि "दारुगोळा, खजिना, शस्त्रें यांचें रक्षण करा" अशी विनवणी केली.

नानासाहेबास तेंच पाहिजे होतें. ज्याच्यासाठीं नानांचे प्रयत्न चालले होते. ज्याची जमवाजमव चालली होती, तेंच आयतें चालून आलेलें पाहून नानास अत्यानंद झाला. त्यांनीं इंग्रजांची ही विनंति दोस्त म्हणून मान्य केली. नाना इंग्रजांचे दोस्त ! इंग्रजांस तरी तसें वाटत होतें ! !

नानासाहेब ब्रह्मावर्ताहून कानपुरास आले, तेहि आपल्याजवळील तोफा आणि सैन्य घेऊन आले. त्यांनीं क्रांतिकारकांचे पुढारी टिकासिंग यांच्याशीं गुप्त खलबतें केलीं. आणि मग क्रांतीच्या ज्वाला भडकल्या !

आज ता. ६ जूनची सकाळ. नानासाहेबाच्या छावणीपुढें तीन हजार क्रांतिवीर जयघोष करीत आले.

नानासाहेब त्यांना हास्यमुखानें म्हणाले,

"हा दारुगोळा, तें शस्त्रागार, तो खजिना. सहजासहजीं हें सारें हातीं आलें ना ? मग आतां तलवारीच्या मुठी घट्ट धरा. बंदुकांना बोलत्या करा. तोफांना चालत्या करा. धैर्यानें, नेटानें इच्छित कार्यासाठीं पुढें—पुढें चला."

क्रांतिवीर आनंदानें बेहोष झाले. वीरश्रीनें बेहोष झाले. त्यांचे हात पोलादी बनले. मनाला निश्चयाची जोड मिळाली. ते पुढें चालले–पुढें चालले.

त्यांनीं आपल्या हातीं कानपूर घेतलें! कानपूरचा त्यावेळचा इंग्रज अधिकारी व्हिलर याच्या तोंडचें पाणी पळालें. इंग्रज बायकामुलांचें रक्षण कसें करावें, हें त्यास समजेना! शेवटीं त्यानें एका लहानशा गढींत इंग्रज बायकामुलांस ठेवून जेमतेम त्यांचें रक्षण केलें!

कानपूर क्रांतिकारकांच्या हातीं आलें. त्यांचा उत्साह वाढला. त्यांच्या अंगांत वीरश्रीचें वारें अधिकच संचारलें. आतां आमचा भारत स्वतंत्र होणार, याचा त्यांना अत्यानंद झाला. त्यांनीं श्रीमंत नानासाहेबाची हत्तीवरून कानपूर शहरभर मिरवणूक काढली. स्वातंत्र्याची घोषणा केली. ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें सर सेनापति, सुभेदार....अशा नेमणुका करूनहि टाकल्या.

श्रीमंत नानासाहेब पेशवे राजे झाले!

आणि आतां दोनचार दिवसांतच एका शुभ मुहूर्तावर ब्रह्मावर्त येथें त्यांना राज्याभिषेक करावयाचें ठरलें.

पण!

विधिघटना निराळीच होती. भारतमातेच्या हातापायांतील दास्यशृंखला इतक्या लवकर तुटावयाच्या नव्हत्या. तिचें दास्य इतक्या लवकर संपावयाचें नव्हतें. भारतपुत्रांच्या शूरपणाची कसोटी एवढ्या लवकर लागावयाची नव्हती. त्यांच्या भारतावरील प्रेमाच्या परीक्षेची वेळ अजूनहि आली नव्हती. म्हणूनच कीं काय, क्रांतियुद्धाचें पारडें फिरलें!

यशाच्या मार्गाकडील पावलें अपयशाच्या मार्गाकडे पडूं लागलीं. आशेची जागा निराशा घेऊं लागली!

इंग्रजांनीं आपल्या गोऱ्या सैन्याची झटपट जमवाजमव केली. आणि त्यांनीं कानपूर वेढलें. कानपूरची नाकेबंदी केली!

क्रांतिवीरांनीं पराक्रमाची शर्थ केली. पण त्यांच्या पराक्रमाला यश आलें नाहीं. त्यांची दाणादाण झाली. नानासाहेबासहि कानपूर सोडावें लागलें.

क्रांतिवीरांची संघटना विस्कळीत झाली. भारतांतील सर्व ठिकाणाहून क्रांतीचा जोरदार उठाव एकाच वेळीं झाला नाहीं.

असें झालें तरी क्रांतिवीरांनीं दिलेल्या धक्क्यानें भारतांतील इंग्रजी सत्ता चांगलीच हादरली.

इंग्रजांनीं तर अत्याचाराचा कहर केला. निरअपराधी ठार मारले. देवळें, मशिदी जमीनदोस्त केल्या. श्रीमंत नानासाहेब पेशव्याचा ब्रह्मावर्तांतील राजवाडा जाळला. सारासार विचार, नीति अनीति....कशाचाच इंग्रजांनीं यावेळीं विचार केला नाहीं, त्यांच्या अंगांत यावेळीं सैतान संचारला होता !

क्रांतिवीरांचा राजा, महाराष्ट्राचा पेशवा, भारताला स्वतंत्र करूं पहाणारा भारत पुत्र—श्रीमंत नानासाहेब पेशवे कानपुराहून निसटले. त्यांचा पाठलाग इंग्रज सेनापति कॅम्बेल यानें केला. पण त्यांत त्याला यश आलें नाहीं.

शेवटीं इंग्रजांनीं आपला निल्याचा उपाय करण्याचें ठरविलें.

नानासाहेबास पकडून देणारास त्यांनीं एक लाखाचें बक्षीस जाहीर केलें.

पण व्यर्थ !

नानासाहेब सांपडले नाहींत. ते इंग्रजांना झुकांड्या देत देत आपल्या परिवारासह नेपाळांत गेले.


त्यांना पकडण्यासाठीं इंग्रजांनीं पुढें बरींच वर्षें प्रयत्न केले. पण ते इंग्रजांच्या हातीं कधींच लागले नाहींत.

कोणी म्हणतात, ते नेपाळ हद्दींतील देवखरी येथें सन १८७९ च्या आक्टोबर महिन्यांत मरण पावले. कांहींही असो. पण अत्यंत देशप्रेमानें भारावलेल्या या भारतपुत्रानें आपली बुद्धि, शक्ति, युक्ति आपल्या भारताच्या स्वातंत्र्यासाठीं वापरली.

धन्य ! भारताच्या शूर पुत्रा, तुला आमचे शतशः प्रणाम !

आणि याच वेळच्या आणखी एका संग्राम देवतेला शतशः प्रणाम नको का करायला ! या संग्राम देवतेनें स्वातंत्र्यासाठीं—आईच्या पूजेसाठीं जे प्रयत्न केले ते नको का समजून घ्यायला.! !

——त्याच संग्राम देवतेचा दरबार भरला आहे.



# ४ • समशेरीला समशेर भिडली

आज ता. १३ मार्च १८५४. झांशी येथें दरबार भरला आहे. सरदार, मानकरी वगैरे दरबारी मंडळी आपापल्या योग्यतेनुसार आपापल्या जागीं बसली आहे. दरबारांत खोलीसारखी एक पडदापोशीची जागा आहे. तिच्या दरवाजास बाहेरून सोनेरी महिरप आहे. दरवाजाला चिकाचे पडदे आहेत. दरवाजाचे आंत सरपोच घातलेल्या जागेवर लोडाशीं टेकून एकवीस-बावीस वर्षांची व्यक्ति बसली आहे. त्या व्यक्तीनें पायांत पायजमा घातला आहे. अंगांत सरदारी झगा व त्यावर जांभळट रंगाचें जाकीट घातलें आहे. डोकीस टोपी घालून वर पागोट्यासारखी बत्ती बांधली आहे. कंबर जरीच्या दुपेट्यानें कसली आहे. आणि कंबरेला तलवार लटकत ठेविली आहे.

या दरबारांत तो पहा एक युरोपियन येऊन बसला. त्याच्यामागें ते गोरे शिपाई उभे राहिले. तो युरोपियन आतां उभा राहिला. त्यानें आपली नजर

चौफेर टाकली. पडदापोशीच्या जागेंत बसलेल्या त्या व्यक्तीकडे पाहिलें आणि तो आपल्या हातांतील कागद वाचूं लागला—
लॉर्ड डलहौसीचा जाहीरनामा,

मेजर डी. ए. मालकम पोलिटिकल एजंट ग्वाल्हेर, बुंदेलखंड, रेवा यांजकडून प्रसिद्ध केला जातो ऐसाजे—

" झांशीचे महाराज गंगाधरराव नेवाळकर हे तारीख २१ नोव्हेंबर १८५३ रोजीं मरण पावले. त्यांनीं मरणापूर्वीं दामोदरराव यांस दत्तक घेतलें आहे. परंतु नामदार ग. ज. साहेब यांनीं तें दत्तविधान नामंजूर केल्यामुळें हिंदुस्थान सरकारचे सेक्रेटरी यांजकडून ता. ७ मार्च १८५४ चा हुकूम असल्याप्रमाणें झांशी संस्थान ब्रिटीश सरकारचे अमलांत सामील करण्यांत आलें आहे. ह्याकरितां झांशी संस्थानांतील सर्व प्रजाजनांनीं आपण ब्रिटीश सरकारचे अमलाखालीं आलों आहोंत, असें समजून मेजर एलिस साहेबांस वसूल देत जावा आणि सुखी व संतुष्ट असावें. "

" मेरी झांशी नहीं देऊंगी "

पडदापोशीच्या जागेंतील व्यक्ति विजेसारखी कडाडली.

" संस्थान खालसा केलें आहे. "

ती युरोपियन व्यक्ति निश्चयानें उद्गारली.

पडदापोशीच्या जागेंतील ती व्यक्ति कोण ?

झांशीची राणी लक्ष्मीबाई.

आणि ती युरोपियन व्यक्ति कोण ?

पोलिटिकल एजंट एलिस साहेब.

झांशीची राणी लक्ष्मीबाई मानी होती. शूर होती. म्हणून

" खालसा जहाली झांशी "
हे झोंबले शब्द लक्ष्मीशीं
आणि बोलली रेसिडेंटाशीं
" देणार नाहीं कोणाशीं आवडती झांशी माझी "

झांशी प्रांत पहिल्या बाजीराव पेशव्यापासून मराठ्यांकडे होता. त्या प्रांतावर पेशव्यांनीं रघुनाथ हरी नेवाळकर नांवाच्या गृहस्थास वंशपरंपरा सुभेदार नेमिलें होतें. पुढें सन १८३७ सालीं गंगाधरराव नेवाळकर झांशीच्या गादीवर बसले. याच गंगाधररावाशीं मोरोपंत तांबे यांची मुलगी मनुताई हिचा विवाह सन १८४२ सालीं झाला आणि मनुताईला झांशीची राणी लक्ष्मीबाई हें पद प्राप्त झालें.

गंगाधररावांचा कारभार अत्यंत सुखावह होता. त्यांचें वैभवहि वाखाणण्यासारखें होतें. वीस लाख उत्पन्नाच्या ह्या राज्यांतील प्रजा सुखी होती. राजवैभहि डोळ्यांत भरण्यासारखें होतें. राजवाडयापुढें बावीस हत्ती झुलत होते. महाराजांच्या खाशास्वारीचा म्हणून 'सिद्धबकस' नांवाचा जो एक गजराज होता; त्यावरील सर्व अलंकार, अंबारी, हौदा सुवर्णाचा होता.

गंगाधररावांचें झांशीच्या आसपासच्या इतर संस्थानिकांवर फार वजन होतें. ते गंगाधररावांस मोठ्या बहुमानानें 'काका' म्हणत.

—अशा प्रेमळ महाराजांच्या सहवासांत लक्ष्मीबाईचा काळ मोठ्या मजेंत जात असतां, सन १८५१ सालीं त्यांना पुत्ररत्न झालें.

पण दुर्दैवानें तें तीनच महिन्यांनीं काळाच्या भक्षस्थानीं पडलें !
दुःखाचा डोंगर कोसळला !

महाराजांची प्रकृति ढांसळली. ते वारंवार आजारी पडूं लागले. त्यांना आयुष्याची शाश्वती वाटेना. आतां आपण फार दिवस जगणार नाहीं; असें त्यांच्या मनानें घेतलें आणि दरबारी मंडळी व पोलिटिकल एजंट यांच्या सल्ल्यानें त्यांनीं मोठ्या समारंभपूर्वक आपल्या वंशांतील मुलगा दत्तक घेतला.

दत्तक मुलाचें नांव दामोदर ठेवण्यांत आलें.

पुढें थोडयाच दिवसांनीं ता. २१ नोव्हेंबर रोजीं गंगाधरराव कालवश झाले. आतां दामोदरराव झांशीचे महाराज !

पण डलहौसीनें एक जाहीरनामा काढून झांशी संस्थान खालसा केलें. गंगाधररावांनीं घेतलेला दत्तक डलहौसीने नामंजूर केला.

डलहौसीच्या राजमेधांत पहिली आहुति सातारच्या गादीची पडली. सातारची गादी सन १८४८ सालीं खालसा केली. सातारच्या मागोमाग नागपूर····वगैरे राज्यांच्या आहुत्या पडल्या. पण यापैकीं झांशीच्या राज्याची राणी लक्ष्मीबाई हिनेंच इंग्रजांना दातीं तृण धरावयास लाविलें. राज्य खालसा झालें म्हणून ही शूर राणी दुःख करीत बसली नाहीं आलेल्या प्रसंगाला तोंड कसें द्यावें ह्याचें, तिला पूर्ण ज्ञान होतें. ती कर्तृत्ववान होती.

असाच एक प्रसंग राणी लक्ष्मीबाईच्या कर्तृत्वशक्तीला वाव देणारा उद्भवला.

सन १८५७ सालीं स्वातंत्र्य संग्राम सुरू झाला. इंग्रजांची भारतांतील सत्ता उडवून देण्यासाठीं पहिला स्फोट झाला.

या स्फोटाची तयारी पुष्कळ वर्षांपासून चालली होती आणि त्याला जीं अनेक कारणें होतीं, त्यांपैकीं राज्यें खालसा करणें, दत्तक नामंजूर करणें, भारतांतील राजे लोकांत भांडणें लावणें, आणि ‘ दोघांचें भांडण तिसऱ्याचा लाभ ’ या न्यायानें आपलें कार्य साधणें, हीं प्रमुख कारणें होतीं. यामुळेंच भारतांतील राजेरजवाडे, सरदार, मानकरी, इंग्रज सत्तेला नाराज झाले होते. नानासाहेब पेशवे तर सगळ्या राजेरजवाड्यांशीं इंग्रजांस भारतांतून घालवून देण्याविषयीं गुप्त खलबतें करीत होते. त्यांच्या नाशाचे बेत रचीत होते. शिवाय सन १८५७ च्या स्वातंत्र्य युद्धास आणखी एक कारण घडलें, तें म्हणजे काडतूस प्रकरण. हें काडतूस प्रकरण २९ मार्च १८५७ रोजीं घडलें. डमडम येथील नवीन कारखान्यांत तयार केलेलीं काडतुसें बऱ्हाणपूर येथील न. १९ च्या पलटणीस वाटलीं जात असतां, तीं शिपायांनीं घेण्याचें नाकारलें ! काडतुसें गाईची व डुकराची चरबी लावलेलीं असून तीं उपयोगांत आणतांना त्यांचीं टोपणें दातांनीं काढावीं लागतात, अशी अफवा जिकडे तिकडे पसरली. ह्यामुळें हिंदू-मुसलमान सैनिक बिथरले. बऱ्हाणपूरच्या पलटणींतील शिपायांनीं काडतुसें घेण्याचें नाकारल्यामुळें त्यांस शिक्षा देण्यांत आली. मीरत येथील ८५ शिपायांस दुसऱ्या कसल्याशा कारणावरून कठोर शिक्षा देण्यांत आली.

या शिक्षेमुळें शिपायांत असंतोष माजला आणि रविवार ता. ३१ मे १८५७ रोजीं रात्रीं १२ वाजतां एकसमयावच्छेदें करून भारताच्या स्वातंत्र्याचा झेंडा उभारावयाचा आणि उठावणी करावयाची असें ठरलें असतांहि, तत्पूर्वींच २१ दिवस अगोदर म्हणजेच १०, मे रोजीं लष्करानें युद्धाची उठावणी केली.

मीरतच्या फौजेनें प्रथम उठावणी केली आणि मग क्रमाक्रमानें लाहोर, दिल्ली, काल्पी.... ..वगैरे ठिकाणीं तिचें लोण पोचलें. कानपूरला तर कहर झाला. इंग्रज कापले जाऊं लागले.

झांशीला प्रथम शांतता होती पण इतर ठिकाणचें लोण झांशी येथेंहि पोचलें. ता. ७ जूनला युद्धाचा डोंब उठला.

इंग्रज अतिशय घाबरले. आम्हांला आपल्या राजवाड्यांत आश्रय द्या. आमच्या बायकामुलांचें रक्षण करा, अशी विनंति त्यांनीं राणीस केली.

राणी थोर मनाची. तिनें इंग्रजांस आश्वासन दिलें, कीं "आमच्यापाशीं फौज फांटा नाहीं. तरीपण तुम्हांस जितकें सहाय्य करतां येईल तितकें सहाय्य आम्ही करूं."

इंग्रज राणीच्या आश्रयास आले. त्यांनीं आपलीं बायकामुलें झांशीच्या किल्ल्यांत ठेविलीं.

राणी लक्ष्मीबाईनें इंग्रजांस शक्य तितकें संरक्षण दिलें.

क्रांतिकारकांची चढाई तर जोरांत चाललीच होती.

इंग्रजांनीं हातपाय गाळले. भारतांतील आपला अंमल जवळ-जवळ नाहींसा होतच आला, असें त्यांस वाटूं लागलें आणि त्यांनीं राणीला आणखी एक विनंति केली.

• शांतता होईपर्यंत झांशी संस्थानची व्यवस्था आपण हातीं घ्यावी.

राणी लक्ष्मीबाईनें इंग्रजांची विनंति मान्य केली. ती झांशीचा राज्यकारभार पाहूं लागली. प्रजेला अतिशय आनंद झाला. पूर्वींचे सरदार, मानकरी एकत्रित आले.

पण आतां एक नवीनच मोठें संकट आलें. बुंदेलखंडांतील एक सरदार नथेखां हा वीस हजार सैन्य घेऊन झांशीवर चालून आला.

राणी लक्ष्मीबाईनें सैन्याची जमवाजमव केली आणि तिनें नथेखांच्या सैन्याची दाणादाण केली. राणीच्या पराक्रमचा बोलबाला सुरू झाला. पण नथेखांला मात्र ही गोष्ट जाचूं लागली. राणीचा सूड या ना त्या मार्गानें घेतलाच पाहिजे, असें त्याच्या मनानें घेतलें.

दिवस क्रांतियुद्धाचे. राणीच्या पदरीं बरेंच सैन्यहि त्यावेळीं होतें. या संधीचा फायदा नथेखानें घेतला. त्यानें इंग्रजांस खोटेंच कळविलें कीं,

" झांशीच्या राणी लक्ष्मीबाईनें प्रचंड सैन्य जमविलें असून ती क्रांतियुद्धवाल्यांस सामील आहे. तिनें इंग्रज सरकारच्या विरुद्ध लढण्याचें निश्चित केलें आहे.

इंग्रजांस हें खरेंच वाटलें आणि सर ह्यू रोज यानें आपल्या सैन्यानिशीं झांशीवर चाल केली. त्यानें झांशी शहरास वेढा दिला व राणीस निरोप पाठविला कीं,

" आपण स्वतः, आपले लक्ष्मणराव दिवाणजी, मोरोपंत व इतर प्रमुख अशा आठ माणसांसह आम्हास दोन दिवसांत येऊन भेटावें. कोणतेंहि हत्यार बरोबर आणूं नये."

हा निरोप स्वाभिमानी राणीला अत्यंत अपमानकारक वाटला. तरी पण तिनें पुढीलप्रमाणें उत्तर पाठविलें,

" आपण कशाकरितां बोलाविलें आहे व दगा होईल किंवा नाहीं, याचा कांहींच खुलासा नाहीं. संस्थानचे चालीप्रमाणें हत्यारबंद लोक बरोबर घ्यावयाचे ते घेऊन दिवाणजी भेटीस येतील. मी बायको माणूस, माझें येणें होणार नाहीं "—हा निरोप म्हणजे एक प्रकारचें लढाईचें आव्हानच होतें. राणी कांहीं भित्री नव्हती. तिनें युद्धाचें कंकण बांधलें. आपल्या सैन्यांची नीट जुळवाजुळव केली. दारुगोळा तयार करण्याचे कारखाने सुरू केले. कोठारें भरूं लागलीं. किल्ल्यांत रसदीचा सांठा होऊं लागला. किल्ल्याच्या तटांची डागडुजी तिनें स्वतःच्या देखरेखीखालीं करविली. तोफांना मोर्चे लाविले.

युद्धास तोंड लागलें. तोफा आगीचे गोळे ओकूं लागल्या. इंग्रजांस सळो

कीं पळो होऊन गेलें. राणीच्या ' घनगर्ज ' ' कडक बिजली ' या तोफांनीं तर आपल्या पराक्रमाची शर्थ केली.

सात दिवस युद्ध चाललें.

तात्या टोपेचें पंधराशें सैन्य काल्पीच्या बाजूनें राणीच्या मदतीला येत होतें. त्याच्या सैन्यांत शिस्त नव्हती, त्यामुळें इंग्रजांनीं तिळा सहज उधळून दिलें. राणीच्या सैन्याचाहि जोर दिवसें दिवस कमी होऊं लागला. दहा दिवस राणीच्या सैन्यानें पाय मागें घेतला नाहीं. पण अकराव्या दिवशीं तिच्या सैन्यानें कच खाल्ली. पण स्वतः राणी लक्ष्मीबाई मात्र खचली नाहीं. कचरली नाहीं. कीं हताश झाली नाहीं. कारण तिच्याजवळ ' स्वातंत्र्य ' हा एकच आशेचा शब्द होता. आणि या एका शब्दाच्या शक्तीमुळें इंग्रजांस झांशी सर होत नव्हती. त्यांचा झांशींत प्रवेश होत नव्हता.

अकराव्या दिवशीं मात्र इंग्रजांचा हेतु कांहींसा साध्य होतो कीं काय, असें वाटलें. कारण या दिवशीं किल्ल्याच्या तटावरील टेहळण्याला हजारों मजूर डोकीवर गवताचे भारे घेऊन शहराच्या तटाकडे येत आहेत, असें दिसलें. पहातां पहातां ते भारेवाले अगदीं तटाजवळ आले. या भारेवाल्यांच्या आश्रयानें मागें, बाजूनें लपत छपत गोरे शिपाईहि आले.

भारेवाले तटाजवळ येतांच त्यांनीं आपल्या जवळील भारे एकावर एक भराभर रचले आणि त्यांचा जिन्यासारखा उपयोग करून दहा-पंधरा मिनिटांतच ते हजारों गोरे शिपाई शहराच्या दक्षिण तटावर दिसूं लागले !

ही बातमी राणी लक्ष्मीबाईच्या कानावर जातांच तिनें एक हजार निवडक सैन्य घेतलें. स्वतः मर्दानी पोषाख केला. हातांत नंगी तलवार घेतली व ती रणदेवता—ती सिंहीण किल्ल्यावरून शहराच्या तटाकडे गेली. तिनें तिथें पराक्रमाची शर्थ केली पण बंदुकांपुढें तलवारींचा पराक्रम फिका पडला. राणी लक्ष्मीबाईला किल्ल्यांत माघारें यावें लागलें.

राणी लक्ष्मीबाई किल्ल्यांत आली. तिनें आपल्या सर्व दरबारी व इतर प्रमुख मंडळीला बोलाविलें आणि ती म्हणाली—

"मी तुमचा हा अखेरचा निरोप घेत आहें. इंग्रजांचें सैन्य शहरांत आलें. आतां आपला प्राण वांचविण्याचा ज्याला जो उपाय सुचेल त्यानें तो करावा. मी वाड्यांत दारूगोळा भरून जोहार करणार आहें."

राणी सरकार, असें कसें करतां येईल आपणाला. आपण शूर आहांत. शूरांनीं आत्महत्या करणें उचित नाहीं. आपण असा विचार मनीं आणला तर आम्ही काय करावें ! राणीसाहेब, आतां आपण किमपीहि दुःख न करितां रात्रीं शत्रूची फळी फोडून निघून जावें."

ऐंशीं वर्षांच्या वृद्ध पुढाऱ्याचा हा सल्ला राणीस पसंत पडला. तिनें या सल्ल्याप्रमाणें वागण्याचें ठरविलें.

राणीनें स्वतः मर्दानी पोशाख चढविला. तारेचें चिलखत घातलें. जंबिया, तलवार हीं हत्यारें कंबरेला लटकाविलीं. आपल्या नऊ वर्षांच्या दत्तक मुलास पाठीशीं बांधलें.

नंतर तिनें आपल्या कुलस्वामिनीस नमस्कार केला. वडिलांस नमस्कार केला. किल्ल्याला नमस्कार केला व आपल्या आवडत्या राजरत्नासह घोड्यावर ती स्वार झाली.

ती रात्रीं बाराची वेळ होती. राणी आपल्या कांहीं विश्वासू मंडळीसह 'हरहर महादेव' अशी गर्जना करून किल्ल्याखालीं उतरली. शहराच्या दरवाजाजवळ आली.

शहराच्या दरवाजाजवळ गोऱ्या शिपायांचा पहारा होता. त्यांनीं राणी आणि तिच्याबरोबर असलेल्या मंडळीस जेव्हां अडविलें, तेव्हां आपणच काळाच्या तोंडांत आलों, असें या मंडळीस क्षणभर वाटलें, पण तें क्षणभरच !

राणी लक्ष्मीबाई त्या गोऱ्या पहारेकऱ्यांस म्हणाली, आमचें हें तेहरी संस्थानचें सैन्य इंग्रजांच्या मदतीस चाललें आहे. आम्हाला येथून लवकर पार झालें पाहिजे.

त्या गोऱ्या पहारेकऱ्यांस तें खरें वाटलें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वीकृत.



अनुक्रम ............ वि: ............
क्रमांक ............ नों: दि: ............

आणि मग राणी लक्ष्मीबाई आपल्या बरोबरच्या मंडळीसह शहराचा दरवाजा पार झाली.

राणीनें घोड्यास टांच दिली. घोडा वाऱ्याच्या वेगानें निघाला आणि राणी मध्यरात्रीच्या सुमारास काल्पीस पोंचली !

सकाळीं राणीनें आपला मर्दानी पोशाख उतरला व ती श्रीमंत नानासाहेब पेशव्याच्या भेटीस गेली. तिनें आपली समशेर पेशव्यापुढें ठेविली आणि ती म्हणाली,

> " ही तलवार तुमच्या पूर्वजांनीं आम्हाला दिली. तिचा आम्ही आजपर्यंत उपयोग केला. आतां तुमचें आम्हांला सहाय्य राहिलें नाहीं, यास्तव ही परत घ्यावी. "

हें ऐकून नानासाहेब अतिशय सद्गदित झाले. थोडे गोंधळले आणि म्हणाले, " आपण झांशीला असामान्य पराक्रम दाखविलांत, तेव्हां ही समशेर परत घेऊन आमच्या सैन्याचें आधिपत्य आपण स्वीकारावें."

राणीनें तें मान्य केलें.

नानासाहेब पेशव्यानीं आपले तीनशें स्वार राणी लक्ष्मीबाईच्या स्वाधीन केले.

राणी लक्ष्मीबाईनें पुन्हा इंग्रजाशीं सामना देण्याचें ठरविलें. तिनें आपला मर्दानी पोशाख पुन्हा चढविला. हातांत समशेर घेतली आणि ती आपल्या सैन्यासह इंग्रज सैन्यावर तुटून पडली !

राणी लक्ष्मीबाईची समशेर यावेळीं विजेसारखी चमकत होती. शत्रूसैन्याचे क्षणाक्षणाला बळी घेत होती. जणुं कांहीं तिला रक्ताची एकसारखी तहान लागली होती. यावेळीं राणी लक्ष्मीबाईला कुणाचें बळ आलें होतें ? कुणाची चपळता आली होती ? कुणाची दृढनिश्चयता मिळाली होती ? हें सांगता येणें कठीणच !

राणी लक्ष्मीबाई जी यावेळीं इंग्रजाशीं लढली, ती एकाच शक्तीमुळें. कोणती शक्ति ती ?

माझा भारत देश! माझी भारत माता!!

माझा भारत देश स्वतंत्र असला पाहिजे. ह्या एकाच इच्छेच्या शक्ती-वर राणी लक्ष्मीबाई लढत होती. पण तिच्या सैन्यांत शिस्त नव्हती. थोड्याच दिवसांपूर्वीं—याच स्वातंत्र्य युद्धांतील सुमारें वीस हजार सैनिक शिस्तीच्या अभावींच इंग्रजांनीं पराभूत केले होते.

आजहि तोच प्रसंग.

राणी लक्ष्मीबाईच्या पराक्रमाला तिच्या सैन्याचें शिस्तीअभावीं सहाय्य मिळालें नाहीं. सैन्य केव्हांच विस्खळीत झालें. त्याची पांगापांग झाली. आणि तें पराभूत झालें; त्यामुळें राणीला रणमैदान सोडण्याशिवाय दुसरा मार्ग उरला नाहीं.

म्हणूनच तिनें घोड्यास टांच दिली आणि इंग्रजांची फळी फोडून ती वायुवेगानें तिथून निसटली!

राणीचा घोडा वाऱ्याच्या वेगानें पळतो आहे.

इंग्रज स्वार पाठीशीं आहेत.

वेळ म्हणते आहे, राणीला या संकटांतून निसटून जाऊं द्या. पण काळ म्हणतो आहे, मी तिचा बळी घेणार!! ती माझ्या जबड्यांत सांपडूं द्या.

हाय रे दैवा! काळालाच संधि सांपडली!

वाटेंत ओढा आडवा आला. घोडा थबकला. तो पुढें पाऊलच टाकीना.

मागून इंग्रज स्वार येत आहेत.

हं चल! राणीनें घोड्याला टांच दिली पण घोडा पाय उचलीच ना!

मागून इंग्रज स्वार येत आहेत.

आले! इंग्रज स्वार आले.

काळानें संधि साधली.

इंग्रज स्वारांनीं राणी लक्ष्मीबाईवर समशेर चालविली.

समशेरीला समशेर भिडली.

समशेरींचीं तोंडें रक्तानें माखलीं.

राणी लक्ष्मीबाईला वर्मी घाव लागला.

ती जमिनीवर कोसळली !

राणी मृत झाली ?

नाहीं. तिची इच्छा पूर्ण झाली नाहीं म्हणूनच मृत्यु रेंगाळत राहिला.

इंग्रज स्वारांना मात्र वाटलें, राणी मृत झाली.

म्हणून ते तेथून निघून गेले.

पण राणीच्या अंगांत थोडी 'धुगधुगी' होती. रामचंद्रराव हा एकनिष्ठ सेवक जवळ होता. त्यानें सुश्रुषा करण्याचा प्रयत्न केला पण जबर जखमामुळें त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं.

मृत्युपूर्वी राणी लक्ष्मीबाईनें आपली शेवटची इच्छा सांगितली—

'माझ्या शवाला इंग्रजांचा स्पर्श होऊं देऊं नका.'

रेंगाळणाऱ्या मृत्यूनें झडप घातली.

ता. १८ जून १८५८ रोजीं भारताला भूषविणारें हें वीररत्न आपल्या पराक्रमाची स्फूर्ति मागें ठेवून निघून गेलें.

म्हणून आजहि झांशीच्या राणी लक्ष्मीबाईचे पोवाडे शाहीर अभिमानानें गात आहेत. कवि काव्यें रचित आहेत. कीर्तनकार गुणगान करीत आहेत. इतिहासकार चरित्रें लिहीत आहेत.

आणि भारतीय जनता या शूर राणीपासून स्फूर्ति घेत आहे.

भारताला भूषविणाऱ्या आणखी ज्या एका वीररत्नापासून भारतीय जनता स्फूर्ति घेत आहे. तें वीररत्न आपल्या बांधवांस याच वेळीं काय सांगत आहे, ऐका.

● ● ●



## ५ • देशासाठीं दिव्य

" **बं**धूनो, उठा उठा. यत्किंचितहि कच खाऊं नका. आपल्या स्वातंत्र्यास्तव शत्रूवर आपण तुटून पडूं या. "

—असे जळजळीत शब्द ज्याच्या तोंडांतून बाहेर पडले तो कोण ?

मंगलपांडे.

आणि तो कोणावर तुटून पडणार होता ?

इंग्रजांवर.

मंगलपांडे मोठा करारी शिपाई गडी ! जातीनें ब्राह्मण पण वृत्तीनें क्षत्रीय. इंग्रजांच्या १९ व्या तुकडींत शिपाई म्हणून तो बरेच दिवस काम करीत होता. त्यानें आतांपर्यंत इमानें इतबारें नोकरी केली होती पण आतां ?

आतां त्याचा इंग्रज शत्रू झाला होता.

आणि त्याचें कारणहि तसेंच घडलें होतें.

इ. स. १८५७ च्या सुमारास इंग्रजांनीं भारतांतील राजेरजवाडे, सरदारदरकदार यांना या ना त्या कारणानें दुखविलें होतें. इंग्रजी

शिकून जी नवी पिढी तयार होत होती, ती इंग्रजी सत्तेमुळें आपल्या भारताचें हीत होत आहे का ? याविषयीं विचार करूं लागली होती. सामान्य जनतेला पारतंत्र्य म्हणजे काय ह्याची जाणीव होण्यास आरंभ झाला होता आणि त्याबरोबरच इंग्रजांविषयीं द्वेष निर्माण झाला होता.

एकदां असें झालें कीं,

एक मौलवी अतिशय आजारी होता. त्याला धड उठून बसतांहि येत नव्हतें. म्हणून त्याचा एक इंग्रज मित्र त्याच्या भेटीसाठीं गेला आणि उशालगत जाऊन बसला. कांहीं वेळानें त्या इंग्रज मित्रानें मौलवीला विचारलें, ' मित्रा, तुझी अंतिम इच्छा काय आहे ?' तेव्हां तो मौलवी थोडा विचार करून म्हणाला, 'माझी इच्छा ! मित्रा काय सांगूं तुला ! ! पण मला एका गोष्टीबद्दल अतिशय दुःख मात्र होत आहे ! '

इंग्रज मित्रानें उत्सुकतेनें विचारलें, ' कोणती गोष्ट ती ?'

' मित्रा, मी माझ्या आयुष्यांत एकाहि इंग्रजास ठार मारूं शकलों नाहीं; ही गोष्ट ती ! '

अशा प्रकारें लोकांत इंग्रजांबद्दल द्वेष निर्माण झाला होता. लोकांतच काय पण सैनिकांतहि.

या सगळ्याचा परिणाम अप्रत्यक्षपणें मंगल पांड्याच्याहि मनावर झाला. पण याशिवाय आणखीहि एक कारण घडलें, तें म्हणजे सैनिकांस चरबीनें माखविलेलीं काडतुसें देण्याचें ! सैनिकांना जीं काडतुसें देत, तीं बरेच दिवस चांगल्या स्थितींत रहावीं म्हणून एकप्रकारच्या चरबीनें माखविण्यांत येत.

आणि चरबीनें माखविलेल्या अशा काडतुसांचीं टोपणें दांतानें तोडून काढावीं लागत व मगच त्या काडतुसांचा उपयोग करतां येई.

अशा या काडतुसांबद्दल असें झालें—कलकत्त्याजवळ असलेल्या डमडम गांवांतील एक ब्राह्मण सैनिक पाण्यानें भरलेला लोटा हातांत घेऊन आपल्या छावणीकडे चालला होता. त्याचवेळीं तिथें एक भंगी आला आणि म्हणाला, ' जमादारसाहेब, मला फार तहान लागली आहे. पाणी प्यायला द्या. आपले फार उपकार होतील.'

त्याबरोबर तो ब्राह्मण सैनिक खवळला आणि म्हणाला, ‘ पाणी कुठचें ! पण तुझ्या स्पर्शानें माझा लोटा मात्र अपवित्र होईल. ’

मग तो भंगी थोडाच गप्प राहातो. तोहि म्हणाला, ‘ कशाला राव आतां एवढा जातीचा अभिमान बाळगतां ? तुम्हाला माहीत आहे काय, यापुढें सैनिकांना गाईची आणि डुकराची चरबी स्वतःच्या दातांनीं तोडावी लागणार आहे हें, आणि मग तुमचा हा पाण्यानें भरलेला लोटा पवित्र राहील का ? ’

हां हां म्हणतां ही बातमी सगळ्या सैनिकांत पसरली. आणि मग--

धर्माकरितां मरावें, मरोनि अवघ्यांसि मारावें
मारितां मारितां घ्यावें, राज्य आपुलें.

धर्म आणि राज्य यासाठीं देहाची आहुति द्यावी लागली तरी बेहत्तर ! अशीं सगळ्याच सैनिकांचीं मनें तयार झालीं. बराकपूरच्या सैनिकांनीं तर हीं नवीं काडतुसें वापरण्याचें साफ नाकारलें.

पण इंग्रज काय गप्प बसणार थोडाच ! त्यानें या हट्टी शिपायांस नोकरींतून काढून टाकण्याचें ठरविलें. त्यानें तसें केलेंहि !

सैन्यांत असंतोष पसरला. सरदारदरकदारांत, जनतेंत असंतोष झालाच होता. इंग्रजी सत्तेविरुद्ध मोठी लाट उसळली.

मंगल पांडे तर हातांत भरलेली बंदूक घेऊन सगळ्यांना सांगत सुटला—

‘ अरे, स्वस्थ काय ! उठा. आपल्या शत्रूवर तुटून पडूं या. अरे, धर्माकरितां मरावें. मरोनि अवघ्यांसि मारावें. मारितां मारितां घ्यावें, राज्य आपुलें. ’

मंगल पांड्याचें हें सांगणें सगळ्यांना पटलेंच होतें. म्हणूनच त्याच्या या हांकेला ‘ ओ ’ देऊन, मारूं किंवा मरूं या निर्धारानें हजारों सैनिकवीर धांवत आले.

इंग्रजांविरुद्ध सैनिक हातांत शस्त्र घेऊन उठले.

मंगल पांडे आणि त्याचे साथीदार इंग्रजांच्या रक्तानें माखलेल्या तलवारी हातांत घेऊन फिरूं लागले.

तो–तो पहा मंगल पांडे.

त्याला पकडण्यासाठीं सार्जेंट ह्यूसननें गोऱ्या सनिकांना हुकूम दिला.

पण कोण पुढें येतो आणि मंगल पांड्याला पकडतो! सिंहाला पकडणें सामान्य गोष्ट का आहे?

मंगल पांड्याच्या हातांत बंदूक होतीच. तिची गोळी ह्यूसनच्या छातींत घुसली. ह्यूसन कोसळला!

एकच का ह्यूसन कोसळला?

नाहीं. एक, दोन, तीन, चार अनेक इंग्रज सैन्याधिकाऱ्यांना मंगलनें खिस्तवास दाखविला. आणि मग रक्तानें माखलेला आपला एक हात वर करून तो मोठमोठ्यानें ओरडून सांगूं लागला. "उठा उठा आणि शत्रूचा निःपात करा. उठा."

"चला पुढें, चला पुढें, चला पुढें
रोवूं चला दिल्लीवर विजयी झेंडे."

अरे पांडे, तो पहा तुला पकडायला गोरा अधिकारी आला.

काय काडतुसें संपलीं! म्हणून तूं तलवार उपसलीस! त्या गोऱ्या अधिकाऱ्याचें शीर धडा वेगळें केलेंस! शाबास!! अरे पण तो पहा दुसरा, तो पहा तिसरा गोरा तुझ्यावर चालून आला. येऊं दे. येऊं दे आणि आपल्या प्राणाला मुकूं दे.

अरे, पण तुझे ते देशप्रेमानें भारावलेले सैनिकमित्र त्या गोऱ्यांना काय म्हणत आहेत, ऐक–ऐक!

'मंगल पांड्याच्या अंगाला हात लावाल तर लक्ष्यांत ठेवा!'

'या शूर वीराच्या केसाला धक्का आम्ही लावूं देणार नाहीं.'

पण तो एक गोरा अधिकारी हिअरसन आला. गोरे सैनिक घेऊन आला. 'मंगल पांडे, आतां तुला काय वाटतें?'

'—मी कदाचित त्याच्या हातीं सांपडेन.'

अरे, म्हणूनच का तूं आपली बंदूक आपल्याच छातीवर उडवून घेतलीस?

मंगल काय केलेंस हें! बंदूक जरा चुकली म्हणून बरें. नाहीं तर! नको, नकोच ती कल्पना!!

सिंहा, शत्रूच्या हातीं सांपडण्यापेक्षां मरण बरें, असें तुला वाटलें? होय ना?

आतां या घायाळ स्थितींत तुला रुग्णालयांत नेण्यांत येत आहे. तेथें तूं लवकर बरा हो आणि आपल्या देशभक्तीला—देशप्रीतीला उजाळा देण्यास परत सिद्ध हो.

पण—पण भविष्य काळांत काय वाढून ठेविलेलें आहे, हें कोण सांगूं शकेल ! तुझ्या वांट्यास काय येणार आहे, हें कोण सांगूं शकेल ! !

क्षूद्र विचाराच्या जुलमी सत्तेला सोकावलेल्या गोऱ्या लोकांनीं मंगळ पांडयाला फांशीची शिक्षा सांगितली. मंगल पांड्यांच्या वांट्याला फांस !

जा. मंगल जा. आनंदानें जा. देशासाठीं—देशाच्या स्वातंत्र्यासाठीं झगडणाऱ्या वीरा, तूं फांसाकडे खुशाल हंसतमुखानें जा.

आज ८ एप्रिल १८५७

मंगल हंसतमुखानें फांसाकडे चालला.

गेला. फांसाजवळ जाऊन उभा राहिला.

पण बराकपूरचे ते मांग; मंगलला फांशी देण्यास तयार होत नाहींत. मांग झाले म्हणून का त्यांना अंतःकरणें नाहींत. आपल्या देशासाठीं झगडणाऱ्या आपल्याच बांधवांस फांशी द्यावयास ते कसे तयार होतील !

गोऱ्यांचा नाइलाज झाला. पण आतां त्यांनीं कलकत्त्याहून मांग आणले. ते मंगल पांड्याला फांशी देण्यासाठीं आणले !

जा. वीरा मंगला जा. तुझ्या देशासाठीं तूं हें दिव्य केलेंस आणि फांसावर चढलास.

वीरा देशभक्ता मंगलपांडे, राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठीं आपण देह खर्ची घातला याचें तुला समाधान होईल. स्वातंत्र्यानंतरच्या वातावरणांत तुझे बांधव वावरतांना पाहून तूं समाधानाचा सुस्कारा सोडशील.

मंगलपांडे, तुझें नांव उच्चारतांच सारेजण आपली मान वांकवितील आणि हात जोडतील.

मंगला, भारताच्या स्वातंत्र्यासाठीं हंसतमुखानें फांसावर चढण्यास तयार होतोस. जा. खुशाल जा.

सारे तुझें गीत गातील.

> नैवेद्याची भूक लागली क्रांति देवतेला ।
> पंचप्राण अर्पुनी मंगल हुतात्मा झाला ॥

● ● ●



## ६ • तुझे चरणीं आमचे अश्रु !

माझ्या मित्रानो, सत्तावन्नच्या क्रांतियुद्धांत आणखी ज्या एका वीरपुत्रानें भारत मातेची मनोभावें पूजा केली, त्या वीरपुत्राचें नांव पीरअली.

पीरअली या नांवावरून तुम्ही ओळखलें असेल कीं, हा मुसलमान बांधव असावा आणि हें खरेंच आहे. पीरअली हा एक मुसलमान बांधव होता.

अठराशें सत्तावनच्या क्रांतियुद्धाच्या वेळीं हा मानी वीर होऊन गेला. भारताच्या दास्यशृंखला तटातट तोडून भारत स्वतंत्र करण्यासाठीं या वीरानें जिवाचें रान केलें. जीव तृणवत मानला.

आमचा हा पीरअली मूळचा एक साधासुधा पुस्तकविक्या. पाटणा शहरांत कुठेसें त्याचें लहानसें दुकान होतें. दुकानांत बसावें आणि कोणी गिऱ्हाईक आलें तर त्याला पुस्तकें विकावीं; नाहींतर दुकानांतीलच एखादें पुस्तक घेऊन वाचीत बसावें. त्याच्या वाचनाचा भर मुख्यतः देशभक्तीनें ओथंबलेल्या, क्रांतीच्या वर्णनांनीं भरलेल्या, शूरांचीं चरित्रें सांगितलेल्या,

स्वातंत्र्याचें महत्त्व गाइलेल्या अशाच पुस्तकांवर होता; त्यामुळें झालें काय, तर पीरअलीला पारतंत्र्याचा तिटकारा येऊं लागला. अंगाला डसलेल्या पारतंत्र्य-रूपीं इंगळ्याला केव्हां एकदां झटकून टाकतों, असें त्याला वाटूं लागलें. भारतावर हजारों मैलांवरून मूठभर गोरे सत्ता गाजवितात, हें पाहून त्याच्या आंतड्यांना पीळ पडूं लागला. आपला प्रिय भारत स्वतंत्र व्हावा; यासाठीं पीरअली एकसारखा तळमळूं लागला. स्वातंत्र्यासाठीं त्याचें मन एकसारखें ओढ घेऊं लागलें. अंगांतलें रक्त सळसळूं लागलें. गोरा दिसला कीं, पीरअलीच्या तळव्याची शीर मस्तकांत जाऊं लागली.

इंग्रजांनीं राजे महाराजे, शिपाई‥ ‥वगैरे सर्वांनाच दुखविलें होतें. या सर्वांच्याच शेपट्यांवर त्यांनीं अकारण पाय दिला होता. इंग्रजांच्या हें लक्षांत आलें नाहीं कीं, सर्पांच्या शेपट्यांवर पाय दिले तर ते आपल्यावर उलटतील. आपला नाश करतील.

पण इंग्रजांच्या जरी हें लक्षांत आलें नाहीं, तरी भारतांतील सारी जनता शांत राहिली नव्हती. ती इंग्रजांना पाण्यांत पहात होती. क्रांतीची भाषा बोलत होती. छे ! बोलत होती म्हणण्यापेक्षां क्रांतीचीं पथकें उभारीत होती

"गर्जा जयजयकार क्रांतीचा गर्जा जयजयकार"—असें एकमेकांना सांगत होती.

क्रांतिपथकांच्या दररोज मसलती होत होत्या. या मसलतींत आमचा हा पीरअली नेहमीं असावयाचाच. म्होरक्याच होता तो, असें म्हटलें तरी चालेल.

पीरअली बोलण्यास सफाईदार. याचें बोलणें लोकांना ऐकावेसें वाटे. तासन् तास लोक पीरअलीचें बोलणें चित्रासारखे बसून ऐकत. पीरअली आपल्या या लोकप्रियतेचा फायदा घेई. तो लोकांचा देशाभिमान जागृत करी. मेलेलें मढें जिवंत करी. पारतंत्र्याच्या कबरींतील मनाला आपल्या तेजस्वी आणि ओजस्वी शब्दांनीं बाहेर काढी आणि त्याला स्वातंत्र्याच्या उद्यानाकडे बोट दाखवीत म्हणे, 'तें बघ तिकडे स्वातंत्र्याचें उद्यान. आतां धडपड कर. रक्त सांड.

तूं आतां स्वातंत्र्यासाठीं रक्त सांडलेंस तर ज्यावेळीं तूं त्या स्वातंत्र्यो-द्यानांत जाशील, त्यावेळीं तें तुझें सांडलेलें रक्त तुला परत मिळेल. बोल,

करतोस का धडपड ? येतोस का त्या स्वातंत्र्योद्यानाकडे ? होतोस का रक्त सांडायला तयार ?'

'चल—चल ये क्रांतिकारकांत.'

—अशा रीतीनें पीरअली एकेक क्रांतिकारक मिळवी. त्यांच्या गुप्त बैठका भरवी. त्यांना शपथा घ्यायला लावी. तो श्रीमंत क्रांतिकारकांना म्हणे, माझ्या भल्या मित्रानो, स्वातंत्र्यासाठीं प्राण द्यायला तयार झालांत तर तुमच्या जवळचें द्रव्य द्यायला कांकूं करणार तुम्ही ? नाहीं ना ? तर मग द्रव्याची मदत द्या. मग मी आणखी सशस्त्र लोक जमवितों.

श्रीमंत असलेले क्रांतिकारक आनंदानें द्रव्य देत आणि त्या द्रव्याच्या जोरावर पीरअली सशस्त्र लोक एकत्र करी.

हं ! आज इ. स. १८५७ सालची तीन जुलची रात्र. पाटण्यास पीरअलीच्या घरीं सुमारें दोनशें सळसळत्या रक्ताचे क्रांतिवीर एकत्र जमले आहेत. त्यांचीं गुप्त कारस्थानें चाललीं आहेत. ते पुढचे बेत करीत आहेत. योजना आंखीत आहेत.

झालें. सारेंकांहीं ठीक झालें. आतां ते पहा देशप्रेमी क्रांतिवीर एका हातांत क्रांतिध्वज आणि एका हातांत नागव्या तलवारी घेऊन तेथून भराभर बाहेर पडले. पीरअलीहि त्यांच्यांत आहे. त्याच्याहि हातांत क्रांतिध्वज आणि नागवी तलवार आहे. साऱ्या क्रांतिवीरांच्या तोंडांतून क्रांतिघोषणा होत आहेत.

हे सारे क्रांतिवीर स्वातंत्र्याच्या वातावरणांत पाटणा शहरांत मिरवण्यास गेले आणि मिरवलेहि.

—आणि मग सिंहाच्या या छाव्यांनीं, वाघाच्या या बच्चांनीं आपला मोर्चा एका चर्चकडे वळविला.

इतक्यांत लायल नांवाचा इंग्रज अधिकारी आपल्या कांहीं सैन्यासह तेथें आला. पण पीरअलीची गोळी लायलच्या छातींत घुसली. लायल धाडदिशीं जमिनीवर कोसळला.

क्रांतिवीरांना चेव चढला. ते आपलें कार्य अधिक जोमानें करूं लागले.

पण त्यांचा तो उत्साह अधिक वेळ टिकला नाहीं.

थोड्याच वेळांत रट्रे नांवाच्या एका गोऱ्या अधिकाऱ्यानें पीरअलीला कैद केलें.

वाघ पकडला गेला. हातांत हातकड्या अडकविल्या गेल्या.

पीरअलीच्या हातांत हातकडया इतक्या घट्ट अडकविल्या कीं, त्या रुतल्यानें त्याच्या हातांतून रक्ताचे थेंब ठिपकूं लागले.

पण वाघ तो वाघ. सांपळ्यांत सांपडला. पिंजऱ्यांत अडकला म्हणून का तो आपला गुण सोडील !

पीरअली रट्टेच्या हातीं सांपडला तरी तो वीर आपल्याच गमजांत. अगदीं वीर वीर ! !

पण पुढें पीरअलीचें काय झालें ?

ते पहा पीरअलीला फांसाकडे नेत आहेत. तो तिकडे फांस.

फांसाकडे पाहून पीरअल्ली हसत आहे. वीरच तो.

पीरअली, बोल. तुझी शेवटची इच्छा काय आहे ? तुला ईश्वराची प्रार्थना करावयाची आहे; तर प्रार्थना कर. नमाज पढावयाचे आहेत; तर नमाज पढ. पीरअली, तुझ्याबरोबरचे ते क्रांतिकारक बंडखोर लोक कोण कोण होते; त्यांची माहिती दे आणि फांसांत अडकलेली तुझी मान तूं मोकळी करून घे. पण तो करारी, बाणेदार वीर काय सांगत आहे; ऐका:....


"हा असा प्रसंग आहे कीं, मी माझा देह या प्रिय भारत देशासाठींच अर्पण केला पाहिजे. तुम्ही इंग्रज लोक या पीरअल्लीचा—माझा वध कराल. मला फांसावर चढवाल पण आमचें ध्येय ! त्याचें तुम्ही काय कराल ? त्याला तुम्ही मारूं शकणार नाहीं. आमची देशप्रीति तुम्ही नाहींशी करूं शकणार नाहीं. मी फांसावर लटकलों तर हजारों—लाखों भारत पुत्र पुढें येतील आणि इंग्रजांची भारतांतील सत्ता नष्ट करतील."

संपलें पीरअल्लीचें बोलणें. गेला—फांसाकडे गेला. फांसावर चढला.

देशभक्ता तुझ्या चरणीं आमचे अश्रु !

दुःखाश्रूंच्या जागीं आनंदाश्रु उभे करण्यासाठीं हा आणखी एक आपल्या आईची पूजा करण्यास पुढें सरसावला. आपल्या बांधवांना काय सांगतो आहे तो ?

००२



## ७ • बेल भंडार उचलला

"ऐका हो लोकांनो, आज संध्याकाळीं शनिवार वाड्यासमोर माझें व्याख्यान आहे, तरी सर्वांनीं माझ्या व्याख्यानास यावें हो ! आपला देश स्वतंत्र झाला पाहिजे, त्यासाठीं आपण काय केलें पाहिजे, तें मी सांगणार आहें हो ! !"

वासुदेव बळवंत पुण्यास सरकारी नोकरींत असल्यामुळें रजेच्या दिवशीं, शनिवारीं–रविवारीं आजुबाजूच्या खेड्यांत जात. तेथील जनतेस समजेल अशा भाषेंत ते आपले भारताच्या स्वातंत्र्याबद्दलचे विचार समजून सांगत. शिवाजी, तानाजी वगैरे पूर्वजांच्या पराक्रमाची आठवण करून देत. स्वातंत्र्यासाठीं शीर हातावर घेऊन प्रयत्नांची शिकस्त करा, असें सांगत.

वासुदेव बळवंतांनीं खेड्यापाड्यांतील जनतेचीं मनें जशीं तयार केलीं तशीं शहरांतील जनतेचीं मनें तयार केलीं. ते पुण्यांतील चौकाचौकांत उभे रहात. हातांत थाळी घेत. ती वाजवीत आणि आरंभीं सांगितल्याप्रमाणें ओरडत.

शनिवार वाड्यासमोरच्या पटांगणांत हजारों तरुण वासुदेव बळवंतांच्या व्याख्यानास येत. तें ऐकत आणि कांहीं तरी देशकार्य करावयाचें असा निश्चय करून घरोघरीं जात.

अशा प्रकारें खेड्यांतील आणि शहरांतील जनतेचीं मनें आपल्या क्रांति-युद्धासाठीं त्यांनीं तयार केलीं. इंग्रजांबद्दलच्या संतापाची ठिणगी जनतेच्या मनावर टाकली. जनतेचीं मनें धुमसूं लागलीं.

अशा प्रकारें वासुदेव बळवंत क्रांतियुद्धासाठीं तयारी करीत असतां त्यांना एक विशेष गोष्ट दिसून आली ती अशी कीं, शहरांतील तरुणांपेक्षां खेड्यापाड्यांतील कणखर प्रकृतीचे व वेडरवृत्तीचे तरुण जर आपणाला मिळ-तील तर अधिक बरें होईल आणि मग सारा भारत क्रांतीनें पेटविणें सहज सुलभ होईल.

—आणि म्हणूनच वासुदेव बळवंतानीं पुणें, सातारा, वऱ्हाड, नाशीक इकडील रामोशी, डोंगरी कोळी या कामीं मिळविले. हे लोकहि इंग्रजांच्या विरुद्ध झाले होते. मराठे–पेशवे आमदानींत या लोकांना गडावर पहारा करण्याचें काम मिळत असे. तें आतां मिळेनासें झालें होतें. जंगलांतून लांकूड-फांटा आणून तो विकावा तर जंगलखात्याच्या सरकारी नियमांनीं आतां आड-काठी झाली होती. कुठें चोरीमारी झाली तर संशयानें या लोकांनाच त्रास होत होता. यांचाच छळ होत होता. यामुळें या लोकांचा अगदीं कोंडमारा झाला होता. आई जेवूं घालीना आणि बाप भीक मागूं देईना अशी स्थिति झाली होती.

वासुदेव बळवंत या लोकांत मिसळले. यांचा विश्वास संपादन केला. आपले क्रांतियुद्धाचे विचार यांना पूर्णपणें पटविले. बंदूक उडविण्याचें शिक्षण दिलें. दांडपट्टा कसा फिरवावा, तलवारीचे हात सफाईदार कसे करावे, शत्रूला शिस्तीनें कसें तोंड द्यावें, हें सारें शिकविलें.

आणि सन १८७९ च्या महाशिवरात्रीच्या दिवशीं पुण्यापासून १०-१९ मैलांवर असलेल्या लोणी गांवाजवळील एका रानांत रात्रीच्यावेळीं आपल्या या मित्रमंडळीसह वासुदेव बळवंत कसलातरी बेत करीत बसले आहेत.

त्यांची कोण ही मित्रमंडळी ?

रामोशी.

या सगळ्या मित्रमंडळीची जेवणें झालीं. बेलभंडार झाला. शस्त्रांची चांटणी झाली आणि भारताच्या स्वातंत्र्यासाठीं शीर तळहातावर घेऊन ही सारी मंडळी निघाली ! अगदीं निश्चयानें निघाली.

आणि मग रामोशी आणि वासुदेव बळवंत यांनीं उभ्या महाराष्ट्रांत धुमाकूळ घालण्यास सुरवात केली. त्यांना मनुष्यबळाची जशी जरूरी भासूं लागली तशी द्रव्यबलाचीहि जरूरी भासूं लागली. म्हणून वासुदेव बळवंत आपल्या साथीदारांसह श्रीमंतांकडे जात. त्यांना आपला हेतु सांगत आणि त्यांच्याजवळ द्रव्याची मदत मागत. सुखासुखी द्रव्य मिळालें तर ठीकच झालें, नाहींतर दंड नीतीचा अवलंब करून तें मिळवीत. आपली संघटना वाढवीत. आणि ती अधिक मजबूत करीत.

वासुदेव बळवंतांच्या अशा या क्रांतिमार्गामुळें सरकारचें धाबें दणाणलें. इंग्रजी राज्य उलथून पडतें कीं काय, सन १८५७ च्या क्रांतियुद्धासारखा वणवा सर्व भारतांत पेटतो कीं काय, अशा एक का दोन ! कितीतरी शंका सरकारच्या डोक्यांत थैमान घालूं लागल्या !

त्यावेळच्या मुंबईच्या गव्हर्नरानें वासुदेव बळवंताना पकडण्यासाठीं नाना प्रयत्न केले. पण वासुदेव बळवंत सांपडत ना. मूळ उपटलें कीं त्याचा विस्तार आपोआपच नाहींसा होईल, असें सरकारला वाटत असावें; पण मूळ उपटणें सोपें का होतें !

आतां सरकारनें या कामीं एक नवाच मार्ग स्वीकारला. द्रव्याच्या आशेनें कोण फसणार नाहीं ! कोण वश होणार नाहीं ! सरकारला वाटलें, आपण जर भल्यामोठ्या रकमेचें बक्षीस जाहीर केलें तर त्या बक्षिसाच्या आशेनें कोणीतरी देशद्रोहि, कोणीतरी देशबंधुद्रोहि पुढें येईल आणि देशासाठीं आटापिटा करणाऱ्या देशभक्ताला—त्या शूर क्रांतिसिंहाला जाळ्यांत अडकविण्यास मदत करील !

—आणि म्हणूनच त्या सिंहाला पकडून देण्यासाठीं सरकारनें चार हजारांचें बक्षीस जाहीर केलें.

पण सरकारी बक्षिसाच्या रकमेच्या सव्वापट रकमेचें बक्षीस मुंबईच्या गव्हर्नराच्या मस्तकासाठीं वासुदेव बळवंतांनींच जाहीर केलें.

टोल्याला प्रतिटोला मिळाला !

सरकार अधिक चिडलें. अधिक संतापलें. फडक्यांच्या या चळवळीचा बींमोड करण्यासाठीं त्यानें अधिकच सैन्य सोडलें. पण त्याचा उपयोग झाला काय ?

वासुदेव बळवंत आणि त्याचे अनुयायी डोंगराच्या कडे कपारींत लपत. राना-वनांत रहात. अचानक कुठें तरी झडप घालीत. इकडे सैन्य आलें तर तिकडे जात. क्रांतिवीर आणि सरकारचें सैन्य यांचा जणुंकाय लपंडावच चालला होता.

पण या खेळांत क्रांतिवीर जरी हरले नाहींत तरी त्यांचा नायक–त्यांचा पुढारी वासुदेव बळवंत फडके यांची प्रकृति ढांसळली ! त्यांचा जोम कमी झाला.

शरीरबळ असेल तरच आपलें ध्येय साध्य करून घेतां येईल. भारतांतील इंग्रजसत्ता उधळून लावतां येईल; अशी फडक्यांची खात्री असल्यामुळें त्यांनीं आपलें शरीरबल वाढविण्याचें ठरविलें. आणि आपल्या अनुयायांस सांगितलें—

"चाललेलें कार्य असेंच पुढें चालू ठेवा"

आणि आपलें शरीरबल वाढविण्यासाठीं ते गाणगापुरास गेले.

वासुदेव बळवंत आतां 'काशीकर बाबा' बनले. देशासाठीं त्यांनीं वेष बदलला व आपला मुक्काम गाणगापुरच्या दत्तमंदिरांत ठोकला.

साधुवेष धारण केलेला आहे. गळ्यांत रुद्राक्षांची माळ आहे. कानांत कुंडलें आहेत. अंगाला भस्म लाविलेलें आहे. असे हे काशीकर बाबा धुनी-जवळ बसले आहेत. देवाकडे डोळे आहेत पण देशांत काय चाललें आहे इकडे कान आहेत. स्वातंत्र्याची आपली चळवळ चालली आहे. सरकार त्वेषात्वेषानें मनगटें चावीत आहे. हें ऐकून चेहऱ्यावर हास्याच्या रेषा वारंवार उमटत आहेत.

असें हें बरेंच दिवस चाललें आहे.

पण आज ?

काशीकर बाबा आज गाणगापुरांत कुठेंच दिसत नाहींत. कुठें गेले ते ? कां गेले ?

त्यांच्या पाठीमागें सरकारचे हेर होते, सैनिक होते. चार हजार रुपयांच्या बक्षिसाच्या लालसेनें देशद्रोह करूं पहाणारे कांहीं देशद्रोही होते. हजारों डोळे त्यांना शोधीत होते.

त्यामुळें तुम्हा आम्हास जें माहीत नव्हतें, तें सरकारी मेजर अधिकारी डॉनियल याला माहीत झालें होतें.

आणि म्हणूनच मेजर डॉनियल कांहीं गोरे सैनिक घेऊन गाणगापुरास अचानक आला होता.

आणि काशीकर बाबांनाहि या गोष्टीची पूर्ण जाणीव झाली होती.

आणि त्यामुळेंच काशीकरबाबांनीं अचानक गाणगापूर सोडलें व ते पंढरपूरच्या मार्गाला लागले.

—ही बातमी मेजर डॉनियलला समजली आणि त्यानेंहि पंढरपूरच्या मार्गावर घोडदौड केली.

काशीकर बाबा एकटे आणि डॉनिलचें सैन्य बरेंच पण--

"एक देशाभिमानी, महाशत्रु सेनेस भारी
पादचारी असो वा नसो बापुडा शस्त्र धारी ॥"

काशीकर बाबांचेंहि असेंच होतें. अन्न नाहीं. पाणी नाहीं. विश्रांति नाहीं. अंगांत ताप फणफणतो आहे. तहानेनें जीव कासवीस झाला आहे. जीभ कोरडी पडली आहे. पायांत त्राण नाहीं. ते लटपटत आहेत. तरी पण हा ध्येयवादी देशभक्त आपल्या भारताच्या स्वतंत्र्यासाठीं देह झिजविण्यास पाहिजे, ही मनीषा धरून त्यासाठीं आपले प्राण वांचविण्याचा आटोकाट प्रयत्न करीत आहे. तो देवाची प्रार्थना करीत आहे–'देवा, माझ्या प्रिय भारताच्या स्वतंत्र्यासाठीं देह झिजविण्याची माझी इच्छा आहे. त्यासाठींच माझे प्राण वांचव. मला माझ्या देशाच्या स्वातंत्र्यासाठीं कांहींतरी करूं दे.'

वासुदेव बळवंत पुढें आणि मेजर डॉनियल आपल्या सैन्यासह त्यांच्या पाठीवर !

तरीपण वासुदेव बळवंतानीं डॉनियलला अनेकदां गुंगारा दिला. अनेकदां हुलकावणी दाखविली.

एकदां तर अगदीं जिवावरचा प्रसंग ! भीमा नदी तुडुंब भरून आडवी आणि पाठीमागें शत्रूसैनिक अगदीं जवळ आलेले.

मोठेंच संकट ! शक्य तितक्या लवकर भीमा पार झालें पाहिजे. पण हें व्हावें कसें ?

भीमा तुडुंब भरून वाहाते आहे. होडीवाला होडी नदींत सोडावयास तयार नाहीं. तो तरी होडी कशी सोडणार ! तो म्हणतो, या महापुरांत होडी लोटून तुमचा आणि माझा जीव गमावूं काय ? छे माझ्यानें नाहीं हें होणार !

'असं ! बरं' असें म्हणून वासुदेव बळवंत त्या महापुरांत उडी घेण्यास तयार झाले. ते आतां उडी घेणार !

तोंच तो होडीवाला म्हणाला, 'थांबा. जिवावर उदार होऊं नका. कांहीं होवो. ईश्वर कांहीं करो.' असें म्हणून होडीवाल्यानें भीमेला हात जोडले आणि त्या महापुरांत त्यानें आपली होडी लोटली !

वासुदेव बळवंत भीमा पार झाले !

आणि त्यांनीं होडीवाल्याच्या मदतीनेंच ती होडी नदींत बुडवून टाकली.

आणि ते पुन्हां धांवत सुटले !

मेजर डॅानिल सैन्यासह पाठीवर आहे !

तोहि आतां भीमानदीच्या कांठावर उभा आहे. तोहि भीमा पार कसा होऊं याचा विचार करीत आहे. काय करूं आणि या दुथडी भरून चाललेल्या भीमेपार होऊं !

त्याला युक्ति सुचली. त्यानें जवळच्याच गांवांतील कोळी लोकांकडून कांहीं सुगडें आणविलीं. सुगडें म्हणजे भोपळयांचीं सांगड. ही सांगड पोटाखालीं घालून पोहत जातां येतें. तीं असल्यास निदान बुडण्याचा तरी संभव फारच कमी असतो.

मे. डॅानियल आणि त्याचे सैनिक आपल्या घोड्यांसह सुगडांच्या सहाय्यानें भीमापार झाले !

आतां पुन्हा शर्यत सुरू झाली.

वासुदेव बळवंत पुढें आणि मे. डॅानियल आपल्या त्या आठ सैनिकांसह त्यांच्या मागून.

दमले ! आतां एक पाऊल ? अं हं !! पुढें जाण्याची पायांत ताकद नाहीं. शक्ति नाहीं. अंगांत ताप फणफणतो आहे.

अं हं ! नाहीं–नाहींच पुढें पाऊल पडत !

आतां ते बेळगांव जिल्ह्यांतील धिंवी खुर्द या गांवांत आले आहेत पण पुढें जाणें आतां त्यांना शक्य नाहीं ! म्हणूनच धिंवी खुर्द येथील देवळांत थोडावेळ विश्रांति घेण्यासाठीं ते गेले आणि तेथेंच झोपले !

वासुदेव बळवंतांना गाढ झोप लागली.

आणि म्हणूनच या सिंहाला–वासुदेव बळवंताला मेजर डॅनियलनें पकडलें !

रात्रीं बेसावध असतांना, अंगांत ताप असतांना, पोटांत अन्न नसतांना पायांत त्राण नसतांना, सिंह सांपडला ! क्रांतिवीर सांपडला ! !

शेवटीं या क्रांतिवीराच्या—देशभक्ताच्या वांट्याला काय ?

कैद ! हातापायांत शृंखला. न्यायालयांत खटला आणि शिक्षा !

वासुदेव बळवंत भारताच्या स्वातंत्र्यासाठीं काळ्यापाण्याच्या शिक्षेला गेले ! आणि एडन येथील तुरुंगाच्या एका खोलींत बसले.

तेथें ते भारताचें चिंतन करीत बसले. माझा देश स्वतंत्र कधीं होईल, त्यासाठीं कोणी प्रयत्न करतील का ? काय होईल माझ्या देशाचें ? असा विचार करीत, अश्रु ढाळीत बसले !

अशा स्थितींत तीन वर्षें संपलीं. शरीर क्षयानें ग्रासलेंच होतें. मन भारत कधीं स्वतंत्र होईल, या चिंतेनें ग्रासलें होतें.

शेवटीं शरीर आणि मन क्लेशानें आणि चिंतेनें अगदींच थकलें, आणि मग १७ फेब्रुवारी १८८३ रोजीं एडन येथें वासुदेव बळवंतांच्या शरीराची आणि मनाची धडपड कायमची बंद पडली.

भारताच्या स्वतंत्र्यासाठीं वासुदेव बळवंतांनीं आपल्या जीविताचें योग्य चीज केलें !

वासुदेव बळवंत फडक्यांनीं भारतांतील इंग्रजी सत्तेला जबरदस्त फटका दिला खराच पण ह्याहिपेक्षां अधिक जबरदस्त फटका नव्हे जबरदस्त तडाखा लो० टिळकांनीं दिला. लोकमान्यांच्या तडाख्यानें भारतांतील इंग्रजी सत्तेला मोठाच तडा गेला. अगदीं न सांवरतां येण्यासारखा ! त्यामुळेंच लो० टिळकांना 'काळ्यापाण्याची' शिक्षा झाली—न्यायमूर्तींनीं शिक्षा सांगतांच लोकमान्य काय सांगत आहेत ऐका.

९०२८५



# ८ • सिंहगर्जना

"मला सांगावयाचें असें फारच थोडें आहे. ज्युरीनीं मला दोषी ठरविलें तर खुशाल ठरवोत पण मी गुन्हेगार नाहीं. लौकिक दृष्टीनें नियंत्रण करणारी अशी एक शक्ति न्यायपीठाहूनहि वरिष्ठ आहे. कदाचित् ईश्वराची इच्छाच अशी असेल कीं, मला शिक्षा व्हावी आणि शिक्षा भोगल्यामुळेंच मी अंगीकारलेल्या कार्याला ऊर्जित दशा यावी."

लोकमान्य टिळकांना सन १९०८ सालच्या जुलै महिन्यांत मुंबईस सहा वर्षांची काळ्या पाण्याची शिक्षा झाली. त्यावेळीं लोकमान्यांनीं वरील तेजस्वी उद्गार काढले.

सरकारनें लोकमान्यांना शिक्षा कां दिली तर आपल्या जन्म भूमातेला स्वतंत्र करण्यासाठीं सरकारी परकीय सत्तेला धडाधड धक्के मारून ती साफ कोलमडूनच नव्हे तर अगदीं जमीनदोस्त करण्यासाठीं प्रयत्न करितात म्हणून ! लो. टिळकांना समजूं लागल्यापासूनच जुलमी सत्तेबद्दल अतिशय तिटकारा

उत्पन्न झाला होता. ज्या ज्या वेळीं आणि ज्या ज्या ठिकाणीं अन्याय, जुलूम दिसेल त्या त्या वेळीं आणि त्या त्या ठिकाणीं सरकारला प्रतिकार करावयाचा, विरोध करावयाचा हा त्यांचा बाणा होता. भारताच्या स्वातंत्र्यासाठीं त्यांनीं आपली शक्ति, बुद्धि, भक्ति अखेरपर्यंत खर्च केली. त्यांचा मित्र परिवारहि त्यांच्या विचारांचाच होता. कै. चिपळूणकर, आगरकर, परांजपे आदि मंडळीपैकीं कोणी समाजसुधारक तर कोणी स्वातंत्र्य प्राप्तीसाठीं ज्वलजहाल मनाचे ! न्या. रानड्यांनीं महाराष्ट्ररूपीं—भारतरूपीं म्हटलें तरी चालेल—थंड गोळयाला ऊब दिली. त्याला शुद्धीवर आणलें, असें म्हटलें तर लो. टिळकांनीं त्याला उभा करून दंड थोपटावयास लाविलें.

एकटा महाराष्ट्रच काय पण सारा भरत खडबडून जागा झाला असेल तर केसरीच्या गर्जनेनें. इ. स. १८८१ च्या जानेवारी महिन्यांत केसरीचा जन्म झाला. पहिल्याच वर्षाच्या ७ व्या अंकांत ' बहिष्कार ' यावर टिळकांनीं लेख लिहिले. आणि आम्ही कोठें आहोत, आम्हाला काय केलें पाहिजे याची त्यांनीं निश्चित व पूर्ण कल्पना आणून दिली.

सन १८८५ च्या डिसेंबर महिन्यांत २८ तारखेस कांग्रेस जन्माला आली. त्या दिवशीं सोमवार होता. रामजन्माप्रमाणें तो प्रसंग पवित्र होता. भारताच्या सर्व कोनाकोपऱ्यांतून निवडक नररत्नें मुंबईस जमलीं होतीं. सर्व जाती, सर्व धर्म, सर्व भाषा मुंबईस गोळा झाल्या होत्या. आपल्या प्रिय भारताला कसा स्वतंत्र करावा याचा विचार तेथें व्हावयाचा होता. कलकत्त्याचे सुप्रसिद्ध वक्ते सुरेंद्रनाथ बानर्जी अध्यक्ष होते.

आणि मुंबईच्या गोकूळदास तेजपाळ संस्कृत कॉलेजच्या वसतिगृहांत कॉंग्रेसचा जन्म झाला. तो दिवस शुभ–सोन्याचा !

लो. टिळकांची दृष्टी लांब पल्ल्याची. त्यांना सरकारच्या राज्यगाड्याला कुठें खीळ घालावी हें पुरेपूर कळून चुकलें होतें. फोडा आणि झोडा या तत्त्वावर सरकार आपला राज्यगाडा हाकीत आहेत, हें लोकमान्यांना उमगलें होतें. हिंदु–मुसलमानांत तेढ उत्पन्न करावयाची, वैर उत्पन्न करावयाचें, एकास भरपूर सवलती द्यावयाच्या आणि दुसऱ्यास तितकेंच तलवारीच्या धारेवर धरावयाचें, हें सरकारचें नित्य व्यवहारांतील तत्त्व होतें.

आणि म्हणूनच हिंदु-मुसलमानांचे दंगे होण्यास सुरवात झाली. इ. स. १८९३ सालीं जुनागड जवळील प्रभासपट्टण येथें हिंदु–मुसलमानांचा प्रथम दंगा सुरू झाला. त्या दंग्यांत यात्रेकरूंच्या अंगावर उकळलेलें तेल ओतून त्यांस भाजण्यांत आलें तर कित्येक ठिकाणीं जाळण्यांतहि आलें.

या दंग्याची झळ मुंबईस लागली. मुंबईसहि हिंदु–मुसलमानांचा दंगा सुरू झाला. पुढें त्याचें लोण पुणें, येवलें, मालेगांव वगैरे ठिकाणीं जाऊन पोचलें. लोकांच्या पाठींत सुरे खुपूं लागले. हिंदु संख्येनें खूप पण त्यांच्यांत एकी नाहीं. एकीचें बळ त्यांना माहीत नाहीं. संघटना माहीत नाहीं. संघटनेनें केवढीं मोठीं कार्यें होतात याची जाणीव नाहीं. एक विचार नाहीं. एक विचार कसें संरक्षण करितो ह्याचा अनुभव नाहीं. सगळें विस्कळीत. म्हणून तर या दंग्यांत आणि पुढें वेळोवेळीं होणाऱ्या हिंदु–मुसलमानांच्या दंग्यांत हिंदुनांच मार खावा लागला.

लो० टिळकांना हिंदूंची संघटना करून तिच्या शक्तीचा ओघ स्वातंत्र्य प्राप्तीच्या मार्गाकडे लावावयाचा होता. समाजाच्या सर्व थरांतील लोक एका बैठकीवर बसवावयाचे होते. एका विचारानें सर्वांनीं कसें वागावें त्याचे धडे जनतेला मिळावे, अशी लोकमान्यांची इच्छा होती.

आणि यासाठीं 'सार्वजनिक गणेशोत्सव' सुरू करणें योग्य आहे, असें लोकमान्यांस वाटलें.

सार्वजनिक गणेशोत्सवाचें महत्त्व केसरीनें गर्जना करून जनतेला पटविलें, आणि सन १८९४ सालीं सार्वजनिक गणेशोत्सव सुरू झाले. जुन्या विचारांना नवें वळण लागलें. गणपती पुढें मेळे गाऊं लागले. पोवाडे खणाणूं लागले. कीर्तनें रंगूं लागलीं. धार्मिक प्रवचनें होऊं लागलीं. सामाजिक आणि राजकीय प्रश्नांची चर्चा व्याख्यानांत होऊं लागली. समाजाच्या सर्व थरांतील लोक एका बैठकीवर आले. विचारांची देवघेव सुरू झाली. लोकांच्या राष्ट्रीय भावना उचंबळूं लागल्या.

गणपती पूजनानें मंगलकार्याला आरंभ झाला. जनतेंत जागृति झाली. कवि विनायकाचीं पदें मेळ्यांतील मुलें गुणगुणूं लागलीं,

तार आम्हाला तार; गणेशा !
तार अम्हाला तार !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ विः .. . ... ......
क्रमांक .. .. ... ... ... .. नोंः दिः ........



निज कृपाछत्र विस्तार—गणेशा०
स्वतंत्रता भूषण जन्माचें
दुर्दैवानें आम्ही तिजला अंतरलों,
परवशतेच्या डोहामाजी सांपडलों,
परकीयांचे भारी भारानें खचलों,
निःसार गमे संसार ! गणेशा० !

जनतेची राष्ट्रीयभक्ति उतूं लगली. राजकीय प्रचार धूमधडाक्यानें होऊं लागला. हें सारें पाहून लोकमान्यांस अत्यानंद होऊं लागला.

लो० टिळक सार्वजनिक गणेशोत्सव सुरू करून थांबले नाहींत. तर त्यांनीं पुढच्याच वर्षी आणखी एक उत्सव सुरू करण्याचें ठरविलें; तो म्हणजे श्री शिवाजी उत्सव. श्री छत्रपति शिवाजी महाराजांबद्दल महाराष्ट्रालाच काय पण साऱ्या भारताला अपरंपार आदर खोलवर रुजलेला ! समर्थ रामदासस्वामींनीं पूर्वीच सांगून ठेविलें आहे,

शिवरायाचें आठवावें रूप
शिवरायाचा आठवावा प्रताप

—तेंच लोकमान्य टिळक आतां पुन्हा सांगत आहेत. 'माझ्या बंधूनो, आपले शिवाजी महाराज म्हणजे महाराष्ट्राची स्फूर्ति देवता. शिवाजी महाराज स्वराज्य संस्थापक. त्यांनीं संघटनेच्या जोरावर निजामाला सळो कीं पळो करून सोडलें. विजापूरकराला दातीं तृण धरावयास लाविलें. दिल्लीचा एवढा मोठा औरंगजेब बादशहा त्याला हात टेकावयास लाविलें. अशा या पराक्रमी पुरुषाचा पराक्रम आपल्या डोळ्यांसमोर सतत असला पाहिजे. हा आदर्श पुरुष आपल्या हृदय मंदिरांत कायमचा असला पाहिजे.'

—या थोर पुरुषाची समाधि रायगडावर आहे; तेथें दरवर्षी उत्सव नको का व्हायला ? शिवाजी महाराजांचें स्मरण नको का व्हायला ?

लोकमान्यांनीं याविषयीं केसरींत तर लेख लिहिलेच पण स्वतः ठिकठिकाणीं व्याख्यानें दिलीं. जनता जागी केली. महाराष्ट्राच्या कोणाकोपऱ्यांत आवाज गेला असें नसून तो बंगालमध्येंहि जाऊन पोंचला. जनता खडबडून जागी झाली. ती डोळे चोळून पाहूं लागली. तिला शिवाजी महाराज दिसूं लागले. त्यांचा पराक्रम दिसूं लागला. महाराजांच्या हाकेला आम्हीच 'ओ'

दिला. आम्हीच खांद्याला खांदा लावून शत्रूशीं लढलों. आम्हीच पराक्रम केला आमचे—आमचेच शिवाजी महाराज ! असें जनतेला वाटूं लागलें.

जनता शिवाजी महाराजांचा जयघोष करूं लागली. शेकड्यांनीं, हजारांनीं, लाखांनीं बाराहि मावळांतील मावळे रायगडावर जमले. पुण्या–मुंबई-कडील पांढरपेशा लोकांचीहि रायगडाकडे रीघ लागली. प्रत्येकाच्या तोंडीं—

"गडावर जाऊं ! शिवराज दर्शना लाहूं–
भूललों पूर्व विसरलों सारें,
अंगीं भरलें नूतन वारें
मूर्खत्वाचे तुटती तारे
सत्य तें पाहूं. गडावर जाऊं."

ता. १९ एप्रिल १८९६ रोजीं रायगडावर पहिला शिवाजी उत्सव झाला. या उत्सवांत लो. टिळकांचें व्याख्यान तर झालेंच शिवाय कुणी महाराजांच्या पराक्रमाचे पोवाडे गाइले. कुणी पदें म्हटलीं. भजनें केलीं. इतकेंच काय पण महाराजांच्या जीवनांतील एक दोन प्रसंगांचेंहि थोडक्यांत नाट्य करून दाखविलें.

—हें सारें पाहून आणि ऐकून श्रोत्यांचीं चित्तें थरारलीं. त्यांच्या अंगावर रोमांच उभे राहिले. नवचैतन्य खेळूं लागलें. त्यांना आपल्या पूर्वजांच्या पराक्रमाचे प्रसंग आठवूं लागले. नव्या स्वराज्याची लालसा उत्पन्न झाली. स्वराज्यासाठीं–स्वातंत्र्यासाठीं आपण कांहीं तरी करावें, असें त्यांस वाटूं लागलें.

स्वदेशीची चळवळ जोरांत सुरू झाली. लोकमान्यांचें पुढारीपण तर शिगेला पोंचलें. टिळकांच्या आदराविषयीं घरांघरांतून मंजूळ स्वरांत पुढील ओव्या ऐकूं येऊं लागल्या.

पुण्याची पुण्याई पुन्हा ग उदेली
मूर्ति सांवळी जन्मली टिळकांची ॥
पुण्याचें वैभव पुन्हा दिसेल ठळक
तेथें आहेत टिळक देशभक्त ॥

इंग्रज सरकारला हेंच नको होतें. भारतीय जनता मेलेल्या मनानें रहावी अशी त्याची इच्छा होती. आणि म्हणूनच मेलेल्या मनांना जिवंत करणारा, सरकारला आपला शत्रू असें वाटत असलें तर त्यांत नवल काय ! लोकमान्यांस सरकार ह्या ना त्या कारणानें तुरुंगांत डांबीत होतें त्याचें कारणहि हेंच होतें—ते भारताच्या स्वातंत्र्यासाठीं जनतेचीं मनें तयार करीत होते. आतां म्हणजे सन १९०६ साली अशाच एका कारणासाठीं लोकमान्यांस काळ्यापाण्याची शिक्षा झाली.

त्याचें असें झालें, या काळांत भारतीय जनतेला पारतंत्र्य म्हणजे काय, त्यामुळें आपल्या सर्वांगीण प्रगतीचा कोंडमार कसा होतो; हें जवळ–जवळ पूर्णपणें कळूं लागलें आणि त्याबरोबरच इंग्रजांच्या सत्तेबद्दल द्वेषभावनाहि निर्माण होऊं लागली भारतीय तरुणांचें रक्त उसळ्या मारूं लागलें.

" स्वातंत्र्यास्तव कोण भितो मरणाला "

—असें छातीला हात लावून तरुण बोलूं लागले. दामोदर हरि चाफेकर; कान्हेरे, खुदिराम बोस, सेनापति बापट इत्यादि तरुण मंडळीनें क्रांतीचें शस्त्र हातीं धरलें होतें. कांहीं तरुण मंडळी तर रशियांतून बॉंबगोळे तयार करण्याचें शिक्षण घेऊन आली होती. बॉंबगोळे तयार होऊं लागले होते. आणि त्याचा पहिला प्रयोग खुदिराम बोसनें केला.

या बॉंबस्फोटामुळें सरकार हादरलें. त्याला वाटलें, आपल्या भारतांतील सत्तेवर हा पहिला बॉंब फेकला. राजसत्तेला हा सुरुंग लागला !

सरकार चवताळलें. त्यानें समजूतदारपणा सोडला. नीति न्याय सोडला आणि त्यानें आपल्या सत्तेचा बडगा दाखविण्यास सुरवात केली.

सरकारचे हे अत्याचार लोकमान्य टिळकांना योग्य वाटले नाहींत. तरुणांचीं भडकलेलीं डोकीं शांत करण्याचा — अत्याचार थांबविण्याचा—सरकारचा दडपशाही हा उपाय नव्हे. असेंच त्यांना वाटत होतें. म्हणून त्यांनीं केसरींत लेख लिहिले. बॉंब गोळे देशांत आले, हें देशाचें दुर्दैव खरेंच पण ही परिस्थिति निर्माण होण्यास सरकारच कारण आहे. सरकारनें जनतेला योग्य हक्क बहाल करावे व शांतता प्रस्थापित करावी. शिवाय ' हे उपाय टिकाऊ नव्हेत आणि बॉंबगोळ्यांचें रहस्य ' असें त्यांनीं आणखीहि लेख लिहिले.

—आणि हेच लेख लो. टिळकांना सहा वर्षें तुरुंगांत पाठविण्यास कारणीभूत झाले. त्या वेळचे मुंबईचे गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क यांनीं हट्टानें लोकमान्यांवर खटला भरला.

भारताच्या महापुरुषावर हा राजद्रोहाचा खटला.

लोकमान्यांवरील हा खटला मुंबईस सतत आठ दिवस चालला. लोकमान्यांनीं बॅरिष्टर न देतां खटल्याचें काम स्वतःच चालविलें. त्यांनीं न्यायाधिशापुढें एकंदर २१ तास १० मिनिटें भाषण करून आपली बाजू स्पष्ट मांडली सात युरोपियन, दोन पारशी असे नऊ जण ज्युरी होते. मि. दावर नांवाचे न्यायाधीश होते.

न्यायाधिशानें ज्युरींचें मत घेतलें. त्यांत सात जणांनीं आपलें मत लोकमान्य दोषी असल्याचें सांगितलें !

लोकमान्यांस सहा वर्षें काळ्यापाण्याची शिक्षा झाली. [ त्यावेळीं लोकमान्यांनीं जे उद्गार काढले ते आरंभी दिले आहेत. ]

शिक्षा सांगण्यांत आली तरी तो महामेरू धीर गंभीर होता. त्याच्या चेहऱ्यावर कसलाच भाव दिसला नाहीं कीं, मनाची चलबिचलता दिसली नाहीं.

पण न्यायालयाच्या बाहेर रस्त्यावर सकाळपासून भरपावसांत न्यायदानाचा काटा कुठें झुकतो, तें ऐकावयास लाखों लोक उभे होते. लोकमान्यांना झालेली ही शिक्षा ऐकून लोकांचीं मनें फारच दुःखी झालीं. त्यांच्या डोळ्यांतून दुःखाश्रू वाहूं लागले. टिळक देवाचें दर्शन तरी होतें का, ह्याची ते आतुरतेनें वाट पाहूं लागले.

पण सरकारनें लोकांना लोकमान्यांचें दर्शनहि घडूं दिलें नाहीं. गोऱ्या शिपायांच्या कडक बंदोबस्तांत त्यांना अहमदाबादच्या तुरुंगांत नेलें. व पुढें दोन महिन्यांनीं मुंबईमार्गें हार्डिंज नांवाच्या बोटीनें रंगूनला नेऊन मग मंडालेच्या तुरुंगांत ठेविलें.

देशाच्या स्वातंत्र्यासाठीं शक्ति, बुद्धि आणि भक्ति खर्चणाऱ्या या महापुरुषाला मंडालेच्या तुरुंगांत सहा वर्षें काळ्या पाण्याची शिक्षा !

ह्या सहा वर्षें शिक्षेचाहि उपयोग लो. टिळकांनीं आपल्या प्रिय भारताच्या उन्नतीसाठीं केला. मंडालेच्या तुरुंगांतच त्यांनीं 'गीता रहस्य' हा जगद्वंदनीय ग्रंथ लिहिला. भारताची, भारतीय संस्कृतीची थोरवी जगाला पटवून दिली.

शिक्षा संपली. सरकारनें लोकमान्यांस ता. १६ जून १९१४ रोजीं पुण्यास त्यांच्या गायकवाड वाडयांत आणून सोडलें! त्या दिवशीं पुण्यांत उत्साहाचें वातावरण खेळूं लागलें. दिवाळीच्या दिवसांचा भास होऊं लागला. सारा महाराष्ट्र आनंदानें नाचूं लागला!

लोकमान्यांनीं लवकरच 'स्वराज्य दौरा' काढला. या दौऱ्यांत वऱ्हाडांत जें व्याख्यान दिलें त्या व्याख्यानांत त्यांनीं प्रथम घोषणा केली—

"स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे व तो मी मिळविणारच!"

लोकमान्यांनीं आपली ही घोषणा खरी करण्यासाठीं कितीतरी कष्ट केले. नाना दुःखें सहन केलीं. कारावास भोगला. भारताच्या स्वातंत्र्यासाठीं त्या महापुरुषानें भारतांतील इंग्रजी सत्तेशीं जवळ जवळ चाळीस वर्षे तोंड दिलें. ती खिळखिळी केली. भारतीय जनतेची शक्ति किती आहे, हें इंग्रजांस दाखवून दिलें.

—अशा ह्या महापुरुषानें जुलमी सत्तेशीं झगडतां-झगडतां, टक्रा देतां-देतां ता. १ ऑगस्ट १९२० रोजीं आपला देह ठेविला!

या महापुरुषाचें स्मरण होतांच भारतीय जनता हात जोडते आणि गुणगुणूं लागते.

तुझी योग्यता भारी भारी ऐसें जनता वदे.
असंख्य तलवारीचे मुजरे झडावेत तुजपुढें!

●●●



# ९ • तेजस्वी प्रतिज्ञा

हा पहा आईची पूजा करावयास निघालेला वीर पुत्र ! हा तर प्रतिज्ञा करूनच पुजेस आरंभ करीत आहे. काय प्रतिज्ञा करतो आहे हा—

" मी पांडुरंग महादेव बापट भवानी आईची—या नंग्या समशेरीची शपथ घेऊन अशी प्रतिज्ञा करितों कीं, माझ्या परतंत्र मातृभूमीला स्वतंत्र करण्यासाठीं मी आजपासून यावत्‌जीव काया, वाचा, मनानें झटेन आणि तिची हांक ऐकतांच तिच्या सेवेसाठीं धांवत येईन. या कामीं या देहाचा होम करावा लागला तरी मी फिरून याच भारत खंडांत जन्म घेईन व अपुरें राहिलेलें काम पुरें करून दाखवीन. ही माझी प्रतिज्ञा पुरी करण्यास माझा श्रीहरी मला जरूर ती बुद्धि, युक्ति आणि शक्ति देवो."

—ही तेजस्वी प्रतिज्ञा आपल्या सेनापति बापटांनीं सन १९०१ सालीं केली. यावेळीं त्यांचें वय अवघें २१ वर्षांचें होतें. त्यांच्या अंगांत रक्त सळसळत होतें.

भारताच्या दास्यशृंखला तटातट तोडून त्याला स्वतंत्र करण्यासाठीं बापटांचे बाहु स्फुरण पावत होते. हा काळच तरुणांना जोम आणणारा होता. लो. टिळकांच्या नेतृत्वाखालीं जशी कांहीं तरुण मंडळी राजकारणांत तयार झालेली होती, तशीच कांहीं मंडळी स्वतंत्र विचारांचीहि तयार झाली होती. भारताच्या स्वातंत्र्यासाठीं अधिकांत अधिक कोण त्याग करितो याची शर्यत लागली होती. सेनापति बापटांचें घराणें स्वातंत्र्याच्या वातावरणांत वाढलेलें होतें. अहमदनगर जिल्ह्यांतील पारनेर हें सेनापतींचें गांव. याच गांवीं सेनापतींचा जन्म झाला. पुण्यांतील डेक्कन कॉलेजांत त्यांचें उच्च शिक्षण झालें. प्रो. सेल्बी, प्रो. फ्रेजर, प्रो. भांडारकर वगैरे एकापेक्षां एक विद्वान आणि बाणेदार वृत्तीचे गुरुजी बापटांना लाभले. मुळमुठा नदीच्या काठीं खंडोबाच्या माळावर असलेलें डेक्कन कॉलेज, त्या कॉलेजमधील शिक्षक आणि विद्यार्थी हें महाराष्ट्राचें त्याकाळीं भूषण होतें.

सेनापती बापट कॉलेजमध्यें शिक्षण घेत होते खरे पण तें पुरें करण्यापेक्षां भारत स्वतंत्र कसा होईल याकडेच त्यांचा ओढा अधिक होता. भारताच्या स्वातंत्र्यासाठीं आपणाला काय करतां येईल, त्या कामीं माझा उपयोग काय होईल, हेच विचार त्यांच्या मनांत सतत घोळत होते.

पण त्यांना अशा विचारांत फार वर्षें काढावीं लागलीं नाहींत. सर मंगळदास नथूभाई या दानशूर गृहस्थानें ठेविलेली शिष्यवृत्ति बापटांस मिळाली व ते यंत्रशास्त्राचा अभ्यास करण्याच्या निमित्तानें इंग्लंडांत गेले. तेथें त्यांनीं एडिंबरो येथील कॉलेजांत नांव दाखल केलें आणि कॉलेजच्या अभ्यासाबरोबरच तेथील सामाजिक, राजकीय माहिती मिळविली.

याच वेळीं वीर वि. दा. सावरकर लंडन येथें होते. त्यामुळें या दोन भारतपुत्रांची वारंवार भेट होऊं लागली. विचार विनिमय होऊं लागला. दोघांची प्रकृति एक, वृत्ती एक, विचार एक, ध्येय एक, मनसुबे एक. दोघेहि एकध्येयासाठींच एकत्र आले.

सेनापति बापट म्हणजे तेजस्वी तारा. तेजस्वी ताऱ्याकडे साऱ्यांचें लक्ष वेधतें. तसेंच सेनापतीकडे लंडनमधील कित्येक राजकारणी, समाजकारणी पुरुषांचें लक्ष वेधलें. डिंगवाल साहेब नांवाच्या एका विद्वान गृहस्थानें सेना-

पतींना एका व्याख्यान मालेंत व्याख्यान देण्याचा आग्रह केला. सेनापतींनीं तो आग्रह मान्य केला. व्याख्यान देण्याचें कबूल केलें आणि ‘ ब्रिटिशांची भारतांतील सत्ता ’ या विषयावर फार माहितीपूर्ण असें व्याख्यान दिलें. या व्याख्यानांत भारतीय जनता स्वातंत्र्यासाठीं किती अधीर झाली आहे, हें सांगितलें.

भारतांत याच वेळीं इंग्रजसरकारनें सत्तेच्या वरवंटयाखालीं ‘स्वातंत्र्याची चळवळ ’ चिरडण्याचा सपाटा चालविला. पंजाब केसरी लाला लजपतराय यांस राजकीय गुन्ह्याबद्दल पकडण्यांत आलें; त्यामुळें भारतांत प्रचंड वादळ झालेंच पण इंग्लंडमधील भारतीय तरुण चटकन् एकत्रित आले. त्यांच्या सभा होऊं लागल्या ठराव पास होऊं लागले. सरकारकडे, अर्ज–विनंत्यांचे ढीगच्या ढीग पडूं लागले. बंगालची फाळणी रद्द करा. लालाजींस मुक्त करा अशी मागणी सरकारकडे होऊं लागली. भारतांत तर स्वदेशी चळवळीला दिवसें दिवस निराळेंच स्वरूप प्राप्त होऊं लागलें. परदेशी मालावर बहिष्कार टाकावा, या मताच्या लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढूं लागली.

सेनापति बापट मात्र म्हणत असत ‘ नुसती चळवळ, विनंत्या–अर्ज यांचा कांहीं उपयोग नाहीं. आपण सरकारला ठराविक मुदत देऊं या. या मुदतींत भारताचे प्रधान मंत्रि लॉर्ड मोर्ले साहेब यांनीं लालाजींची जर मुक्तता नच केली तर मग साहेबबहादूर आहेत आणि मी आहे. पाहून घेईन काय तें ! ’

सेनापतींचा हा विचार यावेळीं इतर मंडळीस पसंत पडला नाहीं तरी पण प्रत्येकाच्या मनांत भारताच्या स्वातंत्र्याची तळमळ चालली होती. जो तो एकमेकास विचारीत होता—

“ आईस सोडवाया येणार कोण बोला ” आणि एकमेकास सांगत होता. सशस्त्र क्रांतीशिवाय स्वराज्य प्राप्ती नाहीं. स्वातंत्र्य नाहीं.

सशस्त्रक्रांति !

सशस्त्र क्रांतीसाठीं शस्त्रें पाहिजेत.

हीच मोठी अडचण. हीं मिळणेंच कठीण गोष्ट.

पण खरी–खरी इच्छा असेल; खरी–खरी मनाची तळमळ असेल तर नव्या कल्पना सुचतात. नवे विचार डोकावूं लागतात. नवा मार्ग दिसूं लागतो.

आपले सेनापति बापट म्हणजे खरी तळमळ. नव्या कल्पनांचें उगमस्थान. त्यांना पॅरिसला जावें, तेथें शस्त्रें तयार करण्याचें शिक्षण घ्यावें, विशेषत: बॉंबगोळे तयार करावयाचें शिक्षण घ्यावें, असें वाटूं लागलें.

आणि मग आपले सहकारी मिर्झा अब्बास व हेमचंद्रदास या दोघांना आपला हा बेत त्यांनीं सांगितला. तिघेहि एका विचाराचे, एका वृत्तीचे, तिघांचीहि ज्वाज्वल्य देशभक्ति ! पंजाब, बंगाल आणि महाराष्ट्र या तीन प्रांतांतील हे तीन तरुण एका भूमिकेवर उभे राहिले. हे तिघेहि बॉंबगोळे तयार करण्याचें शिक्षण घेण्यासाठीं पॅरिसला गेले. तेथें ते एका साबणाच्या कारखान्यांत राहून बॉंबगोळे तयार करण्याची कृति कांहीं रशियन मित्रांकडून शिकले. या कामीं यांना कितीतरी त्रास झाला. कितीतरी अडचणी आल्या. पण त्रास कुणाला ? ज्याला कार्याची तीव्र तळमळ नाहीं त्याला. अडचणी कुणाला ? ज्याच्या ठिकाणीं धैर्य नाहीं त्याला. कार्याचा बाऊ कुणाला ? ज्याच्या ठिकाणीं निर्धार नाहीं, निश्चय नाहीं, त्याला.

सेनापतींनीं साऱ्या संकटांना बाजूला सारलें. त्यांनीं बॉंबगोळे तयार करण्याची कृति आत्मसात केली. त्याची कृति पत्रकें तयार केलीं व त्यांतील कांहीं पत्रकें पोस्टानें भारतांत पाठवून दिलीं. कांहीं पत्रकें मिर्झा अब्बास व बाबू हेमचंद्रदास यांच्याजवळ देऊन त्यांस भारतांत पाठवून दिलें आणि आपण स्वत: अभ्यासाच्या निमित्तानें पॅरिसमध्येंच राहिले.

पण ते पॅरिसमध्यें स्वस्थ राहिले का ? ध्येयनिष्ठास स्वस्थ बसून राहावेल का ? सेनापति तर ध्येयनिष्ठ ! ते कसे स्वस्थ रहाणार ! त्यांनीं 'आमची कांग्रेस पुढें काय करणार आहे ?

" What shall our Congress do ? "

या मथळ्याखालीं लेख लिहून त्याच्या ५०० प्रति तयार केल्या व निरनिराळ्या वर्तमान पत्रांकडे त्या पाठविल्या. या लेखांत सेनापतींनीं लिहिलें होतें–

" भिक्षांदेहिवृत्ति नष्ट झाली. आतां कांहीं खरी प्रयत्न करूं या. कोणत्याहि परकीय संघटनेच्या औदार्यावर अवलंबून राहूं नये.

स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य या लोकमान्य प्रणित चतुःसूत्रीचा प्रचार करून जनता संघटीत करावी व मग स्वराज्य स्थापना, ह्या एकाच मार्गाकडे साऱ्या राष्ट्राचें लक्ष वेधून घ्यावें."

—असे मुद्दे त्या लेखांत त्यांनीं लिहिले आहेत. त्यावेळीं कलकत्त्यास अरविंदबाबूंच्या संपादकत्वाखालीं निघणाऱ्या वंदेमातरम् या इंग्रजी दैनिकांत हें पत्रक प्रसिद्ध झालें.

पुढें सन १९०८ च्या मार्च महिन्यांत सेनापति बापट आपलें नांव बदलून एका फ्रेंच बोटींतून भारतांत आले. सेनापतींच्या पाठीवर गुप्तहेर होतेच. पण या चाणाक्ष माणसानें हेरांना थांगपत्ताहि न लागूं देतां पिस्तुलें व बाँबगोळे तयार करण्याच्या कृतीचें वाङ्मय भारतांत आणलेंच !

सेनापति बापट भारतांत आले.

बाँबगोळे तयार करण्याची कृति भारतांत आली.

भारतांत बाँबगोळे तयार होऊं लागले. बंगालच्या फाळणीमुळें बंगाल पेटला होताच. बंगालला महाराष्ट्र सहानुभूति दाखवीत होता.

सेनापति बापट आले ते कलकत्त्यास गेले. तेथें मिर्झा अब्बास, हेमचंद्रबाबू, उल्हासकर, दत्त आणि इतर कांहीं क्रांतिकारक होते. त्यांना भेटले. तेथून पुण्यास आले. पुण्यास महाराष्ट्राच्या दैवताला—लो. टिळकांना ते भेटले पण त्यांना लोकमान्यांबरोबर विशेष कांहीं चर्चा करतां आली नाहीं. कारण लोकमान्यांस तांतडीनें मुंबईला जावयाचें होतें. पुढें तर लोकमान्यांना सहा वर्षांची शिक्षाच झाली.

सरकार बहिष्कारानें नमत नसेल तर बाँब फेकले पाहिजेत असें सेनापति बापट आणि त्यांचे क्रांतिकारक मित्र बोलूं लागले.

आणि ता. ३० एप्रिल १९०८ रोजीं पहिला बाँब स्फोट झाला. खुदीराम बोस व प्रफुल्लचंद्र चक्रवर्ती ऊर्फ चाकी यांनीं मुझफरपूर येथें हा बाँब फेकला. या स्फोटानें दोन इंग्रज स्त्रिया मरण पावल्या.

अशा या क्रांतीचे सूत्रधार कोण ? सेनापति बापट सूत्रधार असल्याचें माणिकतोळा खटल्यांत नरेंद्र गोसाव्यानें सांगितलें.

आणि त्याचा परिणाम सेनापतींस अज्ञातवास स्वीकारावा लागला.

सेनापति अज्ञातवासांत !

कुठें आहेत ते ?

कुणाला माहीत !

सरकारनें प्रयत्नांची कमाल केली. पण पत्ता नाहीं. सेनापति बापट कुठेंच सांपडत नाहींत.

असे बरेच महिने गेले.

आणि सेनापति आतां सरकारच्या हातीं लागले.

विश्वास घात केला ! तोहि एका मित्रानें, इंदुरास बाळ्या नांवाच्या मित्राच्या घरीं सेनापति होते.

सेनापति आणि बाळ्या, बाळ्याच्या घराच्या माडीवर बोलत बसले.

इतक्यांत एक मित्र तिथें आला आणि सेनापतींच्या गळ्यांत हात घालून रडूं लागला !

अरे झालें काय ? रडतोस कां ?

घात झाला !

घात झाला !! झालें काय ?

पोलीसांचा गराडा पडला.

'असं ! ठीक आहे.' असें म्हणून सेनापति शांतपणें पोलिसांच्या स्वाधीन झाले. सरकारनें सेनापतींना इंदूरहून मुंबईस आणलें. तेथून दिल्लीला नेलें. कटाचा सुगावा लागतो का सरकार पहात होतें. पण सेनापति म्हणजे धैर्याचे मेरूमणी, निर्धारी, निश्चयी. बॉंबगोळ्यांच्या कटाचा सेनापतींकडून सुगावा लागणें शक्य होतें का ?

मुळींच नव्हतें !

सरकारला हें कळूनहि चुकलें.

शेवटीं सरकारी पोलिस अधिकारी व्हिन्सेंट एकवेळ सेनापतींस म्हणाला, 'आम्ही तुम्हाला सोडतों. तुम्ही आमच्या करितां कांहीं केलें पाहिजे. काय कराल ?'

" मी तुमच्यासाठीं एक गोष्ट करीन. मला वैयक्तिक खून करणें, ही गोष्ट मुळींच मान्य नाहीं. स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं विचारपूर्वक, अत्यंत सावधपणानें दीर्घ प्रयत्न केला पाहिजे. संघटना केली पाहिजे. हत्यारें गोळा करून वा तयार करून त्यांचे निरनिराळे सांठे तयार केले पाहिजेत. राष्ट्रांत शक्ति उत्पन्न करून योग्य वेळीं तिचा उपयोग केला पाहिजे. शक्तीची उपासना करून ती प्रसन्न झाल्यावरच राम रावणाला मारूं शकला. असा मी जरूर प्रचार करीन. आहे कबूल ? "

साहेब अगदीं थंड पडला !

आणि सरकारनें कांहीं अटींवर सेनापतींची मुक्तता केली.

सेनापति आपल्या पारनेर गांवीं आले. या गांवीं राहूनच त्यांनीं कांहीं दिवस देशकार्य करावयाचें ठरविलें.

आतां सेनापतींचें नवें देशकार्य.

कोणतें कार्य तें ?

सेनापतीच सांगतात—

" पोथ्या यंत्रें नष्ट झाली कृतिस्मृति ।
घरी आणूनि हरिनें आदेशिली नवीकृति ॥
दिला झाडू, दिलें खोरें दिलें खापर तें करीं ।
रस्ते गटारें झाडावीं दिली ही मज चाकरी ॥ "

—अशा प्रकारचें सेनापतींनीं देशकार्य हातीं घेतलें. नंतर कांहीं दिवसांनीं ते पुण्यास आले. मुंबईस आले. त्यांनीं आपली ही सेवा सोडली नाहीं. तिच्यांत खंड पडूं दिला नाहीं.

पण या सेवेपेक्षांहि—या कार्यापेक्षांहि फार मोठें कार्य त्यांनीं हातीं घेतलें तें ' मुळशीच्या सत्याग्रहाचें. '

पुणें जिल्ह्यांत मुळशी पेट्यांत धरण बांधून त्यावर वीज उत्पन्न करावयाची व ती वीज पुणें-मुंबईस न्यावयाची, ही टाटा कंपनीची योजना, या योजनेमुळें मुळशी पेट्यांतील सुमारें ५४ गांवें पाण्याखालीं बुडत होतीं. तेथील शेतकऱ्यांस आपलीं घरेंदारें सोडून दुसरीकडे जावें लागत होतें. त्यांना अत्यंत वाईट दशा प्राप्त होणार होती.

जणूं काय मुळशीपृथ्वी बुडत होती. तिला वांचविण्यासाठीं देवानें वराह अवतार घेणें जरूर होतें. सेनापति बापट यांचें नांव पांडुरंग. ह्या पांडुरंगानें वराह अवतार घेतला. हा देव बुडत्या पृथ्वीस वांचविण्यास धांवला. सारे म्हणूं लागले,

बुडत्या धरणीला पांडुरंग रे वराह
मुळशींत मोठा मांडीती सत्याग्रह

' मुळशी योजना रद्द करावी ' आणि त्या भागांतील रहिवाशांवरील संकट टाळावें, यासाठीं सेनापतींनीं सत्याग्रह केला.

म्हणून त्यांना शिक्षा झाली !

देश सुखी व्हावा, यासाठीं केलेल्या भाषणामुळें शिक्षा !

ती आतां संपत आली—संपली. आणि सन १९३७ च्या जुलै महिन्यांत सेनापतींची मुक्तता झाली.

पुन्हा कार्याला आरंभ—

सेनापतींचें आज ८० वर्षांचें वय आहे. पण ते आज पूर्वींच्याच जोमानें, पूर्वींच्याच हिरीरीनें देशकार्य करीत आहेत. फक्त त्यांच्या कार्याची दिशा बदलली आहे.

भारताच्या स्वातंत्र्यासाठीं,
भारती यांच्या सुखासाठीं,

त्यांनीं नाना कष्ट भोगले. दुःखें सहन केलीं, आपलें सारें आयुष्य देशासाठीं अर्पण करावयाचें ठरविलें. समर्थांनीं आपल्या दासबोधांत म्हटल्या प्रमाणें,

दुसऱ्याच्या दुःखें दुखावे । दुसऱ्याच्या सुखें सुखावे ॥
अवघेची सुखी असावे । ऐसी वासना ॥

—अशा या थोर देशभक्ताला, आमच्या आदर्श पुरुषाला आमचे शतशः वंदन.

• • •



# १० • कोण भितो मरणाला !

बैठो मत ! शामतक तेल पूरा करना पड़ेगा. असें कोण सांगत आहे.

अंदमान बेटांतील तुरुंगावरील एक जमादार. कोणाला सांगत आहे ?

एका देशभक्ताला ! आपली भारतमाता स्वतंत्र करण्यासाठीं ज्यानें आपल्या जिवाचें रान केलें, प्राण तृणवत मानला. अशा भारतमातेच्या एका वीर पुत्राला.

इ. स. १९१२–१३ च्या सुमारची गोष्ट. ह्यावेळीं भारतांतील लहानापासून थोरांपर्यंत, तरुणापासून वृद्धांपर्यंत साऱ्यांचीं अंतःकरणें स्वातंत्र्यासाठीं भारावलीं होतीं. प्रत्येकाला वाटत होतें, आपणाला स्वातंत्र्य पाहिजे. स्वातंत्र्याच्या वातावरणांत आपणाला वाढलें पाहिजे. खेळलें पाहिजे. स्वातंत्र्याचें वारें आपण घटाघट प्यालें पाहिजे. स्वातंत्र्यांत हिंडलें फिरलें पाहिजे आणि स्वातंत्र्यांतच आपणाला मरण आलें पाहिजे.

भारतांतील जनतेची स्वातंत्र्याची उत्सुकता अगदीं शिगेली पोंचली होती आणि त्याला कारणेंहि तशींच घडलीं होतीं. इ. स. १८९८ सालापासून कर्झनशाहि सुरू झाली होती. कर्झन हा फार घमेंडखोर. त्याला वाटत होतें, भारतांतील लोकांना मन नाहीं. बुद्धि नाहीं. विचार नाहीं. भावना नाहीं.

आणि आपल्या या समजुतीप्रमाणें तो वागत होता. लोकांच्या डोळ्यांत धूळ फेकीत होता. आपल्या वेडगळ समजुतीच्या पांडित्याचें प्रदर्शन करीत होता. 'आम्ही इंग्रज लोक तुमच्यापेक्षां सर्वप्रकारें श्रेष्ठ आहोंत,' असें भासवीत होता. विशेषतः बंगाली लोकांवर त्याचा विशेष डोळा. बंगाली लोकांत एकज्यूट आहे. लोक सुशिक्षित आहेत. विद्वान आहेत. भावना प्रधान आहेत. त्यांच्यांत एकी आहे. हे लोक एकीच्या बळावर ब्रिटिशांच्या सत्तेला सुरुंग लावतील, असें त्यास भारतांत गव्हर्नर जनरल म्हणून आल्यापासून वाटत होतें. म्हणून त्यानें बंगालचे दोन भाग पाडावे, बंगालची फाळणी करावी, असें ठरविलें.

आणि त्यानें इ. स. १९०५ मध्यें बंगालची फाळणी जाहीर केली. आसाम, चितगांग व पूर्व बंगालचे बारा जिल्हे मिळून एक भाग आणि बंगालचा बाकीचा दुसरा भाग. मूळच्या बंगालचे हे दोन भाग हिंदू-मुसलमानांच्या कमी अधिक वस्तीचा विचार करून केले. कर्झनच्या या फोडा आणि झोडा वृत्तीची अंमलबजावणी १६ आक्टोबर १९०५ पासून अमलांत यावयाची होती.

बंगालमधील जनतेला तें एक प्रकारचें आव्हान होतें.

—आणि कर्झनचें हें आव्हान बंगाली जनतेनें आनंदानें स्वीकारलें.

बंगालमध्यें राष्ट्रीय चळवळ सुरू झाली. महाराष्ट्राचा नरकेसरी लो टिळक यांनीं लेखांच्या आणि व्याख्यानांच्या द्वारें बंगालला सहानुभूति दाखविली. पंजाबचा सिंह लाला लजपतराय व सरदार अजितसिंह या दोघांनीं पंजाब प्रांत उठविला. लालाजी शहरवाशीयांचे पुढारी तर अजितसिंहजी ग्रामीण लोकांचे पुढारी. या पुढाऱ्यांनीं 'पंजाब भारतमाता' सोसायटी स्थापन केली व तिच्या मार्फत जोराची चळवळ सुरू केली. बंगालच्या फाळणीच्या चळवळीबरोबरच जोराचें राष्ट्रीय आंदोलन सुरू झालें. राष्ट्रीय शिक्षणाच्या

शाळा भराभर निघूं लागल्या. परदेशी मालावर बहिष्कार पडूं लागला. परदेशी कापडाच्या होळ्या होऊं लागल्या. कॉलेज विद्यार्थी आपल्या परीक्षांच्या उत्तरपत्रिका परदेशी कागदावर लिहिण्यास तयार होईनात. इ. स. १९०९ सालीं कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजांतील विद्यार्थ्यांनीं तर स्वदेशी कागदावरच प्रश्नांचीं उत्तरें लिहूं, असा हट्ट धरला.

राष्ट्रीय सभेच्या कलकत्त्यास भरलेल्या बाविसाव्या अधिवेशनाचा परिणाम जनतेवर फार मोठा झाला. या अधिवेशनांत अध्यक्षपदावरून पितामह दादाभाई नौरोजीनीं आम जनतेला संदेश दिला—

> " चळवळ करा, चळवळ करा—अखंड चळवळ करा. भारताचा प्रत्येक कोनाकोपरा या चळवळीनें भारून गेला पाहिजे. प्रत्येक हिंदी माणसानें आपल्या देशासाठीं आत्मयज्ञ करावयास पुढें सरसावलें पाहिजे. देशासाठीं सर्वस्वाची होळी करण्याची वेळ आली आहे. "

याच अधिवेशनांत पुण्यास तयार केलेली स्वदेशी छत्री अध्यक्षांवर धरण्यांत आली आणि वंदेमातरम् हें राष्ट्रगीत प्रथम गायलें गेलें. मुसलमानांचे पुढारी बॅ. जीना हेहि याचवेळीं काँग्रेसमध्यें सामील झाले.

दिवसें दिवस स्वदेशी चळवळीस निराळेंच स्वरूप प्राप्त होऊं लागलें. लेखक, नाटककार, कवि यांच्या लेखण्याहि तरुणांत चैतन्य ओतूं लागल्या. महाराष्ट्रांतील राष्ट्रीय कवि विनायक यानें तर तरुणांना स्पष्ट सवाल केला:—

स्वातंत्र्यास्तव कोण प्राणी सिद्ध न मरणाला
धिक्कार असो परवशतेच्या हीन जीविताला !
पारतंत्र्य शृंखला वाजते पायीं खळखळते
कर्कश रव नायकवे तीचा हृदय विद्ध होतें !
पुत्र खरा जो होय संकटीं जननीचा वाली
सर त्याची येई न अरीच्या अगणित सैन्याला !

—[ विनायक ]

पुढाऱ्यांनीं केलेलीं भाषणें, वर्तमान पत्रांत लिहिलेले लेख, देश प्रीति, स्वातंत्र्याची जाणीव, समर्थ विद्यालयासारख्या राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या विद्यालयांतून मिळणारें शिक्षण, खाडीलकरांच्या 'कीचकवध' या नाटकासारखीं पाहिलेलीं नाटकें, राष्ट्रीय कवींचीं वीररसानें भरलेलीं तेजस्वी काव्यें; दिवसे-दिवस दारिद्र्याची पोंचत असलेली धग, या सर्वांमुळें तरुण अगदीं स्वातंत्र्याच्या कल्पनेनें भारावून गेले.

याच सुमारास

'What shall our Congress do'

या मथळ्याखालीं सेनापति बापट यांनीं परदेशांतून लेख लिहून भारतीय जनतेस मार्गदर्शन केलें. त्यांनीं लिहिलें—

"भिक्षांदेहि वृत्ति आतां बस्स झाली. आतां कांहीं तरी प्रयत्न करूं या. स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण, स्वराज्य; या लोकमान्यप्रणित चतु:सूत्रीचा आपण जोरदार प्रचार करूं या. जनता संघटीत करूं या. स्वराज्य स्थापनेचा हाच एक मार्ग आहे."

कलकत्त्याच्या अरविंद बाबूंच्या संपादकत्वाखालीं निघणाऱ्या वंदेमातरम् या इंग्रजी भाषेंतील दैनिकानें सेनापतींचें हें पत्र प्रसिद्ध केलें.

थोर देशभक्त बॅ. सावरकर या सुमारास लंडन येथें होते. त्यांनीं अभिनव भारतसंस्था स्थापिली होती. तिचे प्रचारक अमेरिकेंतहि गेले होते. लाला हरदयाळ या प्रसिद्ध क्रांतिकारकानें अमेरिकेंत एक मोठी संस्था स्थापन केली. या संस्थेचें नांव गदर. गदर म्हणजे बंड.

याच वेळीं नरकेसरी लोकमान्य टिळक यांना सहा वर्षांची शिक्षा झाली!

सारा भारत पेटला! जो तो एकमेकांस विचारीत होता,

'आईस सोडवाया येणार कोण बोला'

इ. स. १९०७ ते ११ हीं पांच वर्षें भारताच्या इतिहासांत अत्यंत खळबळीचीं गेलीं. स्वदेश, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण, स्वराज्य हे शब्द प्रत्येकाच्या तोंडांतून क्षणाक्षणाला निघूं लागले.

सरकार घाबरून गेलें. कर्झनच्या पुढें फार मोठें प्रश्न चिन्ह उभें राहिलें. पण त्यानें आतां एक नवी युक्ति योजिली. त्यानें मुसलमानांना स्वतंत्र राजकीय हक्क मागण्याविषयीं सुचविलें.

हिंदूपेक्षां मुसलमान अधिक जवळचे आहेत, असें तो प्रत्येक राजकीय बाबतींत भासवूं लागला. मुसलमान समाजहि काँग्रेस या राजकीय संस्थेशीं फटकून राष्ट्रीय चळवळींत परक्या त्रयस्थासारखा वागूं लागला. आणि मग हिंदू-मुसलमानांचे दंगे सुरू झाले !

भारत उफाळला.

स्वातंत्र्यासाठीं तरुण अधीर झाले. त्यांनीं वाटेल त्या मार्गांनीं स्वराज्य मिळविण्याची उचल खाल्ली. त्यांनीं पिस्तुलें, बॉंब हातीं धरले. बंगाल, महाराष्ट्र, पंजाब आघाडीवर होता. बंगाल्यांत मुझफ्फर येथें खुदीराम बोस या देशभक्तानें केनेडी या गोऱ्या कुटुंबांतील बायकांचा बॉंब फेकून खून केला. नाशिकचा कलेक्टर जॅक्सन याचा खून कान्हेरेनें केला. जिकडे तिकडे सभा, व्याख्यानें, मिरवणुका, मेळे, परदेशी कापडाची होळी, वंदेमातरम्‌चा जयघोष, बहिष्कार !

सरकार या चळवळीनें खवळून गेलें. त्यानें सारासार विचार बाजूला ठेविला. सभा मिरवणुका तर राहोच पण वंदेमातरम् म्हणणाराहि राजद्रोही ठरूं लागला. तरुणांचा छळ होऊं लागला. विद्यार्थ्यांनीं सभा मिरवणुकांस हजर राहूं नये, असा सरकारनें हुकूम सोडला.

पण सरकारच्या या दडपणाला कोणी दबलें का ?

नाहीं !

ज्याला त्याला वाटत होतें,

परतंत्र जगतीं किरण
त्याहून बरें मरण
अति दीनपणें अरितें नमन
त्याहून बरें मरण
न धराल जरी तलवार करीं
चिरडील अरी समरीं

आणि म्हणूनच जो तो आपल्या शक्तीनुसार आपल्या भारतमातेला स्वतंत्र करण्याचा प्रयत्न करीत होता.

नानी गोपाळ हाहि अशा पैकींच एक १६-१७ वर्षांचा तरुण होता. या तरुणाच्या अंगांत रक्त सळसळत होतें. आपल्या प्रिय मातेच्या स्वातंत्र्यासाठीं प्राण पणाला लावावा, असें त्यास वाटत होतें. आणि म्हणूनच त्यानें एका युरोपियन पोलीस अधिकाऱ्याच्या मोटारीवर बॉंब फेकला. नानी गोपाळाला वाटत होतें, भारतांत पाशवी सत्ता गाजविणाऱ्या इंग्रज अधिकाऱ्यांना ठार मारलें म्हणजे आपली भारतमाता स्वतंत्र होईल.

आणि म्हणूनच नानी गोपाळानें इंग्रज अधिकाऱ्याच्या मोटारीवर बॉंब फेकला.

पण नानीचा हा प्रयत्न फुकट गेला. तो इंग्रजांच्या हातीं सांपडला.

स्वातंत्र्योत्सुक तरुणा नानी, तुला चौदा वर्षे तुरुंगाची शिक्षा. तुला काळ्या पाण्याच्या शिक्षेला अंदमान बेटावर पाठविला आहे.

जा. पाशवी शक्तीला हार न जातां तिच्यावर विजय मिळविण्यासाठीं आपलें मन व हृदय खंबीर कर. जा. खुशाल जा.

अंदमान कुठें आहे, हें माहीत आहे तुला ?

तुझ्यासारख्याच क्रांति करूं पहाणाऱ्या तरुणांना भारताबाहेर कुठेंतरी दूर दूर ठेवणें जरूर आहे; ही कल्पना इंग्रजांना इ. स. १७८७ सालीं सुचली आणि याकामीं अंदमान बेटाचा उपयोग करण्यास त्यांनीं इ. स. १८५७ नंतर सुरुवात केली.

तें पहा अंदमान बेट. तें कलकत्ता शहरापासून सुमारें सहाशें मैल दूर आहे. त्यावर निबीड अरण्यें आहेत. लहान मोठे पहाड आहेत आणि तो--तो पहा तुरुंग. त्या तुरुंगांतच तुला जावयाचें आहे.

> सभोवतालच्या बळकट तटाच्या आंत एकसारख्या अशा तीन मजली सात इमारती बांधलेल्या आहेत. प्रत्येक मजल्यावर वीस खोल्या व कांहीं मजल्यावर तीस खोल्या आहेत. तुरुंग कोठड्या कोठड्यांचा असल्यामुळें त्याला Cellular jail किंवा सिल्हर जेल म्हणतात.

त्याच तुरुंगांतच तुझे क्रांतिकारक बांधव—ते वासुदेव बळवंत फडके. आणि ते....ते....दुसरे त्यांचे आत्मे भारत मातेचें चिंतन करीत आहेत. हातापायांतील शृंखलांच्या नादावर मनांतल्या मनांत स्वातंत्र्यासाठीं देवाला आळवीत आहेत.

जा. राष्ट्रभक्ता, तूंहि जा. स्वतःची माता—स्वतःचा देश स्वतंत्र व्हावा, यासाठीं धडपडणाऱ्या नानी, हा तुरुंगच तुला तुझा देश स्वतंत्र करण्यास मदत करील. देशभक्ता नानी, तुला कष्टाचें मोल द्यावयाचें आहे. नारळाचीं सोडणें कूट. काथ्या तयार कर. खोबरें पिसून त्याचें तेल काढण्यासाठीं घाणा ओढ. नानी तुला हजारों दुःखदायक कामें करावयाचीं आहेत, त्यासाठीं तयार रहा.

नानी, नेस लंगोटी आणि या बंद खोलींत चल ! हं, धर कोल्हूची दांडी आणि दहा वाजेपर्यंत फिरव हा कोल्हू.

नाहीं फिरवितां येत कोल्हू ! शक्ति नाहीं तुला ! डोळ्यांतून घळघळ पाणी येतें तुझ्या ! रडतोस तूं ! ! रडून काय होणार आहे ! येथील अधिकारी पाषाणहृदयी आहेत. त्यांना दया–माया, सार–असार, शक्य–अशक्य हें कांहीं समजत नाहीं. त्यांनीं तुला आरंभींच सांगितलें ना—

“ बैठो मत. शामतक तेल पूरा करना पडेगा. ”

तुला कोल्हू फिरविण्याची शक्ति नसली तरी तूं कोल्हू फिरविलासच पाहिजे. कोल्हूची दांडी चाक फिरवितात तशी फिरव—दांडीस हातांनीं उचल व अर्धा गरका दे. मग ती वर गेल्यावर उरलेला अर्धा गरका देण्यास लागणारा जोर तुझ्या हातांत नसला तर त्या दांडीस लोंबकळून तो खालीं फिरव. थांबावयाचें नाहीं. तो पहा देखरेख करणारा अधिकारी हातांत वेत घेऊन उभा आहे. तो तुझ्यावर सपासप वेत मारील. फिरव फिरव कोल्हू. देशभक्ता, भारतमातेच्या वीरपुत्रा नानी, देशाच्या स्वातंत्र्यासाठीं कष्टाचें मोल दे.

काय ! कोल्हू फिरवितां फिरवितां चक्कर आली. पाणी ! पाणी पाहिजे ?

छे छे, पाणी नाहीं. तुरुंगांतील कैद्याला जसें अन्न मोजकें मिळतें तसें पाणी पण मोजकेंच मिळतें. तुझ्या वांटणीला दररोज दोन कटोरे पाणी ! बस्स. तिसरा नाहीं. मग चक्कर येवो नाहींतर तुझा प्राण जावो. तुला पाणी मिळणार नाहीं.

तुला शामतक तेल पूरा करना पडेगाच. नानी गोपाळ, आलेल्या संकटाला–छे छे ! हें आलेलें संकट कसलें ! तूं आनंदानें स्वीकारलेलें हें कर्तव्य आहे. नानी, आपला देह स्वतंत्र्यासाठीं खर्ची पडत आहे याबद्दल

तुला आनंदच होईल. आपला देश, आपली माता यांच्या स्वातंत्र्यासाठीं सुखासाठीं, यांच्या उन्नतीसाठीं जर आपल्या देहाची आहुति देण्याची संधि सांपडली तर कचरूं नये. ती संधि दवडूं नये, हें तूं जाणतोसच !

नानी गोपाळ, तुझ्यासारखा एखादा ध्येयानें पेटलेला वीर राष्ट्रांत उभा राहिला म्हणजे सारें राष्ट्र पेटतें. सारें राष्ट्र त्या वीराच्या पाऊलावर पाऊल ठेवून चालतें. तुझ्या मागून तुझें भारत असेंच करील.

तूं या स्वातंत्र्य समराला आनंदानें तोंड दे. कष्टाचें मोल दे. कष्टाचें मोल दिल्याशिवाय स्वातंत्र्य मिळत नाहीं. हा तुरुंग; तुरुगांतील हे कष्ट ! हेच तुझी भारतमाता स्वतंत्र करण्यास मदत करतील. नानी, भारतमातेच्या स्वातंत्र्यासाठीं आपण कांहीं तरी केलें, अशी जेव्हां–जेव्हां तुला आठवण होईल तेव्हां तेव्हां तुला अपरमीत समाधान होईल. तुला स्वातंत्र्या-साठीं तळमळ लागली आहे. या तळमळीमुळें कोणत्याहि जुलमाला, धाकाला तूं दबणार नाहींस. आपल्या ध्येयापासून तूं तीळमात्र परावृत्त होणार नाहींस, ह्याची आम्हाला खात्री आहे. कोणत्याहि स्वरूपांत प्रगट झालेल्या पाशवी शक्तीला तूं हार जाणार नाहींस. दबणार नाहींस. उलट त्या पाशवी शक्तीवर तूं विजय मिळवशील.

नानी, तुझें मन, तुझें हृदय खंबीर आहे. पवित्र आहे.


देशभक्ता नानी,

देशभक्ता प्रासाद बंदिशाला
शृंखलांच्या गुंफिल्या पुष्पमाला
चिता सिंहासन शूल राजदंड
मृत्यु दैवत अमरता उदंड.

हें सत्य ना ?
अगदीं सत्य !

नानी, भारतमातेच्या स्वातंत्र्यासाठीं कष्टांचें मोल दे.

०००




# ११ • एक पाऊल पुढें

आज लाहोर शहरांत मोची गेटाजवळ एका लहानशा घरांत गुप्त बैठक चालू आहे. रात्रीची वेळ आहे. जिकडे तिकडे अगदीं सामसूम आहे. सारें लाहोर झोपी गेलें आहे. क्रांतिवीर मात्र एका मिणमिणत्या दिव्यासभोंवती बसून बेत ठरवीत आहेत. मात्र ते अगदीं संशयीतच आपल्या हालचाली करीत आहेत. बोलणेंच पण तेहि इकडे तिकडे पहात बोलत आहेत. चारी बाजूस चार भिंती ! पण भिंतीलाहि कान असतात. त्याची त्यांना जाणीव आहे. ज्या घरांत ही बैठक चालली आहे, त्याच्या आजुबाजूला टेहळणे ठेवायला ते विसरले नाहींत! क्रांतिकारकांना, गुप्त बैठका घेणाऱ्यांना, अशी सावधगिरी बाळगावीच लागते. म्हणच आहे कीं, क्रांतीच्या मार्गानें जावयाचें असेल तर त्या मार्गाच्या चारी दिशांकडे चार कोस पाहून चालावें. पण कधीं कधीं इतकी सावधगिरी बाळगूनहि ठेचा लागतात. अंग खरचटतें आणि प्राणावरहि बेततें !

आजहि असेंच झालें. एकाएकीं या क्रांतिवीरांच्या बैठकीवर पोलिसांची झडप पडली !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत-
अनुक्रम ........ दि: ........

कांहीं क्रांतिकारक सांपडले. पण ज्यांच्यासाठीं सरकारनें बक्षिसें लाविलीं होतीं ते पिंगळे आणि रासबिहारी हातीं लागले नाहींत. ते दोघेहि निसटले !

क्रांतीच्या कृतीची घोषणा १९ फेब्रुवारी १९१४ रोजीं करावयाची पण आज दोन दिवस अगोदर हें असें झालें. क्रांतिवीरांची गुप्त बैठक पांगली गेली. विस्खळली गेली.

तरीपण क्रांतिवीर आपल्या निश्चयापासून ढळले का ? छे ! त्यांच्या क्रांतीची सारी सिद्धता झाली आहे. शस्त्रें जमलीं आहेत. बॉंबगोळे तयार आहेत. युद्ध घोषणाहि तयार आहेत. क्रांतीचा ध्वज तयार आहे. तारायंत्र लोहमार्ग, कुठें उखडून टाकावयाचे याचे नकाशे तयार आहेत. कांहीं सैन्यहि फितूर झालें आहे. क्रांतिवीरांचा जोम, निश्चय कायम आहे नव्हे, तर तो आतां अगदीं ठाम-ठाम झाला आहेच.

पिंगळे ? तो तर आज लाहोरहून बनारसला गेलाहि. तेथें त्यानें नव्या उत्साहानें, नव्याजोमानें कामास सुरवात केली. एका ट्रंकेंत अठरा मोठे बॉंब भरले आणि तो मीरतला लष्करी फितुरीसाठीं गेला. तेथें त्यानें नाना युक्त्या केल्या. नाना खटपटी केल्या आणि सैन्यांत फितुरी केली. एक अफगाणी सैनिक तर पिंगळेचा दोस्त बनला. या दोस्तावर पिंगळेनें आपला विश्वास टाकला. आपणाला करावयाचीं गुप्त कारस्थानें त्याला सांगितलीं. स्वतःबरोबर आणलेले बॉंब त्याच्या स्वाधीन केले. आणि तो लष्कराच्या दुसऱ्या एका छावणींत फितुरीसाठीं गेला.

विष्णू गणेश पिंगळे सापळ्यांत अडकला.

मीरतचा पोलीस अधिकारी विल्किन्सन आणि लष्करी छावणीचा अधिकारी कर्नल हंप्रे यांनीं लष्करी छावणींत पिंगळेला पकडलें.

भारतासाठीं ज्यानें जन्मदात्या आई बापाच्या प्रेमाची पर्वा केली नाहीं. यांत्रिक शिक्षण घेऊन संपत्ति मिळविण्याची हाव धरली नाहीं. तो शूर क्रांतिवीर आज ब्रिटिशांच्या हातीं लागला !

कोणी दिलें पिंगळेला पकडून ?

पिंगळेचा दोस्त भासविणारा तो–तो अफगाणी सैनिक त्यानेंच हा विश्वासघात केला.

म्हणूनच शूर क्रांतिवीर पिंगळे ब्रिटिशांच्या हातीं सांपडला.

आणि ही बातमी ता. २४ मार्च १९१५ रोजीं निरनिराळ्या वर्तमानपत्रांत मोठमोठ्या मथळ्याखालीं प्रसिद्ध झाली. सारा भारत हळहळला. आतां पिंगळ्याचें पुढें काय होईल, याची काळजी प्रत्येकाला वाटूं लागली.

पिंगळ्याचें पुढें काय होईल ? काळें पाणी ? फांशी ?

फांशी !

फांशीची शिक्षा ऐकून पिंगळेला दुःख झालें नाहीं. माझ्या देशासाठीं माझ्या प्राणाचें मोल देण्यास मी आनंदानें तयार आहें. माझ्या देशाला माझ्या मातृभूमीला स्वतंत्र करावें, ही एकच माझी इच्छा. मी जीं कांहीं कृत्यें केलीं, तीं ह्या एकाच उद्देशानें. स्वातंत्र्य हीच माझी उत्कट इच्छा आणि ह्या एकाच इच्छेसाठीं मी माझ्या प्राणाचें मोल देण्यास आनंदानें तयार झालों आहे. माझ्या भारतासाठीं मी आई–वडिलांच्या प्रेमाची पर्वा केली नाहीं. आज माझी जन्मदात्रि आई आहे. दोन वर्षांपूर्वीं वडील वारले. इ. स. १९११ च्या जूनमध्यें तळेगांवीं घरच्या मंडळीला भेटलों. आई–वडिलांचें दर्शन घेतलें आणि घर सोडलें. आज त्याला चार वर्षे झालीं. घराचें दर्शन नाहीं. बाबा गेले. आईचें दर्शन ? होय. आजच आई येऊन भेटली. ती ढसढसां रडली. माझेहि डोळे ओले झाले. मी आईला म्हणालों; ‘ आई, माझ्या हातून मातृसेवा घडली नाहीं. ती घडून यावी, यासाठीं मी पुन्हां तुझ्याच पोटीं जन्म घेईन आणि तुझी सेवा करीन. ’

‘ आई, हें दर्शन–शेवटचें दर्शन. ’

हं ! पिंगळे ऊठ. गाढ झोंपलास काय ! तुला मृत्यूची भीति नाहीं वाटत ! ! तुला फांशी द्यावयाचें आहे. आज मंगळवार १६ नोव्हेंबर १९१५ आहे. चल.

—हे शब्द ऐकून—

पिंगळेचें अंतःकरण आनंदानें फुललें. स्वातंत्र्य संग्रामाच्या वेळीं देशभक्ताचें अंतःकरण प्रफुल्ल होतेंच. तें सामर्थ्यशाली बनतें आणि जीवनांतील कोणतेंहि दुःख तें आनंदानें पेलतें. स्वातंत्र्यावरील श्रद्धेनें मनाला ही दिव्यशक्ति येते आणि त्याला स्वातंत्र्यासाठीं आत्मत्याग करण्यांत अत्यानंद होतो.

पिंगळेचेंहि असेंच होतें. त्यालाहि " तुला आज फांशी द्यावयाचें आहे " हे शब्द ऐकून अत्यानंद झाला. त्याचेंहि अंतःकरण आनंदानें फुललें आणि तो उठला.

पिंगळेला वधस्तंभाकडे नेण्यांत आलें.

बोल. तुझी शेवटची इच्छा काय आहे ?

" हातकड्या काढा. मला हात जोडून ईश्वराची प्रार्थना करूं द्या. "

हातकड्या काढण्यांत आल्या.

पिंगळेनें हात जोडले. आणि तो म्हणाला,

परमेश्वरा, ज्या पवित्र कार्यासाठीं
आम्ही आमचे प्राण बलिदान करीत
आहोंत, तें कार्य तूं पूर्ण कर.
हीच माझी तुला प्रार्थना आहे. "

—प्रार्थना झाली. तो वधस्तंभाजवळ उभा राहिला. त्याला मंगलपांडे दिसूं लागला. वासुदेव बळवंत दिसूं लागले. चाफेकर दिसूं लागले. कान्हेरे दिसूं लागले—सारी ही ओळखीची मंडळी हसत–हसत आपलें स्वागत करीत आहे. ही मंडळी म्हणत आहे, पिंगळे, देशाच्या स्वातंत्र्यासाठीं प्राणाचें मोल देण्यास निघाला आहेस ! ये-ये मित्रा पिंगळे, ये ये; असें म्हणत बोलावीत आहेत.

ती–ती तिकडे भारतमाता उभी राहून अश्रु ढाळीत म्हणत आहे, माझ्या सुपुत्रा पिंगळे, तूं माझ्या स्वातंत्र्यासाठीं हसत मुखानें वधस्तंभाजवळ उभा आहेस ना ?

बाळा माझा तुला आशीर्वाद आहे. तूं अमर होशील.

पिंगळेनें सर्वांकडे एकवार नजर फिरविली आणि त्यानें हसत मुखानें वधस्तंभाकडे पाहिलें.

● ● ●



# १२ • सागर खवळला

"बांधव हो, आपला झगडा शांततेनें चालवावयाचा, हें आपलें ध्येय आहे. पण सरकार जर अशाच तऱ्हेनें वागणार असेल तर आमचीं तरुण माणसें आमच्या हातांतून सुटतील व देशाला स्वतंत्र करण्याच्या बाबतींत त्यांना भलेबुरे मार्ग स्वीकारावेसे वाटतील."

सन १९२८ च्या आक्टोबर महिन्याची तीस तारीख. या दिवशीं लाहोर शहरांतील प्रत्येकाच्या शरीरांत एक प्रकारचें निराळेंच वारें संचारलें होतें. जो–तो एका निश्चयानें भारावला होता. प्रत्येकाच्या चालण्या बोलण्यांत करारीपणा, निश्चय दिसत होता. चौकाचौकांतून गल्यागल्यांतून, रस्त्या-रस्त्यांतून, घराघरांतून लोकांचे जमाव दिसत होते. लोक कुजबुजत होते. चर्चा करीत होते.

कसली चर्चा करीत होते? स्वतःच्या स्वार्थाची?

नाहीं. भारताच्या स्वातंत्र्याची.

भारताला स्वातंत्र्य देतों–देतों; अशीं पोरकट आश्वासनें इंग्रज भारताच्या महान पुढाऱ्यांना वेळोवेळीं देत आले आणि तीं कोणत्या ना कोणत्या सबबीवर पुढें ढकलीत–ढकलीत चालले.

इ. स. १९१८ सालीं इंग्रज सरकारनें भारताला स्वातंत्र्याचे कांहीं हक्क देण्याचें जाहीर केलें. त्याला आज दहा वर्षें झालीं. पण कोणते हक्क आणि ते कसे द्यावयाचे, ह्याचा सरकारचा अद्याप विचारच करून संपला नाहीं.

या दहा वर्षांच्या काळांत कितीतरी राजकीय उलाढाली झाल्या.

महात्मा गांधीनीं जनतेला असहकारितेचा मंत्र दिला तो १ आगस्ट १९२० पासून. हा मंत्र साधासुधा नव्हता. ह्यांत अमोघ शक्ति होती. महात्माजीनीं जनतेला बजावलें,—असहकारितेचा महामंत्र अमलांत आणण्यासाठीं तुमच्यांत जितक्या प्रमाणांत सहकारिता असेल तितक्या प्रमाणांत सरकारशीं तुम्हीं प्रभावी व यशस्वी असहकार करूं शकाल. सरकार अन्यायानें वागत आहे. तरी आपण अन्यायानें वागावयाचें नाहीं. सरकारच्या अन्यायाचा प्रतिकार शांततेनें करावयाचा. सरकारशीं कोणत्याहि प्रकारचा संबंध ठेवावयाचा नाहीं. पोलीस, लष्कर यांच्याशीं सहकार करावयाचा नाहीं. सरकारनें दिलेल्या पदव्यांचा त्याग करावयाचा आणि करबंदीहि करावयाची.

—अशा प्रकारें असहकार सगळ्या जनतेनें करावा.

महात्मा गांधींचा हा आदेश जनतेच्या कानांत घुमूं लागला. आणि झंझावात सुटला. शाळा कॉलेजें ओस पडलीं. कोर्टांवर बहिष्कार पडला. वकिलांनीं आपापल्या सनदा फाडून टाकल्या. कायदे मंडळें नामशेष झालीं. लाला लजपतराय, देशबंधु दास, पंडित नेहरू पितापुत्र वगैरे महान नेते भराभर तुरुंगांत गेले. ठिकठिकाणीं हरताळ पडले.

महात्मा गांधीनीं आणखी एक महामंत्र दिला, त्याचें नांव चरखा. चरखा हा महामंत्र. चरखा हें सुदर्शन ! महात्मा गांधी सर्वांना सांगत, चरखा हें बेकारीवरील औषध आहे. चरखा चालवून आणि त्यावर सूत काढून लाखों कुटुंबांना आपला चरितार्थ चालवितां येईल. परदेशी कापड आपणाला घ्यावें लागणार नाहीं आणि मग आपल्या संपत्तीचा ओघ जो परदेशाकडे लागलेला आहे, तो थांबेल. आपला देश संपन्न होईल.

सरकार आणि जनता यांत अटीतटीचा सामना सुरू झाला.

सरकारनें दडपशाही सुरू केली. ता. १० मार्च १९२२ रोजीं महात्माजींना पकडलें आणि पुढें त्यांच्यावर खटला भरला. त्या खटल्यांत अहमदाबादचे न्यायमूर्ति ब्रूमफिल्ड महात्माजींस म्हणाले, तुमच्या तोलाचा आरोपी आजपर्यंत माझ्यापुढें आला नाहीं. पुढेंहि कधीं काळीं येण्याचा फारसा संभव नाहीं आणि त्यांनीं महात्माजींस सहा वर्षांची साध्या कैदेची शिक्षा दिली.

महात्मा गांधींस शिक्षा दिली, ही बातमी भारताच्या चारहि कोपऱ्यांत वायुवेगानें पसरली. पुढें काय, हा एकच प्रश्न प्रत्येकाला भेडसावूं लागला.

सरकारनें या वेळीं हिंदुमुसलमानांत तेढ उत्पन्न केली. भारतांत ठिकठिकाणीं हिंदुमुसलमानांचे दंगे सुरू झाले.

पण पुढें महात्मा गांधींची एकाएकीं ता. ५ फेब्रुवारी १९२४ रोजीं बिनशर्त मुक्तता झाली.

महात्मा गांधी तुरुंगाबाहेर आले. त्यांनीं हिंदुमुसलमानांचें ऐक्य, अस्पृश्यता निवारण, दारूबंदी, राष्ट्रीय शिक्षण हा विधायक कार्यक्रम जनतेपुढें ठेविला.

जनता कामाला लागली, त्यामुळें सरकारला भारतीय जनतेच्या शक्तीचा अंदाज आला. कांहीं तरी राजकीय हक्क भारतीय जनतेस दिल्याशिवाय आपला तरणोपाय नाहीं, असें सरकारला वाटूं लागलें आणि त्यावेळचे व्हाइसरॉय लॉर्ड आयर्विन यांनीं ता. ८ नोव्हेंबर १९२७ रोजीं सायमन कमिशनची नेमणूक झाल्याचें जाहीर केलें. या कमिशनचा सायमन नांवाचा गृहस्थ मुख्य होता म्हणून यास सायमन कमिशन म्हणतात. या सायमन कमिशनमध्यें सगळे इंग्रज. एकहि भारतीय गृहस्थ नाहीं. आम्हा भारतीयांस कोणते हक्क पाहिजेत, कोणते हक्क मिळाले असतां भारतीय जनतेची सर्वांगी प्रगति होईल; हें ठरविण्यासाठीं या कमिशनमध्यें एकहि भारतीय नको काय ?

सायमन कमिशनवर एकतरी भारतीय अवश्य पाहिजे, असें भारतीयांस वाटत होतें पण इंग्रजांस मात्र तसें वाटत नव्हतें. कारण त्यांना भारतीयांस स्वातंत्र्याचे हक्क केव्हांच द्यावयाचे नव्हते. सर जॉन चेस्नी नांवाच्या इंग्रज गृहस्थानें आपल्या पुस्तकांत अगदीं निश्चयानें लिहून ठेविलेलें आहे कीं, भारतानें आम्हाला लोणीभाकर दिली; आम्ही भारत आपल्या हातून जाऊं देणार नाहीं.

सर जॉन चेस्नीचें हें धोरण इंग्रज अगदीं कटाक्षानें पाळण्याचा प्रयत्न करीत होते. भारताला स्वातंत्र्याचे हक्क देण्याविषयीं ते जी भाषा बोलत, त्यासाठीं ज्या कमिट्या, जीं कमिशनें नेमीत तें केवळ नाटक होतें. भारतीयांस स्वातंत्र्याच्या आशेवर सरकार खेळवीत होतें. बिचारी भोळीभाबडी जनता सरकारवर विश्वास ठेवून वारंवार फसत होती.

पण आतां इंग्रजांच्या फसव्या वृत्तीची पुरी-पुरी जाणीव जनतेला झाली होती. नामदार गोखले, लो॰ टिळक इत्यादि भारतीय पुढाऱ्यांनीं ती जाणीव आपल्या बांधवांना करून दिली होती.

दुसऱ्या महायुद्धाला भारतीयांनीं तन मन धन खर्चून जी बहुमोल मदत केली, तिची जाणीव आम्हां इंग्रजांना आहे, हें दाखविण्यासाठीं, महात्मा गांधी व त्यांचे सहकारी यांनीं स्वातंत्र्यासाठीं भारताच्या कोनाकोपऱ्यांतून जी चळवळ सुरू केली आहे, ती थंड पाडण्यासाठीं हा सायमन कमिशनचा देखावा होता.

भारतीय जनतेनें हें ओळखिलें व तिनें या कमिशनवर बहिष्कार घातला. मुंबईस हें कमिशन आलें पण ह्याचें व्हावें तसें स्वागत झालें नाहीं. उलट त्यावर बहिष्कार घालण्यांत आला. काळीं निशाणें दाखविण्यांत आलीं. हरताळ पाळण्यांत आला. भारताच्या प्रवेशद्वारावरच अशा प्रकारें स्वागत झाल्यावर मग इतर भागांत कसें स्वागत झालें असेल याची कल्पनाच केलेली बरी.

आज ता. २८ फेब्रुवारी १९२८ रोजीं सायमन कमिशन लाहोर शहरांत आलें. लाहोर शहरांतील जनतेनें या कमिशनला आपली नापसंती दर्शविण्यासाठीं शहरांत हरताळ पाळला. काळीं निशाणें हातांत घेऊन मिरवणूक काढली. या मिरवणुकींत बालांपासून वृद्धांपर्यंत सर्व समाजाचे लोक सामील झाले. पंजाबचे सिंह लाला लजपतराय यांजकडे मिरवणुकीचें नेतृत्व होतें. हजारोंची, लाखोंची मिरवणूक शांतपणें चालली. लालाजींचें नेतृत्व तसेंच होतें. सारा पंजाब, सारें लाहोर लालाजींच्या शब्दांत.

केवढी मोठी मिरवणूक! रस्त्याच्या एका बाजूनें अगदीं शांत चालली आहे.

पण सरकारला शांतता नको होती. त्याला अराजक पाहिजे होतं व त्यासाठीं कांहीं तरी निमित्त पाहिजे होतें.

—आणि म्हणूनच त्या शांत चाललेल्या मिरवणुकीवर पोलीस तुटून पडले. ते लाठी हल्ला करूं लागले. जनतेचीं डोकीं फुटूं लागलीं.

अरेरे ! काय हें ! ! लालाजींवर लाठी हल्ला ! लालाजींवर ! पंजाबच्या सिंहावर.

होय. सरकारचा अधिकांत अधिक रोष पंजाबवर. पंजाबच्या या सिंहावर. कारण, पंजाबच्या या सिंहानें १८ फेब्रुवारी १९२८ च्या असेंब्लिच्या बैठकींत सायमन कमिशनवर बहिष्कार घालण्याचा ठराव आणून तो पास करून घेतला होता. म्हणूनच लालाजींवर सरकारचा रोष अधिक होता.

लालाजींवर लाठीमार झाला. त्यांना जबर दुखापत झाली.

पण तो पंजाब केसरी–पंजाबचा सिंह हटला नाहीं. डगमगला नाहीं. स्वराज्य–स्वातंत्र्य मिळवूं पहाणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याला डगमगून कसें चालेल; त्याला भय सोडावेंच लागतें. तुरुंगाचें भय, लाठीमाराचें भय आणि छातीवर गोळ्या झेलण्याचें भय म्हणजे काय, हें त्याच्या गांवींहि नसतें !

लालाजी धीरगंभीर पुरुष. त्यावेळीं भारतांत तीन पुरुष ' पोलादी ' समजले जात. लाल, पाल, बाल हे ते पुरुष. लाल पंजाबचे पुढारी लालाजी. पाल बंगालचे पुढारी बिपिनचंद्र पाल आणि बाल-महाराष्ट्राचे पुढारी बाळ गंगाधर टिळक.

लाठी हल्ला झाला तरी लालाजींनीं तेथल्या तेथें सभा घेतली. हजारों –लाखों बांधवांपुढें त्यांनीं भाषण केलें. तो महापुरुष म्हणाला—

> " बांधव हो, आपला झगडा शांततेनें चालवावयाचा; हें आपलें ध्येय आहे. पण सरकार जर अशाच तऱ्हेनें वागणार असेल तर आमचीं हीं तरुण माणसें आमच्या हातांतून सुटतील व देशाला स्वतंत्र करण्याच्या बाबतींत त्यांना भलेबुरे जे मार्ग स्वीकारावेसे वाटतील ते स्वीकारतील. त्यांनीं ते स्वीकारल्यास त्याबद्दल मला मुळींच आश्चर्य वाटणार नाहीं. तो दिवस पहावयास मी जिवंत असेन कीं नाहीं, हें मला सांगवत नाहीं. पण सरकारनें तो दिवस उगवावयास भाग पाडलेंच तर माझा आत्मा त्या झगड्यांत यश यावें म्हणून तुम्हाला आशीर्वाद देईल "

लालाजींनीं मोठ्या आवेशानें भाषण केलें. लाठीमारामुळें त्यांना अतिशय वेदना होत होत्या. तरी त्याकडे त्यांचें लक्ष नव्हतें. त्यांचें सारें लक्ष भारताच्या स्वातंत्र्याकडे लागलें होतें. ते भाषणाच्या शेवटीं–शेवटीं म्हणाले,

"माझ्या देशाची थोडीफार सेवा करावी, अशी माझी इच्छा आहे. मातृभूमीच्या सेवेशिवाय मला दुसरी महत्त्वाकांक्षा नाहीं."

आपली ही इच्छा बोलून लालाजी घरीं आले.

आतां तर त्यांना वेदना असह्य झाल्या.

मानसिक आणि शारीरिक वेदना त्या! मानी माणसाला त्या कशा सहन व्हाव्या!!

डॉक्टरांनीं औषधोपचार केले. पण—

पण कांहींच उपयोग झाला नाहीं!

थोड्याच दिवसांत अशुभ वेळ आली.

काळानें संधि साधली.

त्यानें लालाजींवर झडप घातली.

भारताचा थोर पुत्र आपल्या प्रियभारताच्या स्वातंत्र्यासाठीं झगडत असतां इंग्रजांच्या लाठीला बळी पडला!

• • •



# १३ • प्रकाशाचा नवा मार्ग

" आजपासून मी स्वतंत्र आहें; असें मानून वागावयास लागा. "—असें सांगणारा माणूस भारतांत अवतरला.

त्या माणसाच्या दृष्टींत जादु होती. प्रेम होतें. मृत्यूसहि कवटाळण्यास न भिणारी निष्ठा होती. अहिंसा, सत्य, प्रेम ह्या त्रयीचा तो एकनिष्ठ भक्त होता. त्यानें भारताला नवसंदेश दिला. स्वातंत्र्याचा मार्ग दाखविला. तो संदेश, तो मार्ग ऐकून—पाहून भारतीय जनतेचीं अंत:करणें नवचैतन्यानें थरारलीं. तिला आशा वाटू लागली आणि तिनें जयघोष केला—" महात्मा गांधी की जय "

भारतीय जनतेला स्वातंत्र्याचा मार्ग दाखविणारा, नवसंदेश देणारा हाच तो महापुरुष. हाच तो महात्मा.

भारताच्या स्वातंत्र्यासाठीं महात्मा गांधीनीं आपलें सारें आयुष्य क्रांतियुद्धांत घालविलें. इंग्रजाशीं लढण्यांत घालविलें. पण या युद्धांत त्यांनीं बंदुकांचा उपयोग केला नाहीं. तलवारींचा उपयोग केला नाहीं.

तोफांचा, बॉम्बगोळ्यांचा—कसल्या कसल्याच शस्त्राचा त्यांनीं उपयोग केला नाहीं. इतकेंच नव्हे तर कोणत्याहि प्रकारें हिंसा होणार नाहीं, याचीहि त्यांनीं दक्षता बाळगिली. महात्माजीनीं क्रांतियुद्ध केलें तें एका अत्यंत तेजस्वी शस्त्रानें ?

काय नांव त्या शस्त्राचें ?

सत्याग्रह !

गांधीजींच्या सत्याग्रह ह्या शस्त्रानें शत्रूचें हृदय जिंकावयाचें. शत्रूवर प्रेम करावयाचें. त्याचा हृदयपालट करावयाचा. सत्याची आराधना करावयाची. सत्यासाठीं आग्रह धरावयाचा. हेंच प्रभावी शस्त्र महात्माजीनीं क्रांति-साठीं वापरलें.

महात्माजीनीं या शस्त्राचा भारतांत प्रथम जर कुठें उपयोग केला असेल तर तो चंपारण्यांत. चंपारण्य हा बिहारप्रांतांतील नेपाळच्या लगतचा जिल्हा. या जिल्ह्यांत ऊस आणि नीळ पिकविण्याचे युरोपियनांच्या मालकीचे मळे असत. या मळेवाल्यांनीं हजारों शेतकऱ्यांच्या जमिनी तर गिळंकृत केल्याच होत्या, त्याशिवाय त्यांना मजूर बनवून त्यांचा अनन्वीत छळहि चालविला होता. नानाप्रकारच्या करांनीं आणि चाबकांच्या फटकाऱ्यांनीं सतत पन्नास वर्षें तें गांजले होते. त्यांच्या गाऱ्हाण्याकडे सरकार लक्ष देत नव्हतें. चंपारण्यांतील शेतकऱ्यांचा आणि मजुरांचा जिवंत नरकवास संपण्याची आशा वाटत नव्हती.

पण महात्मा गांधी त्यांच्या मदतीला धांवले. ते चंपारण्यांत गेले.

चंपारण्यांतील शेतकऱ्यांना आणि मजुरांना देव भेटला. त्यांना आशा वाटूं लागली. संकटांतून आपण बाहेर पडूं, असें त्यांना वाटूं लागलें. पुराणांत सांगितलेल्या ध्रुवानें राज्य मिळविण्यासाठीं तपश्चर्या केली ती चंपारण्यांत. लव-कुशांनीं रामचंद्राशीं सामना दिला तो चंपारण्यांत. गजेंद्रमोक्ष झाला तो चंपा-रण्यांतील रावी नदींतच. अशोकानें बहुतेक स्तूप उभारले चंपारण्यांत. गौतम-बुद्धाचें अंतीम चिररक्षा स्मारक आहे चंपारण्यांत आणि महात्मा गांधीनीं पहिला चिरस्मरणीय असा यशस्वी सत्याग्रह केला तो चंपारण्यांत !

महात्मा गांधीनीं सत्याग्रहाच्या शस्त्रबलावर शेतकरी, मजूर यांना जय मिळवून दिला. मळेवाल्यांची जुलमी सत्ता नाहींशी केली.

चंपारण्यांतील महात्मा गांधींच्या ह्या सत्याग्रहानें भारतांतील जनतेला ' सत्याग्रहाचें सामर्थ्य ' कळून आलें. 'जें न होई शस्त्रानें तें होई सत्याग्रहानें ' याची जनतेला पूर्ण जाणीव झाली आणि.

चुलीपाशीं आला । गांधीचा सत्याग्रह
इंग्रजाला शह । घरींदारीं ॥

महात्मा गांधींच्या या सत्याग्रहानें–या नव्या मंत्रानें जनतेंत जागृति झाली. प्रतिकार शक्तीची एकजूट झाली. जमावानें–संघटनेनें संकटांना तोंड दिलें पाहिजे, याची जाणीव झाली. स्वातंत्र्याची लालसा अधिक तीव्र झाली. याच महामंत्रानें महात्माजीनीं इंग्रजांच्या सत्तेला जबर धक्का दिला. इंग्रजांचें भारतांतील आसन खिळखिळें केलें आणि शेवटीं तें पार उखडूनहि टाकिलें.

महात्मा गांधींच्या चंपारण्यांतील सत्याग्रहापेक्षांहि ज्या सत्याग्रहान साऱ्या भारतांत फार मोठी जागृत्ति केली, स्वतःची जाणीव करून दिली, तो सत्याग्रह सन १९१९ चा.

इ. स. १९१८ च्या नोव्हेंबरांत दुसरें महायुद्ध संपलें. इंग्रजांचा जय झाला. भारतानें या युद्धाला तन मन धन दिलें होतें. पण इंग्रजांनीं भारताला याबद्दल काय दिलें ?

कांहींच दिलें नाहीं. मात्र एक जाहीर घोषणा केली. ' भारताला स्वराज्य देणें, हें आमचें ध्येय आहे ! '

या घोषणेनें भारतीय जनता आश्चर्यचकीत झाली. आम्ही सरकारला युद्धासाठीं मदत केली, त्याचें हेंच का फळ ! असें म्हणूं लागली.

पण भारतीय पुढाऱ्यांना आणि जनतेला आश्चर्याचा धक्का देणारें आणखी एक सरकारनें यावेळीं केलें, तें म्हणजे रौलट ॲक्ट ! सरकारनें रौलट नांवाच्या न्यायाधिशाच्या अध्यक्षतेखालीं एक समिति नेमिली. या समितीच्या शिफारशीनुसार रौलट नांवाचा कुप्रसिद्ध ॲक्ट—कायदा सन १९१९ च्या मार्च महांत पास केला. या कायद्यान्वयें कोणाचीहि झडती घेणें, त्यास बेमुदत तुरुंगांत डांबून ठेवणें, स्थानबद्ध करणें इत्यादि नागरिक स्वातंत्र्यास बाध आणणारे अधिकार पोलिसांस मिळाले. या कायद्यान्वयें भारतांतील जनतेचें जीवित धोक्यांत आलें.

जनता भडकली होतीच. रौलट ॲक्टानें त्यांत आणखी तेल ओतलें गेलें! महात्मा गांधींनीं आपलें शस्त्र उपसलें.

सत्याग्रह!

महात्मा गांधीनीं ता. ६ एप्रिल १९१९ हा दिवस 'सत्याग्रह दिन' पाळण्याचा आदेश दिला.

अन्यायाला वाचा फुटली!

मुंबई, लाहोर, अमृतसर, पुणें, मद्रास वगैरे शहरा-शहरांतून आणि खेड्यापाड्यांतून सभा होऊं लागल्या. सरकारच्या विश्वासघाताचीं आणि जुलमी सत्तेचीं वर्णनें सभासभांतून होऊं लागलीं. हिंदु-मुसलमानांच्या ऐक्याच्या शपथा होऊं लागल्या. ते भाई-भाई बनले.

भारतांत फार मोठें आंदोलन झालें!

सरकारनें अत्याचाराला सुरवात केली.

ठिकठिकाणीं गोळीबार केले.

सरकारनें फार मोठा अत्याचार केला तो अमृतसरला. आजपर्यंत अशा प्रकारचा अत्याचार कुठें झाला नाहीं आणि पुढें कधीं होईल असें वाटत नाहीं, असा हा अत्याचार.

अमृतसरला जालियनवाला बाग नांवाची एक मोठी वखळ होती. या जालियनवाला बागेच्या तीन बाजूंनीं उंच उंच इमारती होत्या. चौथ्या बाजूला काय ती १०० फूट लांब आणि ९ फूट उंच अशी भिंत होती. आणि याच बाजूनें बागेंत जाण्यास एक अगदीं अरुंद वाट होती.

या बागेंत १३ एप्रिल १९१९ रोजीं सुमारें पंचवीस हजार लोक सभेसाठीं जमले होते. पण जनरल डायर नांवाच्या अधिकाऱ्यानें आपण स्वत: आणि आपल्या सैनिक शिपायांसह लोकांना घोड्यांच्या टापाखालीं तुडविलें. गोळ्या घालून ठार केलें. हजारों लोकांचे बळी घेतले! जालियनवाला बाग रक्तानें लाल-लाल झाली!

महात्मा गांधींना अतिशय दु:ख झालें, ते म्हणाले, "आजपर्यंत आपण सरकारशीं सहकार्य केलें, त्याचें हें फळ का आमच्या पदरांत टाकलें. यापुढें आपणाला सरकारशीं असहकार केला पाहिजे."

'असहकार' हा मंत्र साधासुधा नव्हता. त्यांत अमोघ शक्ति होती. सरकारशीं कोणत्याहि प्रकारचा संबंध ठेवावयाचा नाहीं. सरकारी पदव्यांचा त्याग करावयाचा. कर द्यावयाचा नाहीं. पोलीस आणि लष्कर यांना सहकार्य द्यावयाचें नाहीं.

असहकाराचें मोठें आंदोलन झालें.

पण या आंदोलनापेक्षांहि फारच मोठें आंदोलन झालें तें या पुढील.

सन १९३० सालची गोष्ट. महात्माजींनीं मिठाचा कायदाच मोडण्याचें ठरविलें. मीठ हें गरिबांनाहि अल्प किंमतींत मिळालें पाहिजे, अशी महात्माजींची इच्छा, पण सरकारनें त्यावर जबर कर बसविला आणि तें महाग केलें. म्हणून महात्माजींनीं मिठाचा कायदा मोडण्याचें ठरविलें.

पण या महान कार्याला सुरवात करण्यापूर्वी म. गांधींनीं त्यावेळचे व्हाइसराय लॉर्ड आर्विन यांस पत्र लिहून आपला हा बेत कळविला आणि असेंहि जाहीर केलें कीं,

"जर या चळवळींत मला यश मिळालें नाहीं तर मी यापुढें साबरमतीच्या आश्रमांत परत पाऊल टाकणार नाहीं." [ महात्माजी साबरमतीला त्यावेळीं रहात होते. ]

मिठाच्या कायदेभंगासाठीं महात्माजींनीं गुजराथेंतील दांडी हें ठिकाण पसंत केलें आणि ता. १२ मार्च १९३० रोजीं सकाळीं साडेसहा वाजतां हा महान यात्रेकरू आपल्या दांडीसत्याग्रह यात्रेला निघाला.

खादीचें गुडघ्यापर्यंत धोतर लपेटलें आहे. अंगावर खादीचें वस्त्र आहे. कंबरेला घड्याळ आहे. भालप्रदेशीं कुंकुमतिलक शोभतो आहे. गळ्यांत सुताचे हार आहेत. केवळ आधाराकरितां एक उंच काठी हातांत आहे. पायांत वहाणा आहेत. असा हा सत्याग्रही साधुपुरुष लांब–लांब पावलें टाकीत आपल्या सत्याग्रही शिष्यांसह दांडीयात्रेस–मिठाचा कायदा मोडण्यास— निघाला आहे. ठिकठिकाणच्या मुक्कामांत मेळावा वाढत आहे. शेतकरी–लोक आपापल्या गांवच्या सीमेवर लतापल्लवांचीं तोरणें उभारीत आहेत. उत्साहानें स्वागत करीत आहेत. महात्माजींचा उपदेश ऐकत आहेत. गांवचे पोलीस-पाटील, वतनदार, हरिजनबांधव आपल्या वंशपरंपरा चालत आलेल्या गांवच्या हक्कदारीचा राजीनामा देऊन सरकारच्या जाळ्यांतून मोकळे होत आहेत.

आज ता. ६ एप्रिल १९३० रविवार! महात्माजी दांडी येथें समुद्राकडे हात जोडून आपल्या सत्याग्रही सेनेसह उभे राहिले.

प्रार्थना झाली आणि मग महात्माजी म्हणाले, माझ्या दृष्टीनें हा कायदेभंग म्हणजे एक पवित्र महायज्ञ आहे म्हणूनच याचें सर्व वातावरण अध्यात्मिक रहावें.

आतां तो पवित्र क्षण आला,

महात्माजींनीं समुद्रकिनाऱ्यावर पडलेलें मीठ उचललें. अवतीभवतीं असलेल्या मंडळीनें जयघोष केला, " महात्मा गांधी की जय "

—आणि मग त्या दिवसापासून भारतांत कायदेभंगाचा वणवा पेटला. ठिकठिकाणच्या मिठागरांतून मिठाचा कायदा मोडला जाऊं लागला. साऱ्याच भारतांतील वातावरण देशप्रेमानें भरून गेलें. तरुणांचा उत्साह उतूं लागला. आपली शक्ति, आपली भक्ति, देशासाठीं उपयोगी पडावी म्हणून जो तो प्रयत्न करूं लागला. अहमहमिकेनें कार्याला लागला.

पण महात्माजी ?

त्यांना ता. ४ मे १९३० रोजीं रात्रीं बरोबर बारा वाजून पंचेचाळीस मिनिटांनीं सरकारनें अटक केली!

फारच मोठें आंदोलन झालें. सगळीकडे सत्याग्रह, सगळीकडे कायदे-भंग! गांवागांवांतून, शहराशहरांतून खादीधारी स्वयंसेवक-सेविका हातांत तिरंगी ध्वज घेऊन ' लेंगे स्वराज्य लेंगे '

म्हणत मिरवणुका काढूं लागल्या. प्रभातफेऱ्या काढूं लागल्या.

सरकारनें भारतीय जनतेची ही चळवळ नाहींशी करण्याचा चंग बांधला. त्यानें अत्याचाराचा वरवंटा फिरविण्यास सुरवात केली. गोळीबार, लाठीहल्ले, चाबकाचे फटकारे हे तर केलेच पण मिरवणुकींतून घोडे नाचवून त्यांच्या टापाखालीं माणसांना तुडविलें!

इतकें करूनहि ही चळवळ दबेना.

मग मात्र सरकारची पुरेपूर खात्री पटली कीं, म. गांधींस तुरुंगांतून मुक्त केल्याशिवाय आणि कांहींतरी स्वराज्याचे हक्क दिल्याशिवाय आपणाला दुसरा मार्गच नाहीं.

—आणि म्हणूनच मग सरकारनें २५ जानेवारी १९३१ रोजीं

महात्माजींची तुरुंगांतून बीनशर्त मुक्तता केली आणि त्यांना स्वराज्याच्या हक्कांबद्दल वाटाघाटी करण्यासाठीं विलायतेस येण्याची विनंति केली.

महात्माजी विलायतेस गेले. त्यांनीं स्वातंत्र्यासाठीं वाटाघाटी केल्या पण त्या फुकट गेल्या.

महात्माजी भारतांत आले. त्यांनीं भारतभर दौरा काढला. ठिकठिकाणीं भाषणें केलीं. ते सांगूं लागले,

" अहिंसेवर माझी श्रद्धा आहे. तिच्या द्वारेंच भारताला स्वातंत्र्य मिळवावयाचें आहे. इतकेंच नव्हे तर साऱ्या जगाला शांततेचा संदेश द्यावयाचा आहे. माझ्या भारतीय बांधवांनो, खरा सत्याग्रही सेवाबलानें सर्वांना वश करून घेऊं शकतो. आपण जर दुसऱ्यावर प्रेम केलें, विश्वास ठेविला तर त्यांच्याकडून आपणाला दसपट विश्वास व हजार-पट प्रेम परत मिळेल म्हणून आपण प्रेमाच्या, अहिंसेच्या मार्गानें आपला सत्याग्रहाचा लढा चालविला पाहिजे. माझ्या भारतीय मित्रांनो, सत्य, अहिंसा, प्रेम या मार्गापासून केव्हांहि तीळभरसुद्धां ढळूं नका आणि आपल्या भारताच्या सेवेकरितां,–स्वातंत्र्याकरितां आपलें सर्वस्व अर्पण करण्यास तयार व्हा."

भारतांत पुन्हा विराट आंदोलन झालें !

भारतीय जनता स्वातंत्र्याकरितां सर्वस्व अर्पण करण्यास तयार आहे. ती आतां आपल्या दडपशाहीनें दडपली जाणार नाहीं. ह्याची जाणीव इंग्रज-सरकारलाहि झाली. त्यानें भारताला स्वातंत्र्याची एक पायरी देण्याचें कबूल केलें.

महात्माजींच्या प्रयत्नांना लहानसें फळ आलें आणि ता. १७ जुलै १९३७ पासून जनतेनें निवडून दिलेल्या मंत्रिमंडळाच्या हातीं राज्य-कारभार आला.

पण पुढें तो दोनच वर्षें टिकला. ता. ३ सप्टेंबर १९३९ रोजीं दुसरें महायुद्ध सुरू झालें. भारतानें ब्रिटिशांच्या बाजूनें सर्वप्रकारची मदत केली. पण सरकार ' भारतास स्वातंत्र्य देतों ' म्हणेना !

मग मात्र महात्माजींनीं भारतीय जनतेस महामंत्र दिला तो असा,

" आज पासून मी स्वतंत्र आहें, असें मानून वागावयास लागा."

पुन्हा जनसागर खवळला.

मोठें आंदोलन झालें.

> जिकडे तिकडे । जाहले गांवी गांवी
> तुरुंगी राजबंदी । लाखों जाती

मुंबईस ७ आगस्ट १९४२ रोजीं महात्माजीनीं दुसरी घोषणा केली.

' चले जाव '

इंग्रजांनीं भारत सोडून जावें.

सरकारनें महात्माजींस पकडलें.

फार मोठें आंदोलन झालें—' १९४२ ची चळवळ ' झाली. सरकार घाबरलें, नमलें आणि १५ आगस्ट १९४७ रोजीं मूळच्या भारतांतून स्वतंत्र असा नवा भारत निर्माण झाला.

भारत स्वतंत्र झाला !

भारताच्या स्वातंत्र्यासाठीं महात्मा गांधीनीं उपवास, तुरुंग····असे नाना कष्ट सहन केले. आणि सत्याग्रह, अहिंसा, सत्य याच्या जोरावर आपल्या भारताला गेलेलें स्वातंत्र्य परत मिळवून दिलें. धन्य महापुरुषा ! पण—

आतां पुढें ?

ता. ३० जानेवारी १९४८. दिल्लीच्या त्या मैदानावर महात्माजींची सायंप्रार्थना.

महात्माजी प्रार्थनेस आले. त्यांनीं जमलेल्या जनसमुदायास नमस्कार केला.

इतक्यांत महात्माजींपुढें एक माथेफिरू तरुण येऊन उभा राहिला. त्यानें महात्माजींस विचारिलें, " आज प्रार्थनेस थोडा उशीर झाला. "

" होय. झाला खरा. "

महात्माजी इतकें बोलत आहेत तोंच,

फाड फाड फाड पिस्तुलाच्या गोळ्या महात्माजींच्या अंगांत घुसल्या.

महात्माजीनीं हात जोडले. राम राम राम शब्द उच्चारले.

महात्माजी धाडकन् धरणीवर पडले.

भारताचा पिता गेला !

" वीरानो, उद्यां पहाटे तुम्ही आपल्या रक्त सिंचनानें स्वातंत्र्ययुद्धाची मुहूर्तमेढ रोवणार आहांत. त्या झाडांपलीकडे, त्या पर्वत शिखरांच्या आड तुमची पवित्र मातृभूमि आहे. त्या दिशेला आपल्या मातृभूमीकडे जरा नजर टाका. तिच्याच मृत्तिकेचे आपले पिंड बनलेले आहेत. आपल्या मातृभूमीची करुणावस्था परक्यांच्या छळणुकीनें तिनें फोडलेला टाहो तुम्हाला ऐकूं येत आहे ना ? ज्या भारतमातेनें आपल्याला इतके दिवस वात्सल्यानें पाळलें आणि पोसलें तिच्याकरितां—तिच्या मुक्ततेकरितां आपले प्राण पणाला लावणें आपलें कर्तव्य आहे. आपल्या मातृभूमीच्या मुक्ततेची वेळ दरक्षणीं जवळ येत आहे, हें आपलें महद्भाग्य आहे. आपल्या मातृभूमीचा व परमेश्वराचा आपणाला आशीर्वाद आहे."

नेताजी सुभाषचंद्र बोस यांनीं आपल्या फौजेला रंगून येथें ता. २६ जानेवारी १९४४ सालीं दिलेला हा संदेश आहे.

सुभाषचंद्र बोस यांची फौज होती ?

हो ! भारताच्या स्वातंत्र्यासाठीं त्यांनीं फौज तयार केली होती. पण भारतांत नव्हे. भारताच्या बाहेर जर्मनी, जपानमध्यें !

भारतांत असतांनाच १९३९ च्या त्रिपुरा येथील राष्ट्रीय सभेच्या अध्यक्ष पदावरून ते म्हणाले होते—

"आपण सर्व सामर्थ्य एकवटून जर ब्रिटीश सत्तेवर हल्ला चढविला तर त्याचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य कोणातहि नाहीं."

महात्मा गांधींसहि सुभाषबाबू एकदां म्हणाले होते, " महात्माजी, मी माझें सर्वतोपरी सहाय्य तुम्हाला द्यावयाला तयार आहें. आपण ब्रिटिशांविरुद्ध लढा देऊंया."

पण महात्माजींना आणि इतर पुढाऱ्यांना तें पसंत पडलें नव्हतें आणि

सुभाषबाबूंची ही स्वातंत्र्यप्राप्तीच्या मार्गाची योजना तशीच राहून गेली होती. पण आतां मात्र योग्य संधि आली. इंग्रज दुसऱ्या महायुद्धाच्या वणव्यांत सांपडले.

दुसऱ्या महायुद्धाचें रणशिंग ता. ३ सप्टेंबर १९३९ रोजीं फुंकलें गेलें.

ब्रिटीश आणि जर्मनी यांचें तें युद्ध होतें.

भारतांत त्यावेळीं लॉर्ड लिनलिथगो व्हाइसरॉय होते. त्यांनीं एक जाहीरनामा काढून टाकला कीं, भारतहि या युद्धांत सामील आहे. तो ब्रिटिशांना तन–मन–धन देऊन सहाय्य करील.

पण राष्ट्रीय सभेनें त्यांच्या या जाहीरनाम्यास विरोध केला. राष्ट्रीय सभेचें म्हणणें असें कीं, भारतानें युद्धांत भाग घ्यावयाचा कीं नाहीं, हा अधिकार राष्ट्रीय सभेचा आहे. व्हाइसरायांचा नाहीं. कारण सन १९३७ च्या नव्या राज्यघटनेनुसार प्रांताचा राज्यकारभार जनतेनें निवडून दिलेल्या मंत्रिमंडळाकडे आला होता व मंत्रिमंडळाच्या कारभारांत गव्हर्नरनें ढवळाढवळ करावयाची नाहीं, असें ठरलेलें होतें. पण सरकारनें हा करार मोडला ! प्रांतांच्या मंत्रिमंडळांचा सल्ला न घेतांच ‘ भारत महायुद्धांत सामील आहे ’ असें ठरवून टाकलें.

त्यामुळेंच सगळ्या प्रांतांतील राष्ट्रीय मंत्रिमंडळांनीं मंत्रिपदांचे राजीनामे दिले !

सरकारनें थोडें नमतें घेतलें. तें ‘ समजुतीची भाषा ’ बोलूं लागलें. युद्धास मदत करण्याविषयीं विनंति करूं लागलें.

पण भारतीय पुढारी सभांसभांतून भाषणें करून जनतेला सरकारच्या भूलथापांस फसूं नका, असें सांगूं लागले.

सुभाषबाबूंनाहि एका भाषणाबद्दल अटक केली आणि तुरुंगांत टाकलें.

शेवटीं सुभाषबाबूंनीं अन्नत्याग सुरू केला. सतत सात दिवसांच्या उपवासानंतर सरकारनें त्यांस सोडलें. पण एका अटीवर त्यांनीं आपलें घर सोडून कुठें जावयाचें नाहीं.

तुरुंगांतून सुभाषबाबू घरीं आले. ते आपल्या घराच्या दुसऱ्या मजल्यावरील एका खोलींत राहूं लागले. आपण बोलाविल्याशिवाय आपणास भेटण्यास कोणीहि येऊं नये, असें त्यांनीं सांगून ठेविलें होतें. सरकारचा पहारा त्यांच्या घरासभोंवती होता. असे पावणे दोन महिने गेले.

—आणि एक दिवस सुभाषबाबू कुठें नाहींसे झाले !

२६ जानेवारी १९४१ चा तो दिवस.

भारताचा स्वातंत्र्य दिन !

भारताच्या स्वातंत्र्य प्राप्तीसाठींच सुभाषबाबू कुठें तरी गेले असावेत.

कुठें गेले असतील ?

जनता आणि सरकार दोघांचेंहि धाबें दणाणलें.

जनता घाबरली ती आपला लाडका पुढारी कुठें नाहींसा झाला म्हणून आणि सरकार घाबरलें तें आपल्या भारतांतील सत्तेला सुरुंग लागणार म्हणून. सरकारनें नाना कल्पना, नाना युक्त्या केल्या पण सुभाषबाबू कुठें गेले ते गेले.

सरकारला ते सांपडणार कसे ! त्यांनी अगदीं बेमालूम वेष धारण केला. घरांतून बाहेर पडले तेच मुळीं पठाणाच्या वेषांत. त्यांनीं त्यावेळीं चुनीदार पायजामा घातला. शेरवानी पेहरली. डोक्यावर फेज घातली. आणि झिया-उद्दीन मौलवी म्हणून ते बाहेर पडले ! आणि आगगाडींतून ते पेशावरला गेले ! ! तेथें त्यांचा मित्र भगतराम त्यांना भेटला. आणि मग भगतराम रहिमतखान पठाण व सुभाषबाबू–झियाउद्दीन पठाण बनले. मात्र झिया-उद्दीन बहिरा–मुका.

हे दोघेहि पठाण काबूलला चालले, ना अन्न, ना धड पाणी. बर्फ पडत आहे. थंडी तर मी म्हणत आहे. अशा स्थितींत केव्हां मालवाहू मोटारींतून तर केव्हां पायींच मजल दरमजल करीत हे दोघे पठाण काबूलला चालले !

एकाच इच्छेसाठीं हे कष्ट, हें दुःख त्यांना जाणवत नव्हतें.

कोणती ती इच्छा ?

माझा भारत स्वतंत्र झाला पाहिजे ! होय, ती इच्छा ! त्या इच्छेच्याच जोरावर ते दोघे काबूलला जाऊन पोचले.

सरकारचे हेर त्यांच्या पाठीवर होतेच. एकदां तर असें झालें कीं, झियाउद्दीन आणि रहिमतखान दोघेहि बूट घेण्यासाठीं एका दुकानांत गेले. तो दुकानदार हिंदी गृहस्थ होता. त्यानें दोघांच्या बोलण्यावरून हे दोघे गृहस्थ हिंदी असावेत असें जाणलें आणि त्यानें विचारलें—

काय हो, आपण हिंदी का ?

छे ! माझें नांव झियाउद्दीन. मी येथील हबीबिया कॉलेजांत प्रोफेसर आहें.

अं ! हबीबिया कॉलेजांत प्रोफेसर ? या कॉलेजांतील साऱ्या प्रोफेसरांना मी ओळखतों. तुमची माझी एकदांहि भेट झाली नाहीं !

मी येथें नुकताच आलों आहें. तुम्ही एखादे दिवशीं कॉलेजांत या आपण बराच वेळ बोलत बसूं.

बरं–बरं येईन हो कॉलेजांत आणि प्रो० झियाउद्दीन कुठें म्हणून विचारीन, कुणीहि सांगेल. होय ना ?

हो–हो. अवश्य या हं ! आपण खूप वेळ बोलत बसूं !

—असें बोलून ते तेथून निघून गेले !

आणि थोड्याच दिवसांत नाना दुःखें, नाना यातना सहन करून सुभाषबाबू बर्लिनला गेले. तेथें त्यांनीं हिटलरची भेट घेतली. त्यांना विचारलें; 'आमचा भारत स्वतंत्र करण्यासाठीं आपण आम्हाला काय मदत करणार ?'

'आपण मागाल ती मदत! इंग्रजांच्या बाजूनें आमच्याशीं लढणारे आम्ही पांच हजार हिंदी सैनिक कैद केले आहेत. तेच आम्ही तुमच्या स्वाधीन करतों. सुभाषबाबू जर्मनींत एक वर्ष राहिले. आझाद हिंद फौज उभारली. त्यांनीं इंग्रजी सत्ता खिळखिळी करण्याचें ठरविलें. पण

इंग्रजांवर काळ आला होता पण वेळ आली नव्हती. म्हणूनच जर्मनीची या युद्धांत पिछेहाट होऊं लागली; त्यामुळें सुभाषबाबूंनीं जर्मन सोडला आणि ते जपानांत आले.

तो दिवस २ जुलै १९४३ हा होता. सिंगापुरांत साऱ्यांच्या तोंडीं 'सुभाषबाबू' नांव नाचूं लागलें. जपानी बांधवांनीं तर त्यांना 'चंद्रबोस' असें आपलें लाडकें नांव ठेविलें. हिंदी सैन्याचे ते नेताजीच होते. ज्याच्या त्याच्या तोंडी 'नेताजी' ! नेताजी म्हणजेच सुभाषचंद्र बोस.

नेताजी जपानांत आले त्यावेळीं मलाया, सिंगापूर या भागांत युद्धास तोंड लागलें होतें. भारतांतहि राष्ट्रीय सभेनें ७ आगस्ट १९४२ रोजीं 'चले जाव' चा ठराव पास केला. महात्माजींनीं भारतीय जनतेस संदेश दिला होता.

"आजपासून आपण स्वतंत्र आहोंत असें समजून वागावयास लागा" महात्मा गांधी आणि इतर पुढारी तुरुंगांत डांबले गेले. सरकार विरुद्ध फार

मोठें आंदोलन झालें. मुंबईला दंगल माजली. कलकत्ता, नागपूर, पुणें, मद्रास वगैरे शहराशहरांतून तर आंदोलन झालेंच पण खेड्यांपाड्यांतून आंदोलनाची लाट उसळली. साऱ्या भारतांत आंदोलनाचा झंझावात सुरू झाला. पोस्ट ऑफिसें जाळण्यापर्यंत, रेल्वेतारा तोडण्यापर्यंत, सरकारी चौक्या मोडण्यापर्यंत, पूल उडवून टाकण्यापर्यंत जनतेची मजल गेली होती. जनता कायदाच हातांत घेण्याचा प्रयत्न करीत होती म्हटलें तरी चालेल.

सरकार भारताबाहेर युद्धामुळें टेकीस आलें होतें आणि भारतांत स्वातंत्र्याच्या आंदोलनामुळें टेकीस आलें होतें. इकडे आड तिकडे विहीर अशी सरकारची स्थिति झाली होती.

ती वेळ म्हणजे भारताच्या स्वातंत्र्यासाठीं चालून आलेली सुवर्ण-संधिच होती.

सुभाषबाबूंनीं भारताबाहेरून भारतांतील इंग्रजी सत्तेला शह देण्याचा प्रयत्न चालविला होता. त्यांनीं जपानमध्यें हिंदी फौज तयार केली. सिंगापूर, जपान, जावा येथें असलेलें ब्रिटीश सरकारचें चाळीस हजार हिंदी सैन्य सुभाष-बाबूंच्या या फौजेंत सामील झालें. त्यानीं आपल्या या शूर सैनिकांपुढें भाषण केलें तें प्रत्येक भारतीयानें आपल्या हृदयावर कोरून ठेवण्यारखें आहे, ते म्हणाले होते—

> “ भारत स्वतंत्र करण्यासाठीं भारताचें शूर सैन्य निर्माण झालें आहे; हें जगाला जाहीर करण्यास मला अभिमान वाटतो. आजपर्यंत भारत स्वतंत्र करण्यासाठीं ज्यांनीं प्रयत्न केले, ज्यांनीं आपलें रक्त सांडलें, ज्यांनीं आपली मान फासांत अडकविली, त्या वीरांचें त्या हुतात्म्याचें, आपण यावेळीं स्मरण करूंया. शौर्यानें, चिकाटीनें आणि अंतीम यशाची खात्री बाळगून इंग्रज व त्यांचे मदतनीस यांच्या विरुद्ध लढा देऊंया आणि त्यांना भारताबाहेर घालवून आपल्या प्रिय भारतास स्वातंत्र्य मिळवून देऊंया. ”

जयहिंद !

आणि—सन १९४३ च्या ऑक्टोबरच्या २१ तारखे दिवशी हिंद स्वातंत्र्यसरकार स्थापन झालें !

मराठा ग्रंथ
अनुक्रम .. वि: ........
नों दि: ........
क्रमांक ........

या दिवशीं सुभाषबाबू आणि त्यांच्या अझाद हिंद फौजेला जो आनंद झाला त्याचें वर्णन कोण करूं शकेल! या हिंद स्वातंत्र्य सरकारच्या स्थापने-बद्दल अभिनंदनपर संदेश—जर्मनमधून हिटलरचा आला. आयर्लंडमधून डी व्हॅलेरा यांचा आला. त्यांनीं आपल्या संदेशांत म्हटलें होतें ' तुम्ही हिंदी सरकार स्थापिलें, हें ऐकून मला अत्यानंद झाला. या कामगिरीबद्दल मी तुमचें अभिनंदन करतों. आणि तुम्हाला व तुमच्या सहकाऱ्यांस कार्यांत सुयश येवो, असें इच्छितों.

नऊ राष्ट्रांकडून हिंद स्वातंत्र्य सरकारला आलेले अभिनंदनपर संदेश म्हणजे भारत स्वतंत्र व्हावा ही त्यांची इच्छाच!

ता. २३ आक्टोबरला मध्यरात्रीं जाहीर करण्यांत आलें कीं,

" भारत स्वतंत्र्य करण्यासाठीं हिंदी स्वातंत्र्य सरकार या क्षणापासून ग्रेटब्रिटन व अमेरिका यांच्या विरुद्ध युद्धाची घोषणा करीत आहे."

## चलो दिल्ली!

अझादहिंद फौज चालली! दिल्लीच्या देशेनें चालली! भारत स्वतंत्र करण्यासाठीं चालली. फौजेंतील प्रत्येक सैनिक आपल्या मनांत निश्चय करून चालला. कवि विनायकानें म्हटल्याप्रमाणें जणुं काय त्यांनीं निश्चय केला होता.

अविंध सैन्यभार मी रणीं करीन ठार
जिवावरी उदार! प्रसन्न खड्गधार
विजयहार मग कसा मला न लाधणार
न हें पडेल पार! तरी जिणें असार
वाहूं राहूं कशास भूमिभार

—[ विनायक ]

सैनिक आझादहिंद करायला चालले. ता. १८ आगस्ट १९४४ रोजीं त्यांनीं आपल्या स्वतंत्रभारतांत पाय ठेविला.

हजारों सैनिकांनीं एकच गर्जना केली. जयहिंद!!

सुभाषबाबूंनीं–नेताजी सुभाषचंद्र बोसनीं भारताचा, स्वतंत्र–भारताचा ध्वज भारताच्या भूमीवर फडकविला.

**पण तो कचित काळ!**

इंग्रजांना भारत सोडून जाण्याची वेळ आली नव्हती ? का तिला थोडा अवकाश होता कीं काय कोण जाणे ! पण प्राण पणास लावून भारत स्वतंत्र करूं पहाणाऱ्या शूर सुभाषबाबूंना आणि त्यांच्या सहकारी सैन्याला माघार घ्यावी लागली !

आझाद हिंद फौजेनें मागें-मागें भारताबाहेर पाय घेतला. माघार घेतली पण भारतांतील ब्रिटीश सत्तेवर असा घाव घातला कीं, तो अगदीं वर्मी बसला व ब्रिटीशसत्ता अगदीं जायबंदी झाली !

देशभक्त सुभाषबाबूंनीं भारताच्या स्वातंत्र्यासाठीं आपल्या सुखावर लाथ मारली. हालअपेष्टा सहन केल्या. ब्रिटीशसत्तला जोरदार धक्के दिले आणि ती खिळखिळी केली. आज भारताचा तिरंगी ध्वज जो अस्मानांत डौलानें डुलत आहे; 'वंदेमातरम्' हें राष्ट्रगीत आपण जें अभिमानानें गात आहोंत; आम्ही स्वतंत्र आहोंत, आमचा भारत स्वतंत्र आहे, असें जें आपण म्हणतों; त्यांचें श्रेय सुभाषबाबूंना आहे.

सुभाषबाबूंनीं आपल्या 'अझादहिंद फौजेसह' दिल्ली गांठण्याचा प्रयत्न केला, त्याला थोडें फार यशहि आलें.

पण शेवटीं त्यांना 'माघार घ्यावी लागली !'

अझादहिंद फौजेचें विसर्जन करावें लागलें ! आणि स्वत: सुभाषबाबू ?

विश्वाच्या कोणत्याहि ठिकाणीं, कोणत्याहि रूपांत ते असतील !

कांहीं दुर्दैवी घटना घडली असली, त्यांना विमान अपघात झाला असला तर ?

तर ते स्वर्गातून स्वतंत्र भारताकडे अभिमानानें पहात असतील. मी स्वातंत्र्यासाठीं सांडलेल्या रक्ताच्या थेंबाचें योग्य चीज झालें, असें म्हणत असतील आणि आमच्याकडे पाहून म्हणत असतील,

भारत स्वतंत्र झाला ! आतां त्याचें स्वातंत्र्य टिकविणें, त्याला वैभवसंपन्न करणें काम तुमचें. होय ना ? होय.

भारताला वैभवसंपन्न करावयाचा आहे. त्यासाठीं आमचे पुढारी—नेते पं. जवाहरलाल आम्हांला आदेश देतील तसे आम्ही प्रयत्न करूं. काया, वाचा, मनें झटूं.

• • •



## १५ • स्वातंत्र्यसूर्य उगवला !

" माझें भाग्य किती थोर त्याचेंच मला नवल वाटतें. स्वातंत्र्य संग्रामांत मातृभूमीची सेवा करावयास मिळते, हा केवढा मान ! आणि महात्मा गांधीसारख्या नेत्याच्या हाताखालीं ती सेवा करणें ही असामान्य भाग्याचीच गोष्ट होय. यापेक्षां अधिक थोर भाग्य भारतीयांच्या वाट्यास दुसरें कोणतें येऊं शकेल ! आपलें दिव्य स्वप्न साकार झाल्याचें पहाणें, हेंच तें महद् भाग्य होय."

आपलें स्वप्न साकार झाल्याचें पहाण्याचें भाग्य ह्या थोर भारतपुत्राला लाभलें. इतकेंच नव्हे तर स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधानपद यानाच लाभलें. स्वतंत्र भारताची सेवा करण्याची संधि मिळाली. पण हें सारें मिळण्यापूर्वीं, भारत स्वतंत्र होण्यासाठीं यांना अमोल सेवा करावी लागली. त्याग करावा लागला. कष्ट करावे लागले. भारताचा हा लाडका पुत्र सतत चाळीस वर्षे काया, वाचा, मनें करून झटत होता आणि आजहि तो देशाच्या प्रगतीसाठीं झटत आहे.

अशा या भारत पुत्राला—पंडित जवाहरलाल नेहरूंना भारताच्या सेवेला लागणारा उत्साह, आत्मविश्वास, देणारी व्यक्ति महात्मा गांधी.

महात्मा गांधींनीं सत्याग्रहाचें शस्त्र भारतीय जनतेच्या हातीं दिलें. लो. टिळकांनीं या पूर्वीच "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे व तो मी मिळविनच." ही घोषणा केली होती. लोकमान्यांनीं सांगितलेलें हें 'साध्य' त्यांच्या मागें महात्माजींना आपल्या सत्याग्रहरूपी साधनानें साधावयाचें होतें.

भारतीय जनताहि या वेळीं अधीर झाली होती. सन १९१८ सालीं मॉंटेग्यु चेम्सफर्ड यांनीं स्वराज्याचे हक्क देण्याविषयीं ज्या सुधारणा सुचविल्या त्या जनतेस बिलकूल पसंत नव्हत्या. जनता महात्मा गांधी या पुढाऱ्याच्या मार्गदर्शनाची वाट पहात होती. याच वेळीं म्हणजे सन १९२१ सालीं अलाहाबाद येथें राष्ट्रीय सभेचें अधिवेशन भरलें. या अधिवेशनांत महात्मा गांधीनीं जनतेला संदेश दिला तो असा कीं, तीन महिन्यांत राष्ट्रीय सभेचे एक कोट सभासद करा. लो. टिळक स्वराज्यफंडास एक कोट रुपये जमवा आणि वीस लाख चरखे चालवा.

या संदेशाचा पाठपुरावा जनता करूं लागली. राष्ट्रीयसभेच्या सभासदांची भराभर संख्या वाढली. चरखे फिरूं लागले. टिळक स्वराज्यफंडाला साऱ्यांनीं हातभार लावला. कलकत्ता येथील बैलगाडीवाल्यांनीहि सहा हजार रुपये जमवून दिले.

—अशा या स्वराज्य प्राप्तीच्या चळवळींत पं. जवाहरलाल नेहरूंना गप्प कसें बसवेल ! मी माझ्या भारताच्या हांकेला 'ओ' देणार. मी माझ्या देशाच्या उद्धारासाठीं धांवणार, असें वाटलें तर त्यांत नवल कसलें ! मी माझ्या देशाच्या उद्धारासाठीं प्रयत्न करणार; ही इच्छा त्यांनीं आपल्या पित्याला, पंडित मोतिलालजींना कळविली.

पण मोतिलालजींना असहकाराच्या चळवळींत आपल्या मुलानें पडावें, त्यांत भाग घ्यावा, असें वाटलें नाहीं. त्यांनीं पं. जवाहरलालजींच्या या इच्छेला नकार दिला.

मोतिलालजीनीं दिलेला हा नकार 'वडिलांची आज्ञा' म्हणून शीरसावंद्य मानावयाची कीं, मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठीं सत्याग्रहांत–असहकार चळवळींत भाग घेऊन आपलें देशकर्तव्य करावयाचें ?

कोणता मार्ग स्वीकारावयाचा ? पं. जवाहरलालजी पुढें हा यक्षप्रश्न उभा राहिला पण महात्मा गांधीनीं त्यांची योग्य समजूत घातली आणि हा यक्ष प्रश्न सोडविला. त्यांनीं पंडितजींना सांगितलें, वडिलांची इच्छा आणि देश यापर्कीं वडिलांच्या इच्छेला अधिक मान. ह्या सत्याग्रहांत भाग घेण्याची घाई करूं नका.

पं. नेहरूनीं आपल्या तीव्र इच्छेला मुरड घातली. सत्याग्रहांत सामील होण्याचा बेत त्यांना सोडून द्यावा लागला. पित्याची इच्छा आणि नेत्याचा सल्ला याला त्यांनीं मान दिला.

पण सन १९२१ साल हें असें होतें कीं, निर्जीवहि सजीव होऊन त्यानें सत्याग्रहांत भाग घ्यावा. सशाच्या वृत्तीच्या माणसाला सिंहाची वृत्ति प्राप्त व्हावी, असें असतां पंडित नेहरूंना गप्प कसें बसवेल ? प्रत्येक भारतीयाची स्वातंत्र्यासाठीं इच्छा बळावली होती. श्रीमंत–गरीब, हिंदु–मुसलमान, हा ध्येयाच्या बाबतींत भेदाभेद राहिला नव्हता. ‘ क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे ’ याची पूरेपूर खात्री प्रत्येकाला झाली होती. शेतकरी, मजूर आपल्या हक्कासाठीं जागृत झाले होते. ‘ खेड्याकडे चला ’ अशी घोषणा सगळीकडे दुमदुमत होती. कारण शेतकऱ्यांवर सरकार, सावकार आणि जमीनदार कोणत्या ना कोणत्या प्रकारें जुलूम करीत होते. उत्तर प्रदेशांतील अलाहाबादच्या आजूबाजूच्या तालुक्यांतील जमीनदारांनीं शेतकऱ्यांवर जुलमाचा कहर चालविला होता. रक्ताचें पाणी करून उत्पन्न केलेली शेतांतील संपत्ति जमीनदारांच्या घरांत ओतावी लागत होती. त्यांना नानाप्रकारचे करहि द्यावे लागत होते.

शेतकऱ्यांचें हें दुःख नाहींसें करण्यासाठीं पंडितजी धांवले. ते अनेक खेड्यांत गेले. त्यांनीं शेतकऱ्यांना धीर दिला. त्यांच्यांत आत्मविश्वास निर्माण केला. त्यांना अभय बनविलें. धीट बनविलें. संघटीत केलें. शेतकरी जागा केला. सशाला सिंह बनविला.

आणि त्याचा परिणाम काय झाला—

शेतकऱ्यांनीं आपणावर होणाऱ्या अन्यायाबद्दल सरकारकडे तक्रार केली.

पण सरकार कोणाचें ! जमीनदारांच्या बाजूचें. त्यानें बिचाऱ्या शेतकऱ्यांनाच पकडलें. पण शेतकरी डगमगले का ? घाबरले का ? मुळींच नाहींत. त्यांना सुखकर्ता भेटला होता. देव भेटला होता. त्यांचा देव त्यांच्या

संरक्षणासाठीं धांवला. पं. जवाहरलालजी शेतकऱ्यांच्या मदतीस धांवले. त्यांनीं शेतकऱ्यांस योग्य न्याय मिळवून दिला.

याच सालीं इंग्लंडचे युवराज ( सन १९२१ नोव्हेंबर ) भारतांत आले. त्यांच्या या आगमना निमित्त करावयाच्या स्वागतावर बहिष्कार घालण्यांत आला. गांवोगांवीं हरताळ पडले. परदेशी कापडाच्या होळ्या होऊं लागल्या.

सरकारला वाटत होतें, अलाहाबाद, रायबरेली वगैरे भागांत युवराजांच्या स्वागतावर बहिष्कार घालण्याची जळवळच झाली त्याचे उत्पादक–प्रचारक –प्रमुख पंडित जवाहरलाल आहेत. शेतकऱ्यांस जागे केलें, शेतकऱ्यांची चळवळ केली ती पंडितजीनीं आणि म्हणूनच पंडित नेहरूंवर सरकारनें कांहीं निमित्त पुढें करून खटला भरला. या खटल्यांत पंडितजींना सहा महिन्यांची शिक्षा आणि पांचशें रुपये दंड झाला.

वडिलांची इच्छा आणि महात्माजींचा सल्ला यांचें उल्लंघन न करतांहि पंडितजींनीं देशकार्याला जो आरंभ केला त्याबद्दल त्यांना शिक्षा झाली. पण ही शिक्षा तीनच महिने भोगावी लागली. कारण कायद्याप्रमाणें पंडितजींवर गुन्हाच ठरत नव्हता. सरकारला आपली ही अक्षम्य चूक जेव्हां आढळून आली तेव्हां पंडितजींची शिक्षा रद्द करण्यांत आली. ही पहिली शिक्षा जरी अशी रद्द झाली तरी पुढें पंडितजींच्या वाट्यास आणखी कितीतरी शिक्षा आल्या आणि त्यांनीं त्या शिक्षांचें आनंदानें स्वागत केलें. आपलें सारें आयुष्य भारताच्या स्वातंत्र्यासाठीं—सेवेसाठीं खर्च करावयाचें असें त्यांनीं ज्यावेळीं ठरविलें तेव्हांच त्यांना माहीत होतें कीं, स्वातंत्र्याच्या ध्येयाचा मार्ग काट्या-कुट्यांचा असतो.

जवाहरलालजीनीं भारताची तन-मन-धन खर्चून जी सेवा केली, त्या सेवेनें भारतीय जनता इतकी खूष झाली कीं, तिनें जवाहरलालजींस सन १९२९ सालीं लाहोर येथील राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षपदावर बसविलें.

राष्ट्रीय सभेचें हें लाहोरचें अधिवेशन म्हणजे सर्वच बाजूंनीं संस्मरणीय झालें. रावी नदीच्या उजव्या काठावरील एका विस्तीर्ण मैदानावर हें भरलें होतें. राष्ट्रसभेच्या मंडपास ‘ लजपतराय नगर.’ असें नांव दिलें होतें. लालाजींचा अर्ध पुतळा—उभारला होता. राष्ट्रीय सभेचें निशाण डौलानें डुलत होतें. ता. २९ डिसेंबर १९२९ या शुभदिनीं सायंकाळीं ५ वाजतां अधिवेशनास सुरवात झाली.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
 अनुक्रम ............ दि: ..................
क्रमांक ............ नों. दि. 

पंडित जवाहरलालजीचें ओजस्वी आणि तेजस्वी भाषण झालें.........

संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव मंजूर झाला. आणि तो-तो ३१ डिसेंबरचा दिवस. त्या दिवशीं रात्रीं १२ वाजतां रावी नदीच्या कांठच्या त्या पवित्र ठिकाणीं ११५ फूट उंचीच्या स्तंभावर स्वातंत्र्याचा तिरंगीध्वज पंडितजीनीं फडकविला आणि त्यांनीं भारतीय जनतेस दिव्य देणगी दिली.

"२६ जानेवारी हा आपल्या भारताचा स्वातंत्र्यदिन." आपला हा स्वातंत्र्यदिन आपण दरवर्षी मोठ्या थाटामाटांत पाळूं या.

भारतांत उत्साहाची ज्योत अधिक प्रज्वलीत झाली. उत्साहाचा प्रकाश वाढला. जनता उत्साहानें प्रेरित झाली. ती दर वर्षी २६ जानेवारीला भारताचा स्वातंत्र्यदिन साजरा करूं लागली.

पण खरा स्वातंत्र्यदिन अजून यावयाचा आहे. कधीं येणार तो? चातकरूपी भारतीय जनतेच्या मुखांत स्वातंत्र्यरूपी जल कधीं पडणार!

लवकरच!

त्यासाठीं पंडित नेहरू म. गांधी, सुभाषचंद्र बोस, आदि आमचे प्रिय पुढारी प्रयत्न करीत आहेत. आम्ही त्यांच्या मागें आहोंत. प्राणांचें बलिदानहि करण्यास आम्ही तयार आहोंत.

भारताच्या स्वातंत्र्यासाठीं प्रयत्न चालले आहेत. यशोमंदिराची एक एक पायरी आम्ही चढत आहोंत. आम्हाला या यशोमंदिराच्या साऱ्या पायऱ्या चढून स्वातंत्र्य देवतेचें दर्शन घ्यावयाचें आहे; त्यासाठीं कित्येक वर्षें आमचे प्रयत्न चालले आहेत. आमचें ध्येय आम्ही गांठणार आहोंत.

आज ८ आगस्ट १९४२ चा दिवस भारताच्या धैर्याच्या कळसाचा दिवस. या दिवशीं भारताच्या प्रवेशद्वारावर, ज्या द्वारानें इंग्रज भारतांत आले त्याच द्वारावर—मुंबईस अखिल भारतीय कांग्रेस समितीची बैठक भरली आणि तिनें एकमुखानें मागणी केली, एकमुखानें इंग्रजसत्तेला ठरावाच्या रूपानें हुकूम केला—

"चले जाव"

पण जवळ जवळ चारशें वर्षें आपले हातपाय पसरून बसलेली इंग्रजांची सत्ता आणखीहि कांहीं काळ भारतांत आपणास वस्ती करून सत्ता गाजवितां येईल या भरंवशावर होती. तिनें आपल्या सत्तेच्या जोरावर पं. नेहरू, म. गांधी, वल्लभभाई पटेल आदि पुढाऱ्यांस तुरुंगांत डांबलें.

फार मोठी चळवळ झाली. आरमारी बंड झालें. या चळवळीनें इंग्रज-सरकारास सळो कीं पळो करून सोडलें. धरलें तर चावतें. सोडलें तर पळतें, अशी त्याची स्थिति झाली. भारतीय जनता या पुढें एक क्षणहि आमची सत्ता सहन करणार नाहीं, अशी त्याची खात्री झाली. युरोपांत इंग्लंड-जर्मनचें जें युद्ध सुरू झालें आणि पुढें ज्याला जागतीक युद्धाचें स्वरूप आलें, त्या युद्धाचा थोडा फार परिणाम इंग्रजांवर झाला. सुभाषबाबूंच्या ' अझाद हिंद ' फौजेनेंहि भीति उत्पन्न केली आणि म. गांधी, पं. नेहरू यांजबरोबर भरताला स्वराज्य देण्याची बोलणीं सरकारनें केलीं. या बोलण्यास, या वाटाघाटीस यश आलें आणि,

१९ आगस्ट १९४७ हा दिवस सोन्याच्या पावलांनीं आला. याच दिवशीं—भारत स्वतंत्र झाला !

—याच पवित्र दिवशीं पं. जवाहरलाल नेहरूनीं स्वतंत्र भारताचे पंतप्रधान म्हणून आणि घटना समितीचे सभासद म्हणून प्रतिज्ञा वाचली.

" या उदात्त क्षणीं भारताच्या स्वातंत्र्य काळीं घटना समितीचा सभासद या नात्यानें अत्यंत नम्रतेनें मी भारताच्या व त्यांतील जनतेच्या सेवेसाठीं माझें जीवन अर्पण करीत आहें. माझा हेतु हा आहे कीं, या प्राचीन भारतभूमीला जगांतील आपलें न्याय स्थान प्राप्त व्हावें आणि तिनें जगांतील शांतता व मानवी कल्याण यांच्या विकासासाठीं प्रयत्न करावे."

स्वातंत्र्यदिवाळी, स्वातंत्र्यदसरा साजरा झाला. भारत स्वतंत्र झाला. आमच्या प्रिय भारताचा राज्यकारभार कोणत्या धोरणानें चालणार, याची घटना आम्ही तयार केली. आमच्या स्वतंत्र भारताचा कारभार सुरू झाला !

आमच्या राष्ट्राचें नांव भारत. आमचा राष्ट्रध्वज—अशोकचक्रांकित तिरंगीध्वज.

आमचें राष्ट्रगीत—वंदेमातरम्. आमची राष्ट्रभाषा—हिंदी.

आमची राष्ट्रलिपी—देवनागरी. आमचें राष्ट्रब्रीद—सत्य मेव जयते.

आमचा भारत स्वतंत्र ! आम्ही स्वतंत्र भारताचे वीरपुत्र ! आतां आमची ईश्वराजवळ एकच मागणी ! ईश्वरा,

" वीर हृदय तें देई अमुतें
न गणी जो कधि प्राणहानीतें
करण्या पौरुष कर्तव्यातें
रक्षी भारत भगवान रक्षी भारत ! "

• • •